# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**दिनांक ०५.०५.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

दिनांक ०५ मे २०१८ रोजी (का.प.क्र.१३) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसींग, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १९. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २०. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २१. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २२. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २९. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३०. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३१. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३२. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३३. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३४. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३५. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३६. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३७. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३८. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ३९. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४०. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४१. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४३. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४४. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४५. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४६. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ४७. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४८. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४९. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५०. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५१. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५२. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५३. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५४. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५५. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५६. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५७. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ५८. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ५९. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६०. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६१. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६२. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६३. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६४. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६५. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |

| | |
|---|---|
| ६६. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ६७. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६८. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ६९. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७०. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७१. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७२. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७३. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७४. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७५. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७८. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ७९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८०. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८१. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८२. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८३. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८४. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८५. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८६. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ८७. | स.स.कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

मा.महापौर :आज सभेला मा.आयुक्त उपस्थित नाही त्यांनी लेखी पत्र देऊन कळविले आहे. आज आयुक्त म्हणून अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग हे काम पाहतील.

श्री.गंगाधर ढगे :माझे वार्डातील कचरा उचलण्यासाठी श्री.पैठणे यांना आदेशीत करावे. स्वच्छता निरीक्षक, जवान सुट्टीवर असतात. कचरा उचलला जात नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :कोरम नाही सभा तहकूब करावी.

मा.महापौर :कोरम नाही सभा दहा मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११:३५ वा. पुन्हा सभा ११:४५ वा.सुरू)

मा.महापौर :पुन्हा गणपुर्ती अभावी सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.(वेळ ११:४५ वा. पुन्हा सभा ११:५५ वाजेला सुरूवात)

श्री.राजेंद्र जंजाळ :महानगरपालिकेचा अतिक्रमण विभाग अतिक्रमणाची नेमकी कार्यवाही कोणत्या ठिकाणी करतात? त्यांचे काम करण्याची नेमकी पध्दत काय? या विभागाला सुट्टया किती असतात आणि सुट्टीच्या दिवशी अतिक्रमण विभागास फोन केला तर सुट्टीवर आहे असे सांगतात. जर महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण

होत असेल तर कारवाई करण्यासाठी कोणाला सांगायचे? कालिका माता मंदिरा समोर महापालिकेची एक मोठी जागा आहे. शनिवारच्या दिवशी एका व्यक्तीने त्या ठिकाणी लग्नाचा मंडप उभारला काम चालु होते. फोन केला तर कर्मचारी चार दिवस सुट्टीवर होते त्या ठिकाणी त्या व्यक्तीने मंडप टाकला. मंदिरा समोर मटन शिजवण्यात आले. लग्नाचा कार्यक्रम आटोपला गेला. मनपाच्या जागेवर अशा प्रकारे अनाधिकृतपणे वापर करण्यात येत असेल तर कारवाई करण्यासाठी आम्ही कोणाला फोन करायचा? अनेक ठिकाणी जसे गजानन महाराज मंदिर रस्ता, शहागंज, गुलमंडी, शिवाजी नगर रस्ता अशा मुख्य रस्त्यावर हात गाड्या उभ्या असतात. अतिक्रमण विभागाचे अधिकारी काहीच कारवाई करत नाहीत. या विभागाची अत्यावश्यक सेवा आहे. त्यांना कोणत्याच प्रकारच्या सुट्टया देऊ नये. अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्याकडुन संबंधीत कार्यक्रमाच्या बाबतीत खुलासा घेण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :अतिक्रमण विभागात अद्याप सक्षम अधिकारी नाही. श्री.अभंग यांच्याकडे चार्ज दिला फोन केला तर मी काय करु, कर्मचारी नाही अशी उत्तरे त्यांची असतात. हातगाड्या संदर्भात गजानन नगर, पुंडलिकनगर रोडवर सातत्याने त्यांना फोन करतो. माझ्या वार्डात वैदमंत्रा अपार्टमेंन्ट आहे त्याच्या साईड मार्जिगमध्ये एका खाजगी व्यक्तीने पत्र्याचे शेड बांधुन ठेवले आहे. फोन केला तर नोटीस देतो असे सांगतात. मा.आयुक्तांना याबाबत पत्र व्यवहार सुध्दा मी केलेला आहे. श्री.अभंग याबाबतीत काहीच लक्ष देत नाही. श्री.बावस्कर बिल्डींग इन्स्पेक्टर यांचा फोन बंद असतो. यामध्ये आम्ही कोणाकडे तक्रार केली पाहिजे? अशा प्रकारचे अतिक्रमण, हातगाड्यांवर कार्यवाही होणार की नाही?

श्री.राजगौरव वानखेडे :सलिम अली सरोवराच्या आतमध्ये आणि समोर जे अतिक्रमण झालेले आहे याच्यावर कोणतीही कारवाई महानगरपालिकातर्फे होतांना दिसत नाही. ते अतिक्रमण काढणार आहे की नाही? याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा. ती कार्यवाही केव्हा होणार आहे?

श्री.अजीम अहेमद :माझ्या वार्डात नाल्यावर घर केले आहे. ते अतिक्रमण अद्याप काढण्यात आले नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरात रस्त्यावर हातगाड्यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. आज पर्यंत अतिक्रमण विभागाने रस्त्यावरच्या अतिक्रमणावर किती वेळा कारवाई केलेली आहे? मनपाचे शिष्टमंडळ मा.पोलिस आयुक्तांकडे गेले होते त्यांनी सांगितले की,रस्त्यावरचे अतिक्रमण काढण्याचे काम हे महापालिकेचे आहे असे असतांना सुध्दा महापालिका याच्यावर कारवाई का करत नाही? रस्त्यावरचे अतिक्रमण काढत असतांना कोणी अडथळा निर्माण केला तर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे अधिकार या विभागास आहेत. सगळेच सदस्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या हातगाड्यांच्या बाबतीमध्ये तक्रारी केल्या नंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आता पर्यंत किती जणांवर गुन्हे दाखल केले? शहरात वाहतुकीची वाढती कोंडी झाली आहे. मागच्या बैठकीत सांगण्यात आले की शहागंजमध्ये या दिवशी व इतर दिवशी अमुक ठिकाणी कार्यवाही करणार पण

कार्यवाही केली नाही. महाराष्ट्र शासनाने याच्यावर जी.आर काढलेला आहे, जर अतिक्रमण निदर्शनास आणुन दिल्या नंतर त्याच्यावर जर कारवाई केली गेली नाही तर त्या संबंधीत विभागाचा बी.आय, अतिक्रमण विभागाचा अधिकारी आणि मा.आयुक्त या सगळ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतुद शासनाने दिलेल्या परिपत्रकात आहे. यासाठी आठ दिवसाची मुदत अतिक्रमण विभागाला द्यावी. जर अतिक्रमण विभाग यामध्ये सक्षमपणे काम करत नसेल तर अशा अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची आमची तयारी आहे. अतिक्रमण विभागाकडे आता पर्यंत किती तक्रारी आल्या? आणि किती तक्रारींचा निपटारा केला? त्याची सुध्दा माहिती सभागृहात सादर करावी.

श्रीमती मिना गायके :हनुमाननगर चौकातील टपऱ्यांच्याबाबतीत सांगितले होते अधिकारी येतात आणि टपऱ्या हटवतात, नंतर पुन्हा तेथे टपऱ्या लावल्या जातात.

श्री.आत्माराम पवार :अतिक्रमणाच्या बाबतीत मी श्री.अभंग, श्री.बावस्कर यांना अनेक वेळा फोन केला. एक २०X३० ची प्लॉटिंग झाली होती वारंवार फोन केला तर ते म्हणतात की, पेपर घेऊन या, पेपर आणल्यावर बघु, त्याची अगोदर प्लॉटिंग झालेली आहे नंतर बघु, २०X३० ची प्लॉटिंग जुनी झालेली आहे म्हणुन ती काढायची नाही असे त्यांचे मत आहे. वारंवार फोन करुन सुध्दा ते या कामाला सक्षम नाही. माझी विनंती आहे की त्यांची बदली करुन या विभागात नवीन अधिकारी द्यावा.

श्री.फेरोज खान :सहा महिन्यापुर्वी शहागंज, निजामुद्दीन रोड येथील काही अतिक्रमण काढणे बाकी आहे. पुर्ण शहागंजमधील जितके पण फुटपाथ वर अतिक्रमण करुन बसलेले जे लोक आहेत ते अतिक्रमण लवकरात लवकर काढण्यात यावेत.

मा.महापौर :श्री.अभंग आपण शहागंजमधील अतिक्रमण लवकरात लवकर काढावे. विरोधी पक्ष नेते यांची मागणी आहे.
(यावेळी काही स.सदस्य मोठ-मोठ्याने बोलत असतात.)

श्री.राजेंद्र जंजाळ :आताच श्री.फेरोज खान यांनी सांगितल्यानुसार अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना कराव्या की, सभा संपण्याच्या अगोदर तेथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.फेरोज खान :पुढच्या आठवड्यात रमजान हा पवित्र महिना सुरु होणार आहे. जेवढे लोक बसले ते पैसे घेऊन बसलेले आहे. आता पर्यंत ताबा दिला नाही. शहागंजच्या कारवाईला माझा विरोध नाही. आधी हॉकर्स झोन बनवण्यात यावेत व त्या नंतर ते अतिक्रमण काढण्यात यावेत.

श्री.प्रमोद राठोड :त्यांचे स्वत:चे विषय असतात बाकीच्या लोकांना त्रास होतो.

श्री.फेरोज खान :शहागंजमध्ये मी एकटाच राहत नाही. तेथे मुस्लिम नव्हे तर इतर समाजाचे लोकही व्यवसाय करतात.

श्री.प्रमोद राठोड :परवा मा.पोलिस आयुक्तांकडे एक निवेदन दिले होते की, रस्त्यावरील अतिक्रमण काढावे. तेथे हिंदु मुस्लिम विषय नव्हता.
(या वेळी अनेक सदस्य बोलत असतात.)

मा.महापौर :सर्वांनी जागेवर बसावे. आक्षेपार्ह कोणी बोलु नये.

श्री.राजेंद्र जंजाळ :विरोधी पक्ष नेता यांच्या भावना तिव्र आहेत. त्यांनी जो मुद्दा शहागंज बाबत मांडला त्याबाबतीत सभा संपण्याच्या आत तेथील कार्यवाही व्हावी.

श्री.फेरोज खान :शहागंजच्या कार्यवाहीला माझा विरोध नाही. त्या दिवशीही विरोध केला नाही. हॉकर्स झोन करावे. गरिबांच्या गाड्यांबाबत अत्याचार होत आहे. ज्या पध्दतीने गाड्या तोडत होते, लोटत होते त्यास विरोध आहे. हॉकर्स झोन होत नाही तो पर्यंत त्या गाड्यांना हात लावु नये. शिस्तीने गाड्या लावण्याची कार्यवाही व्हावी. आठ दिवसांनी रमजान महिना सुरु होणार आहे. फुटपाथवर जेवढे बसलेले आहेत, त्या लोकांनी पैसे घेऊन बसले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सभागृहात एक व अतिक्रमण काढतांना एक भुमिका सदस्यांनी ठेवु नये.

श्री.अब्दुल नाईकवाडी :स.श्री.राजु वैद्य,श्री.जंजाळ यांनी जे अतिक्रमण काढण्याचे सांगितले आहे ते पण सभा संपण्याच्या आत काढण्यात यावेत.

श्री.फेरोज खान :शहागंज भाग हा तीन वार्डात विभागला आहे. मी माझ्या वार्डाच्या संदर्भात बोलत आहे.

श्री.नासेर सिद्दिकी :दमडीमहल येथील अतिक्रमण हटवले, परंतु अधिकाऱ्यांना सजा मिळाली.

श्री.राजेंद्र जंजाळ :आमचे तेच म्हणणे आहे, दमडी महलचे अतिक्रमण जसे काढले तसे शहरातील हातगाडी हटवण्यासाठी कार्यवाही का होत नाही?

मा.महापौर :श्री.पाठक आणि श्री.अभंग हे पदनिर्देशित अधिकारी आहेत. या विभागाचे एचओडी चे पद रिक्त आहे. श्री.अभंग यांची ऑर्डर काढली परंतु त्यांनी असमर्थता दाखवल्या नंतर त्यांनी त्या विभागाचा चार्ज घेतला नाही. त्या विभागाचा पॅटर्न, बिल्डींग इंन्स्पेक्टर किती पाहिजेत? पदनिर्देशित अधिकारी किती पाहिजेत? त्यांचा विभाग प्रमुख कोण? हा पॅटर्न तात्काळ प्रशासनाच्या स्थरावर आजच्या आज अंतिम करावा लागणार आहे. श्री.जंजाळ यांनी ज्या सुचना केल्या त्याप्रमाणे मागे आदेश दिले होते की, सुट्टीच्या दिवशी सुध्दा या विभागाचे कामकाज सुरु राहिल. परंतु सुट्टीच्या दिवशी विभाग चालु नव्हता, त्या ठिकाणी मोठी घटना घडली असती परंतु वेळीच लक्ष दिल्यामुळे काही अनर्थ झाला नाही. सुट्टीच्या दिवशी विभाग चालु असला पाहिजे. मुख्य रस्त्यावर ज्या गाड्या उभ्या आहेत त्याचा संपुर्ण ॲक्शन प्लॅन बनवयाचा आहे. स.विरोधी पक्ष नेत्यांची सुध्दा मनापासुन तळमळ आहे की, शहरामधील शहागंज असेल व इतर भागातील अतिक्रमण काढले गेले पाहिजे. त्यांनी पारदर्शक भुमिका मांडली. रोडवरील हातगाड्यांच्याबाबतीत फिरत्या गाड्यांना हॉकर्स झोन पाहिजे. फेरीवाले म्हणजे त्यांनी फेरी करत विकत राहायला पाहिजे. स्थिर असते तर परवाने दिले असते. श्री.अभंग आपण स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्या प्रमाणे समान कारवाई व्हायला पाहिजे. मुख्य बाजार पेठ, शहागंज पासुन सुरुवात झाली. याचे सुध्दा समर्थन आहे. पुंडलिकनगर असेल, शहागंज येथील हातगाड्या असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी गेल्यास परत येऊन नये. श्री.जंजाळ यांनी तक्रार केली. सलीमअली सरोवरचे अतिक्रमण किती दिवस ठेवणार आहे? तेथील फर्निचर वाल्यांवर एफ.आय.आर दाखल करा आणि सरोवरमधील अतिक्रमण सुध्दा काढण्यात यावे. श्रीमती गायके ताई यांच्या वार्डातील त्या टपऱ्या आणि हात गाड्या परत येऊन

बसतात त्यांच्यावर कारवाई करावी. पर्यायी व्यवस्था करणे मनपाचे काम आहे याचा अर्थ असा नाही ४X६ ची गाडी गुलमंडी, शहागंज भागात टाकली, विना परवानगी टाकली, मनपाची मालकी नाही. लिज संपल्यानंतर मालमत्ता त्यांच्याच ताब्यात आहेत. अशी ही प्रकरणे आहे. श्री.आत्माराम पवार यांनी बेकायदेशिर प्लॉटिंगचा विषय मांडला यामध्ये मा.अतिरिक्त आयुक्तांना खुलासा करण्यासाठी सुचना देतो की, या विभागामध्ये पदनिर्देशित अधिकारी, प्रमुख किंवा डी.एम.सी. वर्ग एकचा अधिकारी यांना जी काही मशिनरी, स्टाफ लागेल याची सगळ्यात आधी व्यवस्था करायची आहे. हा विषय संपल्यानंतर संबंधीत अधिकाऱ्यांनी तात्काळ एक ॲक्शन प्लॅन तयार करायचा आणि कारवाई करायची आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :अतिरिक्त आयुक्तांना अतिक्रमण विभागाच्या कामकाजाबाबत जास्त माहिती नसेल, जे अधिकारी त्या विभागात काम करतात त्यांच्या खुलासा घेण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.बकोरिया साहेब असतांना अतिक्रमण विभागाचा चार्ज एका अधिकाऱ्याला दिला होता, त्या अधिकाऱ्याने आता पर्यंत तो चार्ज घेतलेला नाही. त्या सक्षम अधिकाऱ्यांना अतिक्रमणाचे काम देण्यात यावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :दमडीमहलचा मलबा आणि शेड हटवण्याचे आदेश देण्यात यावे. शहागंज असेल, शिवाजी नगर असेल, सर्व अतिक्रमण काढावे आम्ही तुमच्या बरोबर आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :महानगरपालिकेच्या ज्या जागेवर अतिक्रमण होत आहे, ते अतिक्रमणे आधी काढण्यात यावेत.

पदनिर्देशित अधिकारी :हातगाड्यांच्या संदर्भात मा.महापौर दालनात २४.०४.२०१८ रोची बैठक झाली होती. त्या बैठकीत मा.महापौरांनी सुचना केली होती की, शहागंज, गुलमंडी, शिवाजी नगर, औरंगपुऱ्यातील रस्त्यावरील हातगाड्या काढण्यात याव्यात. स्ट्रीट वेन्डर्सचा एक कायदा आलेला आहे की, गाडी ही फिरती राहायला पाहिजे. एका जागेवर जर गाडी उभी असेल तर हॉकर्स झोनला त्यांना जागा देण्यात यावी. त्यामुळे अशी गाडी उचलुन घेता येणार नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :फेरीवाल्यांचे नियम मला माहित आहे. महानगरपालिकेने एक समिती तयार करुन हॉकर्स झोनसाठी जागा निश्चित करुन त्याची समितीच्या मार्फत चौकशी करुन त्या जागेवर हॉकर्स झोनसाठी परवानगी द्यावी. अशा प्रकारचा तो कायदा आहे. मनपाच्या जागेवर व रस्त्यावर लागलेल्या गाड्या काढु नये, असे कुठेही त्यात नाही. शिवाजीनगरच्या मुख्य रस्त्यावर ज्यावेळेस हातगाड्या लागतात बीड बाय-पासला अनेक ठिकाणी मंगल कार्यालये आहेत त्या ठिकाणी लग्नाची गडबड असतांना तेथे दोन-दोन तास ट्राफिक जाम होते. रुग्णवाहिका जात नाही. विधी विभागाकडुन याबाबतीत खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :फेरीवाल्यांनी फिरत राहावे, जर हातगाड्या एका जागेवर स्थिर असेल तर ती जप्त करुन कारवाई करणे अपेक्षित आहे. कारवाई कधी करणार? का केली नाही? याचा तुम्ही खुलासा करावा.

पदनिर्देशित अधिकारी :स्ट्रीट वेन्डर्सचा काय कायदा आलेला आहे? काय नाही? याच्यासाठी ती संचिका विधी विभागाला पाठवलेली आहे. त्यांचा खुलासा आल्या नंतर कारवाई करता येईल.

मा.महापौर :याबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :संचिका येई पर्यंत रस्त्यावर कोंडी करणार काय?

मा.महापौर :फेरीवाल्यांसाठी हॉकर्स झोन असावे. परवाना दिल्यानंतर बसण्यास हरकत नाही. स्थिर राहुन व्यवसाय करीत असेल तर कारवाई करण्यास हरकत नसावी.

विधी सल्लागार :फेरिवाल्यांना धोरणानुसार हॉकर्स झोन निश्चित करुन द्यायचे आहे. असे करुन सुध्दा त्यांनी रस्त्यामध्ये अडथळा आणला. हॉकर्स झोन नसतांना असेल तर त्यांच्या विरुध्द कारवाई करता येईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :जे लोक रस्त्यावर येऊन अडथळा निर्माण करत असतील तर अशा लोकांवर कारवाई करावी. हातगाड्या हटवाव्या.

श्री.राजेंद्र जंजाळ :ज्या प्रमाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे धोरण आहे की, कोणताही नियम, कायदा, कोणत्याही मा.कोर्टाची ऑर्डर जर आली तर त्या ऑर्डरचा अर्थ स्वतःच्या सोयी प्रमाणे लावायचा आणि स्वतःच्या कर्तव्यापासुन दुर पळायचे असे महापालिकेच्या अधिकाऱ्याचे काम आहे. शिवाजीनगरमध्ये संरक्षक भिंतीवर काही लोकांनी बांधकाम करुन अतिक्रमण केले होते. नंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना अनेक वेळा सुचित केल्या नंतर तेव्हा त्यांनी नोटीस दिली. नोटीस दिल्यानंतर संबंधीत लोक मा.कोर्टामध्ये गेल्यावर त्यांनी त्या भिंतीच्या अतिक्रमणावरच्या कारवाईला स्टे आणला. त्या नंतर मी स्वतः कोर्टात गेलो, स्टे हटवला. निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला. निकाल लागुन आज सहा महिने झाले पण अजुन सुध्दा महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी संबंधीत प्रकरणी तेथे जाऊन कारवाई का केली नाही?

पदनिर्देशित अधिकारी :मा.कोर्टाचा आदेश पाहुन कारवाई करतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :विधी सल्लागार यांनी कोर्टाचे आदेश पत्र लिहुन त्यांना पाठवलेले आहे. इतक्या दिवसापासुन त्यांना पत्र लिहुन कळवल्यानंतर सुध्दा त्यांना आता काय बघायचे आहे? अतिक्रमण विभागाला सक्त ताकीद देण्यात यावी. शहरातील जितक्या मुख्य रस्त्यावर हातगाड्या असतील त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्यात यावी. तक्रारी दिल्या त्याबाबत काय कारवाई केली?

श्री.त्र्यंबक तुपे :शहरामध्ये काही महापालिकेच्या आणि काही सोसायटीच्या खुल्या जागा आहेत. अशा जागा व सोसायटीच्या जागेच्या माध्यमातुन लाखो रुपये घेऊन मोठ मोठी कार्यक्रम पार पडत आहेत. मनपाची एनओसी लागते की नाही? कमर्शिअल युज होत आहे. कार्यक्रम झाल्यावर तो कचरा दोन-तीन दिवस उचलला जात नाही, त्याची दुर्गंधी पसरते आणि नागरीकांना त्याचा त्रास होतो. हे होत असतांना महापालिकेचा याच्यात काही फायदा आहे का? टॅक्सच्या रुपात याच्यातुन काही पैसा मिळतो का? मनपाच्या ताब्यात असेल तर परवानगी घेता का? जमा होणारा पैसा कोण घेतो? शहरात रस्त्यावर मंडप टाकतात. तीन चार दिवस काढत नाहीत. रस्ता सोडुन परवानगी द्यावी.

सिंधी कॉलनीत खुली जागा आहे तेथे सर्रास लग्न व इतर कार्यक्रम होतात. खुलासा करण्यात यावा.

श्रीमती सरवत बेगम :दमडी महल जवळील अतिक्रमण हटवण्यात आले होते. तेथील मलबा आता पर्यंत हटवण्यात आलेला नाही. प्रोजेक्ट थांबला आहे. आपण तेथील मलबा हटवण्याचे आदेश द्यावे नसता हा प्रोजेक्ट बंद करण्याचे आदेशित करावे. रुबी हॉस्पिटल जवळ नाल्याच्या जागेवर अतिक्रमण केले. राहात कॉलनीस जाण्यास रस्ता नाही. चेलीपुरा पोलिस चौकी ते चंपा चौक रस्त्याचा नागरीकांना मोबदला दिला तरी अतिक्रमण केलेले आहे.

मा.महापौर :महानगरपालिकेच्या खुल्या जागेचा व सोसायटीच्या जागेवर विना परवाना वापर होतो. प्रमुख रस्त्यावर मंडप टाकले जातात. याकडे अतिक्रमण विभागाने लक्ष द्यावे.

श्रीमती सुरेखा सानप :राजेंद्रनगरमध्ये मनपाची खुली जागा आहे. त्या जागेवर अतिक्रमण झाले आहे. मी तीन महिन्यापासुन सांगत आहे की, ते अतिक्रमण काढावे पण आता पर्यंत ते अतिक्रमण काढायला कोणीच आलेले नाही.

मा.महापौर :प्रत्येक सदस्याला विनंती आहे की, जे काही अतिक्रमण विभागाशी आपले प्रश्न, विषय, तक्रार असतील ते लेखी स्वरुपात माझ्याकडे सभा संपल्यानंतर द्यावेत. त्या अनुषंगाने आदेशित करण्यात येईल. ताबडतोब मी संबंधित विभागाच्या आधिकाऱ्यांना कारवाई करण्यासाठी पाठवेल. खुल्या जागेच्याबाबतीत श्री.कोल्हे यांनी खुलासा करावा.

कार्य. अभि. (श्री.कोल्हे) :महानगरपालिकेच्या मंजुर रेखांकन व काही खुल्या जागा आहेत त्यातील काही मोठी मैदाने आहेत. त्या मोठ्या मैदानाची परवानगी मालमत्ता विभागाकडे मागणी केली तर ते परवानगी देतात.

श्री.त्र्यंबक तुपे :त्या जागा जरी सोसायटीच्या देखरेखी खाली असतील तर तिथे कमर्शिअल वापर करुन मोठ-मोठे कार्यक्रम लाख दोन लाख रुपये घेऊन करता येतात का?

कार्यकारी अभियंता :त्यांना वार्ड कार्यालया मार्फत परवानगी दिली जाते.

श्री.राजु शिंदे :शहर अभियंता नाही, मा.आयुक्त नाही, सभेत उत्तर कोण देणार आहे?

मा.महापौर :फक्त शहर अभियंता मला सांगुन गेलेले आहेत. श्री.रविंद्र निकम, आजच्या सभेत जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांची यादी बनवुन आपण माझ्याकडे द्यावी.

कार्यकारी अभियंता :रस्त्यावरच्या किंवा कुठल्याही जागेची परवानगी मागितली तर त्याचे अधिकार वार्ड अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिकेच्या खुल्या जागा असतांना कोणालाही न सांगता तिथे कार्यक्रम होतात. शाळेमध्ये सर्रास वापर होतो. याच्यावर आपले नियंत्रण असावे.

मा.महापौर :महापालिकेच्या खुल्या जागेच्या बाबतीत एक नियमावली तयार करायला पाहिजे? त्या अनुषंगाने कमर्शिअल जे कार्यक्रम होतात त्या माध्यमातुन उत्पन्न महापालिकेला मिळेल. खुल्या जागेच्याबाबतीत काही निकष ठरवायला पाहिजेत. स.सदस्यांनी ज्या सुचना दिल्या त्या प्रमाणे पुढच्या सभेमध्ये एक

नियमावली तयार करुन ठेवा. त्या अनुषंगाने उत्पन्न वाढेल आणि शहरवासियांना शिस्त लागेल.

श्री.प्रमोद राठोड :सदस्यांना विचारत नाही. स्थानिक लोकांना विश्वासात घेत नाही. परवानगी देऊन टाकतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :वार्ड अधिकारी काय काय कामे करतात? पोलिस आयुक्तांकडे डिजीटल पोस्टर काढण्याचा विषय आला. श्री.अभंग यांनी आयुक्त मुगळीकर साहेबांची ऑर्डर दाखवली. हे काम वार्ड अधिकारी यांचे आहे.

मा.महापौर :कोणाच्या कक्षेमध्ये अतिक्रमण धारकांवर किंवा विनापरवानगी बांधकाम करणाऱ्या नागरिकांवर कारवाई प्रस्थापित करायची त्याचा सुध्दा एक सविस्तर प्रस्ताव येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात यावा.

श्री.रावसाहेब आमले :दोन महिन्याअगोदर मी आपल्याकडे लेखी तक्रार दिली होती की, गट नं.१४ मध्ये डिपी रोडवर अतिक्रमण होऊन तीन-चार मजली बिल्डींग बांधल्या जात आहे. आपण त्या बाबतीत आदेशित करुन सुध्दा अद्याप कारवाई का झाली नाही? आणि सफारी पार्कची जी जागा आरक्षित केली त्या ठिकाणी सुध्दा अतिक्रमण होत आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :श्री.अभंग आपण यामध्ये दोन दिवसाच्या आत कारवाई करुन माझ्याकडे याचा अहवाल द्यावा. आणि सफारी पार्कचे अतिक्रमण ताबडतोब थांबवण्यात यावे व झालेले अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे.

श्री.इरशाद खान :माझ्या वार्डात ३.१७ एकर जागा आहे. सन-२००६ पासुन मॅटर चालु आहे. ती जागा ताब्यात का घेतली? तेथे काही लोक पैसे वसुल करत आहे.

श्री.अय्युब जागीरदार :स.सदस्य श्री.इरशाद खान यांनी सांगितले की, वार्डामध्ये तीन एकर सतरा गुंठे जागा फत्तेसिंगपुरा पाण्याच्या टाकीजवळ महानगरपालिकेची आहे. या जागेवर अतिक्रमण होऊन दोन-दोन, तीन-तीन मजली बिल्डींग बेकायदेशिर पध्दतीने बनवलेल्या आहेत. काही लोक ती जागा विकत आहे. आदेशित करावे की, ती जागा मोजुन संरक्षित भिंत बांधुन ताब्यात घेण्यात यावी.

मा.महापौर :श्री.ए.बी.देशमुख आपण मनपाची मोजणी करणारी जी एजन्सी आहे त्यांना ताबडतोब आदेशित करुन ती जागा मोजुन ताब्यात घ्या.

श्री.अय्युब जागीरदार :आझाद चौक ते राममंदिर पर्यंत रस्त्याचे लोकांनी मोबदला घेतला तरी टपऱ्या टाकुन अतिक्रमण केले.

श्री.राजेंद्र जंजाळ :सफारी पार्कवरील अतिक्रमण होऊ नये.

मा.महापौर :अशा जेवढ्या प्रॉपर्टीज असतील त्या मनपाने ताब्यात घ्याव्यात.

श्रीमती.मनिषा मुंढे :सहा महिन्यापासुन नाला खोदुन ठेवला आहे. त्याच्यात पुर्ण माती गेली आहे. एक महिन्या नंतर पावसाळा सुरु होणार आहे. अजुन ती माती काढण्यात आली नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी श्री.अफसर सिद्दिकी यांनी ताबडतोब ती नाल्यातील माती काढुन ते बांधकाम करावे.

श्री.सचिन खैरे :पैठण गेट, गुलमंडी, रंगार गल्ली, सिटी चौक येथे जास्त अतिक्रमण झाले आहे. यात श्री.अभंग काहीच लक्ष देत नाहीत.

मा.महापौर :त्याचा सुध्दा ॲक्शन प्लॅन तयार करायला सांगितला आहे. लवकरच त्याच्यावर कारवाई होईल.

श्री.अफसर खॉन :विद्यापीठ गेट पासुन ते मकई गेट पर्यंत त्या लोकांना टिडीआर दिले, पैसे दिले आहे. मोनुज हॉटेलच्या समोर खुप मोठा प्लॉट आहे. ती खुली जागा सुध्दा ताब्यात घेण्यात आली नाही. तेथे रोड होत आहे. श्री.अभंग, श्री.पाठक व श्री.काझी यांना सांगितले परंतु कार्यवाही होत नाही.

मा.महापौर :संध्याकाळ पर्यंत एक ॲक्शन प्लॅन तयार करुन द्यावा. कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाच महिन्या अगोदर यांना नोटीस देऊन विचारले होते की, माझ्या वार्डात एक हॉल आहे. ज्यांना आपण चालवण्यासाठी दिले आहे त्याला तीन वर्ष झाले आहे. तीन वर्षाचे भाडे किती वसुल केले? विचारणा केल्यावर अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देतात.

मा.महापौर :कोणता हॉल आहे? तो ताबडतोब ताब्यात घ्या आणि त्याचा काय वापर असेल तो बंद करा. त्याला वसुलीची नोटीस देण्यात यावी. तो किती दिवसा पासुन हॉल वापरत आहे? त्याचा आढावा घ्या. आठ दिवसामध्ये ही कारवाई करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :तेरणा शाळेजवळ दोन एकरचे ग्राऊंड आहे. सिडकोने त्यांना २००६ च्या आधी दिला होता. त्याच्या नंतर त्यांनी दहा वर्ष वापर केला. त्यांना नोटीस पाठवण्यात आली होती की, पैसे भरण्यात यावे. परंतु आज पर्यंत एक रुपया सुध्दा वसुल करण्यात आलेला नाही. आज पण ती जागा त्यांच्या ताब्यात आहे.

मा.महापौर :स.सदस्यांनी मागणी केल्यानुसार, तेरणा शाळेजवळील महानगरपालिकेची जागा ताबडतोब ताब्यात घेण्यात यावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :शहरामध्ये काही खुल्या जागा आहेत, त्यात काही हॉल आहे. अनेक दिवसापासुन ते एकाच व्यक्तीकडे आहेत. त्याच्याकडुन भाडे घेतल्या जात नाही. जागा महानगरपालिकेची असतांना सुध्दा त्या ठिकाणाचे आज ते मालक बनलेले आहेत. येणाऱ्या सभेमध्ये शहरामध्ये मनपाच्या किती जागा आहेत? त्या कोणी भाड्याने घेतल्या? त्यांना किती भाडे आकारतो? याची सर्व यादी सभेपुढे आणण्यात यावी.

मा.महापौर :जागा आपल्या पजेशनमध्ये आहे त्याचे भाडे मिळत नाही. हे सभागृह सुधारित आदेश देत आहेत की, तात्काळ सगळ्या जागेचा सर्व्हे करा, सध्या त्या ठिकाणी स्थिती काय आहे? कोणाच्या ताब्यामध्ये आहे? करारनामा कधी संपला? किती पैसे येणे आहे? ताबडतोब त्याची माहिती द्यावी आणि येणाऱ्या सभेमध्ये एक चांगला प्रस्ताव द्यावा. धोरण निश्चित करुन मंजुरी करिता प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री.मोहन मेघावाले :दिल्ली गेट पासुन जात असतांना सलिम अली सरोवर समोरील ग्राऊंड, जॉगिंग ट्रॅकचा भाग आहे. तिथे तीन दुकाने शेड झाले. फर्निचर वाल्यांनी अतिक्रमण केले आहे. श्री.निकम व श्री.काझी या अधिकाऱ्यांना काढण्यासाठी सांगितले तर ते सांगतात की मा.कोर्टामध्ये मॅटर चालु आहे. ती पुर्ण जागा मा.कोर्ट मॅटरमध्ये आहे की भाडे तत्वावर दिलेली आहे? खुलासा करण्यात

यावा. आणि पलीकडच्या बाजुला एक प्लॉटचे अतिक्रमण केले, त्यांना बोलल्या नंतर दुसरा १००X१०० चा प्लॉट बांधकाम करुन कंपाऊड केले. त्यांनी महापालिकेला बांधकाम परवानगी मागितली.

मा.महापौर :श्री.सिकंदर अली, श्री.ए.बी.देशमुख आणि श्री.अभंग या तीन अधिकाऱ्यांनी त्या जागेची लगेच पाहणी करावी व त्याची परवानगी दिली का? कशाच्या आधारे दिली? कागदपत्रे तपासुन तात्काळ त्याचा अहवाल माझ्याकडे द्यावा.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी :हेडगेवार हॉस्पिटलसमोर अतिक्रमण आहे. तक्रारी केल्या, मुख्य वाहतुकीचा रस्ता आहे. ते अतिक्रमण पण काढण्याचे आदेश घ्यावेत.

मा.महापौर :हेडगेवार हॉस्पिटल समोरील अतिक्रमण काढावे.
प्रशासनाला आदेशित करण्यात येते की, हा विभाग सक्षम करणे बाबत प्रशासनाकडुन त्या विभागाच्या विभाग प्रमुखाची जबाबदारी वर्ग एकच्या अधिकाऱ्यावर तात्काळ आजच्या आज देण्यात यावी. स्टाफ पॅटर्न जो आहे प्रभाग निहाय बिल्डींग इन्स्पेक्टर जे आहेत त्यांच्यावर जबाबदारी देण्यात यावी. महानगरपालिकेच्या मालमत्ता ताब्यात घेतल्या परंतु अजुनही काही मुळ मालकांच्या ताब्यामध्ये आहेत. तात्काळ त्या बाबत व्हॅकेंट करुन महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात याव्यात. रस्त्यावरचे अतिक्रमण ज्या हातगाड्या आहेत त्याचा ताबडतोब एक ॲक्शन प्लॅन तयार करण्यात यावा. अतिक्रमण विभाग, नगररचना तसेच मालमत्ता विभाग या तीन्ही विभागाचे एकत्र संयुक्त काम असावे. याबाबतीत प्रशासनाने शक्यतोवर त्याची पडताळणी करुन तीन्ही विभागामध्ये समन्वय कसा ठेवता येईल त्याबाबत सुध्दा नियोजन करणे अपेक्षित आहे.

श्री.विकास जैन :या विभागामध्ये कामासाठी एक सक्षम अधिकारी असणे गरजेचे आहे. असे अधिकारी नेमावे.

**<u>निर्णय</u>**

मा.महापौर :(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७१ तसेच अनुसूची-ड चे प्रकरण-२ मधील नियम १ (प) व सभा कामकाज नियमावलीचे नियम २१,२२,२४,३० आणि ३१ अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये झालेला निर्णय).

सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार बहुमताने निर्णय घेण्यात येतो की, स.सदस्यांनी अतिक्रमण विभागाशी संबंधीत ज्या तक्रारी सभागृहामध्ये मांडल्यात त्याची दखल घेण्यात यावी आणि कारवाई करण्यासाठी प्रशासनाला एक आठवड्याची मुदत देण्यात येते. मनपाच्या खुल्या जागा असतील, रस्त्यावरच्या तात्पुरत्या स्वरुपाच्या परवानग्या असतील त्याबाबत सुध्दा एक चांगला प्रस्ताव तयार करुन सभेमध्ये तो ठेवण्यात यावा. हॉकर्स झोनच्या बाबतीत नगररचना तसेच विधी विभाग या दोन्ही विभागांनी एकत्रित पणे खुल्या जागेचा हॉकर्स झोन करिता जागा निश्चित केलेल्या आहेत. त्या जागेमध्ये हॉकर्स झोन तयार करुन हॉकर्सला त्या ठिकाणी परवानगी देता येईल त्या करिता प्रयत्न करायचे आहेत. फेरिवाल्यांच्या बाबतीमध्ये कडक धोरण निश्चित करायचे आहे. शहागंज भागामध्ये विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या मागणीनुसार तात्काळ कारवाई

करायची आहे. कारण विरोधी पक्ष नेते यांनी मागच्या सभेमध्ये सुध्दा मुद्दा मांडला होता. या सभेत सुध्दा हाच मुद्दा मांडला होता. याच्याकडे दुर्लक्ष करु नये, ताबडतोब शहागंजमध्ये अतिक्रमण काढण्याची कारवाई करावी. पोलिस विभाग व इतर विभागाची मदत घ्यावी. शहागंज टपऱ्यांची लिज संपली. त्यांना नोटीस देण्याची आवश्यकता नाही. अनाधिकृत विनापरवानगी मनपाच्या रस्त्यावर टपऱ्या टाकल्या असतील तर ते योग्य नाही. महानगरपालिकेचा मालमत्ता विभाग, अतिक्रमण विभाग व नगर रचना विभाग या तीन्ही विभागांची ताबडतोब अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे. अतिरिक्त आयुक्तांनी आजच्या सभेमध्ये संपुर्ण दिलेल्या आदेशाची दखल घेऊन मनपा प्रशासनाने एक ॲक्शन प्लॅन तयार करायचा आहे आणि एका आठवड्यामध्ये सभागृहात दिलेल्या सुचनांचे पालन करुन कारवाई करुन येणाऱ्या सभेमध्ये त्याच्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

श्री.त्र्यंबक तुपे :१५० कोटीचे रस्ते शहरात होणार आहे त्या संदर्भात मा.कोर्टात प्रकरण चालू आहे. मागिल बैठकीत मी मुद्दे उपस्थित केले होते. यामध्ये मागिल डीएसआरचे दर व नवीन दर यातील जी तफावत असेल ते मा.कोर्टात सादर करण्याचे सांगितले होते. १८-२० टक्केनी दर कमी झालेले आहे.जो पैसा बचत होईल त्यातून शहरातील इतर रस्ते करता येईल का खुलासा करावा.मा.कोर्टात मॅटर असेल तरी मनपाचे नुकसान होणार नाही यासाठी एखादी याचिका दाखल करू शकतो का? जो फरक डीएसआर मध्ये येतो त्या बाबत मा.कोर्टाला तसे निदर्शनास आणून देऊन जे की जी रक्कम बचत होईल त्यातून पुन्हा अंदाज पत्रक तयार करीत आहोत. असे केल्यास मनपाचा फायदा होणार आहे. असे टेंडर करू शकतो का? याचा खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :मी ही या संदर्भात पत्र दिले. हे प्रकरण मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावे की, डीएसआरचे दर कमी झालेले आहे. याच पैशातून रू.३०-३५ कोटीचे कामे जास्त होतील ही बाब मा.कोर्टाच्या निदर्शनास आणून द्यावी. ते टेंडर रिकॉल करावे नवीन टेंडर काढावे.

कार्य.अभियंता(श्री.अली):रु.१५० कोटीचे रस्त्याचे टेंडर काढले होते. त्यावेळचे जे दर होते त्यानुसार कार्यवाही केली होती आता एसएसआर म्हणून दर आले त्याचा जो फरक येतो तो काढावा लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे :रेट मध्ये तफावत येत आहे. त्यांचा तक्ता का सादर केला नाही? मनपाचे नुकसान होऊ नये. याची दखल घ्यावी.

कार्य.अभियंता(श्री.अली):जी तफावत येते त्याचा तक्ता तयार करीत आहोत. या प्रकरणात कोणताही निर्णय घेतलेला नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :जवळपास १८-२० टक्के दर कमी झाले आहे. जो फरक येतो त्याचा तक्ता का सादर केला नाही?

कार्य.अभियंता(श्री.अली):त्यामध्ये रेट मध्ये फरक आहे, टेंडर झाले ते सर्व पाहून कॅम्पॅझेशन करीत आहे. ते पुढची कार्यवाही करता येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :अनेक विकास कामाच्या संचिका मा.आयुक्ताकडे गेल्या होत्या. नवीन दरानुसार सादर करावे आयुक्तांनी म्हटले आहे. मनपाचे नुकसान होऊ नये.१८-२० टक्के

दर कमी झाले. जी तफावत येते त्यांचा तक्ता दिला नाही. विधी विभागाचा अभिप्राय घ्यावा.

श्री.राजू शिंदे :दरांमध्ये जी तफावत झाली आहे. त्यात कामे आणखी मेन्शन करू शकतो की नाही?

विधी सल्लागार :डीएसआरच्या दरा बाबत मा.न्यायालयात मनपातर्फे बाजू मांडू शकतो. या प्रकरणात तसा रिप्लाय गेलेला आहे, जेपी आणि चारणीयाचे मॅटर आहे तो ऑल डिफरंट इश्यु आहे. रेट कमी झाले होते तो स्कोप या मॅटरचा नाही.

श्री.राजू शिंदे :डीएसआर वाढले असते, कार्यादेश दिले असते, तर ही मनपाची की, त्यांची जबाबदारी आहे?

विधी सल्लागार :शहर अभियंता माहिती यावी तर कार्यवाही करू शकतो.

श्री.राजू शिंदे :शहर अभियंता कडून माहिती घ्यावी. मनपाचा फायदा होत असेल तर मा.न्यायालयात तातडीने ॲफिडेव्हीट दाखल केले पाहिजे व निविदा रि-कॉल केल्या पाहिजे.

मा.महापौर :रस्त्याच्या कामाच्या बाबतीत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सुध्दा नाराजी व्यक्त केली. रु.१५० कोटीचे रस्ते करायचे यात राज्य शासनाने पैसे दिले आहे. नवीन जे रेट आहे त्याप्रमाणे मा.कोर्टाला तसे सादरीकरण करावे. निविदा प्रक्रिया केली त्यास आवाहन दिले आहे. ती निविदा प्रक्रियाच रि-कॉल करायची आहे. तसेच महापालिकेचे म्हणणे मा.कोर्टात दाखल करून नवीन पध्दतीने सदरील रस्त्याच्या निविदा रिकॉल कराव्या.

श्री.विकास जैन :नवीन डीएसआर नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात यावे अशी सुचना करावी.

मा.महापौर :निविदा प्रक्रियेला आवाहन दिलेले आहे. निविदा प्रक्रिया बरोबर नाही असे याचिका कर्त्याचे म्हणणे आहे ती निविदा प्रक्रियाच रद्द करायची आणि नवीन निवीदा प्रक्रिया करण्याचे ॲफिडेव्हीट माननीय न्यायालयात द्यायचे व त्यात नवीन दराने निविदा रिकॉल करू असे नमूद करावे.

श्री.राजू शिंदे :एलईडीचे काम दिले गेले. मा.कोर्टात मॅटर गेले. त्या एजन्सीला कार्यादेश दिला. त्यानंतर रेट कमी झाले. त्यांनी मा.कोर्टात सांगितले की, कार्यादेश दिला रेट कमी करू शकत नाही. जवळपास त्यात ५ हजार रूपयाचा एका लाईटमध्ये फरक येतो आहे. शहरातील रु.१५० कोटीचे रस्ते होणार या प्रकरणातही कार्यादेश दिले नाही वर्कऑर्डर दिली नाही रेट कमी करायचे सांगावे. ऐकत नसेल तर ताबडतोब रिकॉल करावे.

मा.महापौर :मा.न्यायालयात शपथपत्र जे ॲफिडेव्हीट दाखल करायचे ते करावे. निविदा प्रक्रियेला आवाहन दिले आहे ती निविदा प्रक्रियाच आपण रद्द करतो आहे. निविदा प्रक्रिया करतांना जे चालू प्रचलित दर आहे.त्या दराने निविदा काढू असे दयावे प्रकरण निकाली काढावे तात्काळ १५० कोटीच्या फेरनिविदा करण्याचे कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :शासनाचे डीएसआर दर कमी झाले म्हणून आपण हे करतो आहे असे मा.कोर्टाला सादर करावे. या बाबत तातडीने ॲफिडेव्हीट दाखल करावे. मंगळवारी तारीख आहे. त्यापुर्वीच हे सर्व कार्यवाही करावी.

मा.महापौर :त्यात मनपा रिस्पॉडंट आहे पीटीशनर दुसरे आहे. ताबडतोब कार्यवाही करावी. कमेटी असेल त्या कमेटीच्या मार्फत कार्यवाही करावी. विधी विभागाचे ओपनीयन घ्यावे. निविदा प्रक्रिया रद्द करणे व नवीन दरानुसार अंदाजपत्रक तयार करून तात्काळ निविदा काढणे ही कार्यवाही करायची आहे.

श्री.राजू शिंदे :जर काम होणार नसेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हे वर्ग करावे.

कार्य.अभियंता-(श्री.अली):३,४ तारखेला मा.कोर्ट कामकाज चालू नव्हते. सुट्टी आहे. आता मंगळवारी तारीख दिली आहे.

श्री.भगवान घडमोडे :मा.कोर्टात कोणी प्रकरण दाखल केले? मनपाच्या अंगलट येणार नाही कायद्याच्या चौकटीत राहून महापालिकेतर्फे म्हणणे मांडावे.

कार्य.अभियंता (श्री.अली):ठेकेदार मा.कोर्टात गेले आहे. महापालिकेने केलेली निविदा प्रक्रिया बरोबर झाली होती. परंतु प्रक्रियेमध्ये मध्ये फॉल्ट आहे म्हणून काही ठेकेदार मा.कोर्टात गेलेले आहेत.

श्री.राजू शिंदे :रु.२५-२५ कोटीचे टेंडर केले म्हणून हा प्रकार झाला. ओपन टेंडर करायला पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे.पी. कन्स्ट्रक्शन कंपनीला ब्लॅकलिस्ट केले होते, त्यांनी पण टेंडर भरले ते ही ओपन केले.हे योग्य आहे का?

मा.महापौर

निर्णय

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७१ तसेच अनुसूची-ड चे प्रकरण-२ मधील नियम १ (प) व सभा कामकाज नियमावलीचे नियम २१,२२,२४,,३० आणि ३१ अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये झालेला निर्णय)

सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार निर्णय घेण्यात येतो की, शासनाने डीएसआरचे दर कमी केले. यासंदर्भात कायद्याच्या चौकटीत राहून मंगळवारपर्यत मनपाचे म्हणणे मा.उच्च न्यायालयात मांडावे व तसे आम्ही नवीन दराने सदरील निविदा फेरनिविदा करतो आहे असे ॲफिडेव्हीट द्यावे. यासाठी सिनीअर कॉन्सील ॲड. श्री.अतुल कराड यांची पण या कामासाठी पॅनलवर नियुक्ती करावी. तसेच बहुतांश सन्माननीय सदस्यांनी सभागृहात केलेल्या सुचनेनुसार ज्या जुन्या दराने सध्या निविदा प्रक्रिया सुरु आहेत. त्या सुध्दा तपासणे बाबत आदेशीत करण्यात येत आहे. जे अंदाजपत्रक मंजुरी अंतर्गत आहेत,निविदा प्रक्रिया अंतर्गत आहेत तसेच ज्या कामाच्या निविदा मंजूर आहेत परंतु कार्यादेश देणे बाकी आहेत अशा सर्व निविदांचे अवलोकन/ तपासणी शहर अभियंता मार्फत होऊन तुलनात्मक तक्ता तयार करून महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा, व पुढील कार्यवाही व्हावी.

श्री.राजु शिंदे :मागच्या सभेमध्ये ठराव घेतला होता की, सातारा देवळाईमध्ये तात्काळ टँकर चालु करा असे सांगितले होते पण आता पर्यंत तिथे टँकर चालु झालेले नाहीत. पेपरमध्ये एक बातमी अशी वाचली होती की, हे आम्हाला परवडत नाही, आम्ही हे करु शकत नाही. मग महानगरपालिका ही परवडण्यासाठी आहे का?

मा.महापौर :महानगरपालिकेचा फायदा, नुकसान बघण्याकरिता नागरिकांनी आम्हाला निवडुन दिले आहे. श्री.चहल या सभागृहाने दिलेले आदेश पालन प्रशासनाचे काम आहे.

| | |
|---|---|
| श्री.राजु शिंदे | :मुलभुत सुविधा देणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे आणि ते करावे लागणार आहे. सातारा देवळाईमध्ये कधी टँकर चालु करणार आहे? |
| कार्यकारी अभियंता(पा.पु) | :मागच्या सभेमध्ये मा.महापौरांनी निर्णय दिला होता. त्या निर्णयाची प्रत आता पर्यंत मिळालेली नाही. |
| मा.महापौर | :सभागृहामध्ये दिलेले आदेश हे लेखी स्वरुपात देणे बंधनकारक नाहीत. तासाभरात तुम्हाला ठरावाच्या प्रती मिळतील. तुम्ही एका तासाच्या आत टँकर चालु करा. |
| श्री.राजु शिंदे | :सिडको हडकोचे लोक नियमीत अडव्हांस कर भरतात, तरी त्यांना चार दिवसाआड पाणी दिले जाते. |
| श्रीमती सिमा खरात | :मागच्या सभेमध्ये श्री.चहल यांना बोलवुन आदेश दिले होते. त्यांनी सभागृहासमोर, सर्व मिडीयासमोर असे उत्तर दिले होते की, तीन दिवसामध्ये आम्ही शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करु. वार्डात पाच दिवसाआड पाणी येत आहे. श्री.चहल यांना विचारणा करण्यात यावी की, पाणी पुरवठा सुरळीत झाला का? |
| श्री.विकास एडके | :सगळेच सिडको-हडको, सिडको-हडको करत आहेत. लोक का फक्त तिथेच राहतात का?<br>(यावेळी काही स.सदस्य एकाच वेळी मोठ-मोठ्याने बोलत असतात.) |
| श्री.प्रमोद राठोड | :आम्ही यांच्या विषयी बोलत नव्हतो. आम्ही सिडको हडकोच्या नागरिकांना पाणी नाही. हे बोलत होतो. यांनी सभागृहाचा शिस्तभंग केला आहे. यांना सभागृहाच्या बाहेर काढण्यात यावे. |
| मा.महापौर | :श्री.विकास एडके आपण आपले शब्द परत घ्यावेत. |
| श्रीमती.सिमा खरात | :त्यांना सभागृहाची माफी मागायला सांगा. |
| मा.महापौर | :तुम्ही अशा प्रकारचा शब्दप्रयोग करायला नको पाहिजे होता. श्री.विकास एडके आपण सभागृहाची माफी मागावी. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :आमचे वॉर्डातील लोक पाणीपट्टी कर भरतात, मालमत्ता कर भरतात, त्यांच्या वार्डातील किती लोकांनी पाणीपट्टी, कर भरलेला आहे? |
| श्रीमती सायरा बानो | :पाण्याचा प्रश्न हा पुर्ण शहराचा आहे. हा काही फक्त एका वार्डाचा प्रश्न नाही. |
| श्री.नासेर सिद्दीकी | :प्रत्येक वेळेस टॅक्सच्या नावाखाली दुसऱ्या लोकांना बदनाम करत असतात. कोण टॅक्स भरतो? कोण भरत नाही? याचे पुर्ण रेकॉर्ड मनपाकडे आहे. |
| मा.महापौर | :श्री.विकास एडके, कोणाच्या भावना दुखावतील असे शब्द आपण वापरायला नको. माफी मागवावी. |
| श्री.अजीम अहेमद | :पुर्ण शहराबद्दल बोलणे चुकीचे आहे का? |
| श्री.नासेर सिद्दिकी | :समान पाणी वाटप झालेच पाहिजे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :समान पाणीपट्टी आणि टॅक्स वसुली झालीच पाहिजे. |
| मा.महापौर | :तुम्ही जो शब्द प्रयोग या ठिकाणी केला त्याची माफी मागावी. |
| श्री.विकास एडके | :काय चुकीचे शब्द बोललो ते सांगावे. |
| मा.महापौर | :सिडको हडकोच्या बाबतीमध्ये त्यांच्या भावना दुखावणारा तो शब्द आहे. त्याबद्दल जर माफी मागणार नसाल तर कारवाई करावी लागेल. |

| | |
|---|---|
| श्री.नासेर सिद्दिकी | :ते काही चुकीचे शब्द बोललेच नाही. |
| श्री.भगवान घडमोडे | :त्यांनी त्यांच्या वार्डाबद्दल बोलावे. सिडको हडको बद्दल त्यांना बोलण्याचा काहीच हक्क नाही. एमआयएम चे आमदार मा.इम्तियाज जलील यांना सिडको हडकोचे मतदान मिळाले नाही म्हणुन एमआयएम सिडको हडकोचा विरोध करत आहे का? |
| श्री.राजगौरव वानखेडे | :सभागृहाची माफी मागणे गरजेचे आहे त्यांनी ती मागायला पाहिजे. |
| श्री.फेरोज खान | :श्री.विकास एडके यांनी जर काही चुकीचे शब्द बोलले असतील तर मिनिट्स चेक करावे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडे | :आधी रेकॉर्डींग बघावी नंतर बोलावे. |
| मा.महापौर | :स.नगरसेवक श्री.विकास एडके आपण जे आक्षेपार्ह शब्द वापरले आहेत जर सभागृहाची दिलगिरी मागत नसाल तर आपले एक दिवसाकरिता या ठिकाणी सभा सदस्यत्व रद्द करण्यात येत आहे.<br>स.सदस्यांना विनंती आहे की, पाणी प्रश्नावर शांतपणे चर्चा करावी. |
| श्री.भगवान घडमोडे | :पाण्याचा प्रश्न पुर्ण शहरामध्ये गंभीर होत चाललेला आहे. त्यामुळे त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. फक्त सभागृहामध्ये बोलुन प्रश्न सुटणार नाही. |
| मा.महापौर | :श्री.एडके तुमच्यावर सभागृहात कारवाई केलेली आहे. सभागृहाचे कामकाज पुढे चालु करायचे असेल तर कृपया करुन तुम्ही बाहेर जावे. |
| श्री.विकास एडके | :जे काही शब्द बोललो असेल ते मिनिट्स चेक करुन बघावे. मी फक्त सिडको हडकोच नाही तर पुर्ण शहरामध्ये समान पाणी वाटप व्हायला पाहिजे आणि सिडको हडकोमध्येच लोक राहत नाही, पुर्ण औरंगाबाद शहरामध्ये लोक राहतात असे बोललो. तुम्हाला जर वाटत असेल की मी काही चुकीचे बोललो किंवा कोणाचे मन दु:खावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. |
| मा.महापौर | :श्री.विकास एडके यांनी या सभागृहाची दिलगिरी व्यक्त केलेली आहे. त्यांच्यावर केलेली कारवाई निलंबनाची मागे घेण्यात येत आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :अनेक दिवसापासुन शहरामध्ये पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. आजच्या या सभेमध्ये समान पाणी वाटप या प्रश्नाबाबतचा निर्णय झाला पाहिजे. अनेक वर्षापासुन मागणी केली जाते की, शहरामध्ये समान पाणी वाटप करा. प्रशासनाकडुन या ठिकाणी खुलासा करण्यात यावा की, प्रत्येक वार्डामध्ये लिगल कनेक्शन किती आहेत? आणि जे काही केंद्र शासनाने अथवा राज्य शासनाने दरडोई पाण्याचे जे प्रमाण ठरवलेले आहे की, एका घराला किमान तेवढ पाणी महानगरपालिकेने दिले पाहिजे. ज्या वार्डात असलेले (लिगल कनेक्शन x तेवढे लिटर पाणी) तेवढेच पाणी त्या वार्डाला दिले गेले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मागच्या दोन तीन दिवसापासुन या शहरामध्ये पाणी पुरवठा दुरुस्त करण्याच्या नावाखाली प्रशासनाने काही बदल केले. ज्या ज्या वार्डामध्ये रेगुलर पाणी चालु होते ते तर बंद केले, परंतु ज्या वार्डामध्ये यांच्या अगोदर पाणी येत नव्हते, ज्यांना चार-पाच दिवसाआड पाणी यायचे त्यांना आता सहा-सात दिवसाआड पाणी येत आहे. प्रशासनाकडुन प्रत्येक वार्डामध्ये लिगल कनेक्शन किती आहे? याची माहिती सभागृहात सादर |

करावी. आणि जितके पण लिगल कनेक्शन असतील त्या सर्वांना समान पाणी वाटप करण्यात यावे.

श्रीमती सिमा खरात :माझ्या वार्डात पाचव्या दिवशी पाणी येत आहे. काल पाच वाजता येणार. पाणी रात्री अकरा वाजता आले आणि ते ही फक्त ३५ मिनिटेच आले. लाईनमनला सांगितले की, पाचव्या दिवशी पाणी सोडतो आहे तर किमान पाच ते दहा मी. पाणी जास्त वेळ सोडा तर ते सांगतात की, श्री.पदमे साहेबांना फोन लावायला सांगा, श्री.चहल साहेबांना फोन लावायला सांगा मग आम्ही पाणी जास्त वेळ सोडतो. १००% टॅक्स भरणार वार्ड आहे. असे चालु असेल तर पाणी कसे भरायचे. दोन दिवसाआड पाणी पुरवठा करावा. पाण्याची वेळ नियोजित करा.

श्री.नासेर सिद्दीकी :दररोज आपण १३५ एमएलडी पाणी आणत असतो. आणि प्रत्येक वार्डात पाच दिवसाआड पाणी येत असेल तर मधल्या दिवसातले पाणी कुठे जात आहे? याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.शिवाजी दांडगे :गेल्या तीन महिन्यापासुन सिडको हडकोच्या एन-५ टाकीवरुन पाणी प्रश्न निर्माण झालेला आहे. तीन महिन्यापासुन बरेच गॅप आणि तीन दिवसाआडची भुमिका प्रशासनाने घेतली. सिडको-हडकोची पाण्याची रिक्वॉयरमेंट किती आहे? आणि येणार पाणी सध्याला किती आहे? एक्सप्रेस लाईनवर कशामुळे कनेक्शन घेतले ते घेता येते का? हे सुध्दा वाचुन दाखवावे. एन-५ च्या टाकीवर किती टँकर चालु झाले आहे? आणि ते पाणी कोणत्या भागात दिले जाते? हे सांगण्यात यावे.

श्री.मकरंद कुलकर्णी :मागच्या सात ते आठ दिवसापासुन सिडको-हडकोला येणारे पाणी खुप मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. मेन लाईनवर किती लोकांनी कनेक्शन घेतलेले आहेत? त्यांना कनेक्शन घेण्याचे अधिकार आहे का? आणि ते रेगुलाईज करण्याचे पण अधिकार आहे का? याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.आत्माराम पवार :पाण्याचा प्रश्न वार्डामध्ये वाढत चाललेला आहे. ज्या दिवशी दोन दिवसाआड पाणी येत होते आता ते सात-आठ दिवसावर येऊन ठेवले आहे. जी जनता पुर्ण टॅक्स, पुर्ण गुंठेवारी, पुर्ण पाणी पट्टी भरते त्यांना आपण पुर्ण सुविधा का देत नाहीत? लोकांचा पुंडलिकनगरच्या टाकीवर पुर्ण आक्रोश तयार झालेला आहे. येत्या दोन दिवसावर पाणी दिले तर लोक शांत बसतील, नाही तर टाकीवर वाल सुध्दा ओपन करु देणार नाही. अशी पुर्ण वार्डाच्या जनतेची भुमिका आहे.

श्री.राहुल सोनवणे :माझ्या वार्डातील श्री.अर्जुन हिवाळे नावाच्या व्यक्तीने तीन वर्षापासुन पाणीपट्टी नळ घेण्यासाठी पैसे भरलेले आहेत. पण महानगरपालिकेच्या वतीने त्याला आता पर्यंत सुध्दा नळ कनेक्शन देण्यात आलेले नाही. त्याने दोन दिवस इथे उपोषण सुध्दा केलेले आहे. स्लमचे लोक हे टॅक्स भरतात पण वारंवार त्यांची बदनामी केली जाते. स्लममध्ये सुध्दा पाणी पट्टी भरणारे लोक आहेत.

मा.महापौर :श्री.चहल आपण प्रत्येक सदस्य या ठिकाणी ज्या समस्या मांडत आहेत ते लिहुन घ्यावे. त्याचे उत्तर तुम्हाला द्यायचे आहे.

श्रीमती मिना गायके :माझ्या वार्डात टाकी असुन सुध्दा वार्डाला एकही थेंब पाणी मिळत नाही. फोन केल्यावर कोणीच उचलत नाही. माझ्या वार्डातील लोक टॅक्स भरत नाही का?

पाणी पट्टी भरत नाही का? मग माझ्याच वेळेस पाणी नाही सांगतात. सहा वाजता येणार पाणी यांनी बारा वाजता दिले.

श्री.मोहन मेघावाले :सिडको-हडकोच्या प्रश्नावर श्रीमती सिमाताई खरात बोलल्या नंतर काही सदस्यांना राग आला. सगळ्यात जास्त टॅक्स, पाणी पट्टी जे काही असेल ते सिडको-हडकोतील नागरीक भरत असतात. काही भागामध्ये तीन दिवसआड पाणी केलेले आहे. माझ्या वार्डात ५०% च्यावर स्लम भाग आहे. सिध्दार्थ नगर मध्ये सहा महिन्यापासुन दुषित पाणी येत आहे. माझ्या घरी आज ५० मुस्लिम समाजाचे लोक आले होते. रमजानचा महिना हा आपल्या पवित्र श्रावण महिन्या सारखा आहे. त्या लोकांनी विनंती केली की, या रमजानच्या महिन्यामध्ये तरी आम्हाला पाणी चांगले द्या. रोजाबागचा पण असाच प्रश्न आहे. श्री.चहल यांना सांगुन सुध्दा अजुन पण दुषित पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही.

श्री.मनोज बल्लाळ :मागील सहा महिन्यापासुन मोंढा भागामध्ये जलवाहिनी फुटलेली आहे. रोज लाखो लिटर पाणी वाया जात आहे. ते काम कधी करणार आहे?

श्रीमती ज्योती पिंजरकर :माझ्या वार्डात सुध्दा तिसऱ्या दिवसापासुन पाणी येत आहे. माझ्या वार्डातुन सुध्दा लोक १००% टॅक्स भरतात, पाणी पट्टी भरतात. वार्डात फक्त ३५ मी. पाणी येत आहे. एक तास पाणी देण्यात यावे.

श्रीमती सिमा चक्रनारायण:बजरंगनगर, इंदिरानगर, काब्रानगर या भागामध्ये दुषित पाणी येत आहे. तिरुपती विहार, मोरेश्वर सोसायटी या भागामध्ये दोन दिवसाआड पाणी येत होते आता ते तीन दिवसावर केले आहे. ज्या प्रमाणे दिवस वाढवतात. त्या प्रमाणे पाण्याचा वेळ वाढवता का?

श्रीमती माधुरी देशमुख :अधिकाऱ्यांना प्रत्येक वार्डातील समस्या माहित आहे का? कारण वर्षापासुन आम्ही त्याच समस्या सांगत असतो. परंतु त्याच्यावर काहीच कार्यवाही होत नाही. एन-५ च्या टाकीवरच्या प्रत्येक समस्या यांना आम्ही सांगितलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागाने या समस्या सोडवण्यासाठी काय पाऊल उचललेले आहे ते सांगावे? तर एखाद्या वार्डाला दोन दिवसाआड पाणी देत असतील तर सिडको हडकोच्या सर्व भागाला यांनी दोन दिवसाआडच पाणी द्यावे.

श्रीमती सायली जमादार :मागच्या सभेमध्ये आदेश दिले होते की, सातारा देवळाईमध्ये मोफत टँकर चालु करणार आहोत. परंतु अद्याप ते चालु झालेले नाहीत.

श्रीमती सायरा बानो :Old City मध्ये ९०% लोक पाण्याचा टॅक्स भरतात. त्यांच्याकडे सुध्दा सहा दिवसाआड पाणी येत आहे. समान पाणी पुरवठा करण्यात यावा. या रमजानच्या पवित्र महिन्यामध्ये तरी दोन दिवसाआड पाणी देण्यात यावे.

श्रीमती सुरेखा सानप :फुले नगरमध्ये पाण्याची समस्या खुप जास्त प्रमाणात आहे. श्री.चहल यांनी आज पर्यंत तेथे येऊन तिथली समस्या जाणुन घेतलेली नाही. रिक्षा स्टॅण्ड, मस्जिद गल्ली या ठिकाणी दुषित पाणी येत आहे. आणि वार्डातील ५०% लोकांना पाण्याची पाईप लाईन मिळालेली नाही. १९८२ मध्ये ब्रिजवाडी हे गाव महानगरपालिकेत आल्यापासुन आज पर्यंत अर्ध्या ब्रिजवाडी भागाला पाणी नाही.

| | |
|---|---|
| श्रीमती सलिमा बेगम | :माझ्या वार्डात हमालवाड्यात ४० वर्षापुर्वीची जुनी पाण्याची लाईन आहे. खुप दुषित पाणी येत आहे. आता पर्यंत तिथे काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. खुप कमी दाबाने पाण्याचा प्रवाह होत आहे. वार्डातील काही घरांना पाण्याचे नळ कनेक्शन सुध्दा नाही. |
| श्री.अजीम अहेमद | :आमच्या वार्डात पाच-सहा दिवसाआड पाणी येत आहे. रमजानच्या दोन महिन्याकरिता तरी दोन दिवसाआड चांगले पाणी देण्यात यावे. |
| श्रीमती पुष्पा रोजतकर | :वार्ड क्र.०६, यादव नगरमध्ये दोन ठिकाणी दुषित पाणी येत आहे. सहा महिन्यापासुन सांगत आहे. अजुन सुध्दा कोणीच याची दखल घेत नाही. वार्डात पाण्याची पाईप लाईन टाकुन द्यावी. |
| श्रीमती ज्योती मोरे | :आदर्श कॉलनीमध्ये चौथ्या दिवशी कमी दाबाने पाणी येत आहे. १००% पाणीपट्टी भरणारा वार्ड आहे. |
| श्रीमती ज्योती नाडे | :वार्डात पाणी वेळेवर येत नाही. आता पर्यंत काहीच नियोजन केले नाही. महादेव गल्ली, हनुमान चौक, साठे नगर या भागामध्ये दुषित पाणी येत आहे. |
| श्री.मोहन मेघावाले | :माझ्या वार्डात सलिम अली सरोवरमध्ये एसटीपी प्लांट आहे. त्या भागातील नागरिक सांगतात की, येथे रात्रं-दिवस पाण्याचे टँकर चालु असतात. कार्यकर्त्यांना बघायला लावल्यावर १०-१५ टँकर दिवस रात्र चालु होते. कार्यकर्त्यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला तर ते लोक दगड घेऊन मागे लागले होते. त्यांना बोलायला गेलो तर ते सांगतात की, आम्ही महापालिकेच्या परवानगीने आलो आहोत. आम्हाला श्री.अफसर, श्री.चहल साहेबांनी सांगितले आहे. श्री.चहल यांनी दोन टँकर वाल्यांना परवानगी दिलेली आहे. त्याच्या नावाखाली २०-२५ टँकर चालु आहे. या दोन टँकरांना परवानगी दिली किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.बन्सी जाधव | :वार्ड क्र.२ भगतसिंग नगर, म्हसोबा नगर या भागात सहा दिवसाआड पाणी येत आहे. वार्डाला १००% पाणी देण्यात यावे. |
| श्री.गोकुलसिंग मलके | :नारेगावामध्ये कचऱ्या सारखीच समस्या पाण्याची पण आहे. वार्डात ४५-५० टक्के लोकांना पाणी मिळते. पाईप लाईनचे काम झालेले नाही, टँकरची व्यवस्था नाही, पाण्याची सुविधा नाही. पाईप लाईन टाकण्यासाठी नवीन इस्टीमेंन्ट बनवण्याचे आदेशित करावे. |
| श्रीमती शोभा वळसे | :चार दिवसाआड पाणी येत आहे, पाण्याचा दाब खुप कमी असतो. एका ठिकाणी कार्यक्रम असतांना फोन केला तर टँकर उपलब्ध नाही असे सांगतात. सिडको-हडकोला दोन दिवसाआड पाणी देण्यात यावे. |
| श्री.अब्दुल नविद | :वार्ड क्र.१०५ राहुल नगर, सादातनगरमध्ये कंटॅमेनेश्नच्या प्रश्नाबाबत श्री.चहल यांना वेळो-वेळी पत्र व्यवहार केलेला आहे. गल्ली नं.दोन आणि गल्ली नं.चार मामा चौक, बुध्दविहार जवळ गल्लीची अवस्था खुप बिकट आहे. सप्लाय आहे पण त्या गल्ल्यांना पाणी येत नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :मागच्या बैठकीमध्ये किती टँकर बाहेर जातात? किती टँकरचे पैसे येतात? किती टँकर विकली जातात? किती टँकरवर जी.पी.एस सिस्टम बसवण्यात आले? याचा खुलासा अजुन झालेला नाही. पाणी देत असतांना आपण वसाहतीच्या लोकांना देतो का खाजगी लोकांना सुध्दा विकत असतो. आणि |

फक्त वसाहतीमध्ये देत असाल तर यामध्ये कोणाचाही आक्षेप नसावा. खाजगी बिल्डर्स असतील, बांधकाम असतील त्या ठिकाणी जर पाणी विकल्या जात असेल तर ते थांबवण्यात यावे. क्रांती चौकच्या टाकीवरुन आठ-दहा वार्डांना पाणी जात आहे. टाकीवरुन ज्या-ज्या भागाला सप्लाय आहे त्या भागातील नगरसेवकांना बोलावुन त्यांच्या अडचणी काय आहे? त्याच्यातुन चांगला मार्ग काय काढता येईल याचा विचार केला पाहिजे. जवाहर कॉलनी, भानुदास नगर या भागात पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. क्रांती चौकमध्ये पाणी चालु असतांना मागचा सप्लाय थांबवता येत नाही. दोघांपैकी पुढच्या किंवा मागच्या सप्लायने आधी पाणी चालु असायला पाहिजे. अशाने त्या भागामध्ये पाणी पुरवठा विस्कळीत होणार नाही? पुर्ण समस्या दुर करण्यासाठी आर्थिक बजेटमध्ये तरतुद करणे गरजेचे आहे. रस्त्यांच्या विषयामध्ये जे निवेदन मा.कोर्टामध्ये मांडणार आहोत आणि त्या नंतर नवीन दर नुसार जी अमाऊंट उरेल त्या पैकी काही रस्ते करुन रु.पाच-एक कोटी रुपये पाण्याच्या मेंटेनन्ससाठी देता येऊ शकते का? याचा ही विचार या ठिकाणी झाला पाहिजे.

श्री.राजगौरव वानखेडे :आम्ही ज्या सुचना सभागृहामध्ये देतो त्याची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेची आहे. ५० ग्रीनच्या संदर्भामध्ये त्या योजनेला पाणी देणार आहे. आपण जर ५० ग्रीनला पाणी दिले तर त्या आजु- बाजुच्या भागाला सुध्दा पाणी देण्यात यावे. जो पर्यंत जायकवाडीतुन मोठी लाईन आणत नाही तो पर्यंत नवीन लाईन जोडु नये.

श्री.भाऊसाहेब जगताप :बऱ्याच वार्डामध्ये पाण्याचे पाईप लाईन लिकेज आहे. ते काढल्यावर पाण्याचा प्रोब्लेम सॉल होईल. बऱ्याच ठिकाणी नाल्या लगतची पाईप लाईन लिकेज आहे. पाणी पुरवठा विभागात कर्मचारी कमी असतांना आऊट सोर्सिंगच्या माध्यमातुन कर्मचारी घेतले. याचा काहीच फायदा झाला नाही. प्रत्येक वार्डामध्ये किती लिकिजेस आहे? किती इलिगल कनेक्शन आहेत? माझ्या वार्डातील मुख्य पाण्याच्या लाईनवर २००-२५० कनेक्शन इलिगल आहेत. ते काढण्यासाठी मागणी केली होती पण ते काढण्यात आले नाही. संतोषीमाता नगरला फक्त २० मी. पाणी येत आहे. आजु बाजुच्या वार्डाला ४० मी. पाणी दिले जाते. मग संतोषीमाता नगरलाच का कमी प्रमाणात पाणी दिले जाते? तिथे पण समान पाणी देण्यात यावे.

श्री.आत्माराम पवार :हनुमान नगर, पुंडलिकनगर, न्याय नगर, गुरुदत्त नगर, गजानन नगर या भागामध्ये एकाच दिवशी तीन वेळेस पाण्याची टाकी भरावी लागते. खुप कमी दाबाने पाणी येत आहे. दोन दिवसाचा सप्लाय वेगळा करायला पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :पाण्याच्या अडचणी काय आहे? नियोजन केले का? याचा लेखाजोखा सभागृहात मांडला गेला पाहिजे. रोज बारा वाजेच्या नंतर एन-५ ला पडणारे पाणी बंद होत आहे. सगळे अधिकारी आणि सगळे लाईनमन एका ठिकाणी बोलावुन बैठक घेऊन ही समस्या दुर केली पाहिजे.

श्रीमती स्मिता घोगरे :माझ्या वार्डात धरती धन हौसिंग सोसायटी जवळ चार विहीरी आहेत. तिथे पाईप लाईन टाकलेली आहे. त्यांना विहीर स्वच्छ करुन देण्याचे सांगितले

होते. चार ही विहीरीचे टेंडर काढलेले आहेत. परंतु अजुनही साफ सफाई केलेली नाही.

मा.महापौर :सदस्यांनी जे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले आहेत. त्या अनुषंगाने आपण सर्व मुद्दे लिहुन घेतले असे गृहित धरुन ताकीद देण्यात येत आहे की, जे सभागृहात आपण नियोजन करुन उत्तर देतील जर त्याची अंमलबजावणी होत असेल तरच सदस्यांना उत्तर द्यावे. जे काही नियोजन करणार आहात त्याची माहिती सदस्यांना आणि पदाधिकाऱ्यांना द्यावी. मागच्या सभेमध्ये तीन दिवसाआड पाणी पुरवठा सुरळित करतो म्हणुन सांगितले होते, त्याला आता पंधरा दिवस पुर्ण झाले आहे. स.सदस्यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा. सगळ्यात आधी इलिगल कनेक्शन आणि १३५ एमएलडी पाणी याचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :शहराला आजच्या तारखेला २२५ एमएलडी पाण्याची अवश्यकता आहे. जायकवाडीतुन १५५ एमएलडी पाणी लिफ्ट केले जाते. शहरातील कोणत्या टाकीवरुन किती पाणी जात आहे त्याचे ऑडिट करण्याचे पाण्याचे टेंडर काढले आहे. त्याचे दोन दिवसात सबमिशन होणार आहे.

श्री.राजु शिंदे :शहरामध्ये कमर्शिअल इनलिगल कनेक्शन किती आहे?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :शहरामध्ये ५० टक्के इनलिगल कनेक्शन आणि कमर्शियल दोन हजार आहे.

श्री.राजु शिंदे :तीस हजार कनेक्शन कमर्शिअल असले पाहिजे. १५-२० वर्षात आपल्याकडे फक्त दोन हजार कनेक्शन आहे. पाणीपट्टी रेसिडेंशिअल किती भरावी लागते? अर्धा इंच कमर्शियलचा दर किती आहे?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :रु.४,०५०/- अर्ध्या इंचला आहे आणि कमर्शियल रु.११,०००/- रुपये आहे.

श्री.राजु शिंदे :एकाही कमर्शियलचा एक इंचच्या खाली कनेक्शन नाही. पंन्नास हजार इल्लिगल कनेक्शन सापडतील आणि हे कनेक्शन जर शोधुन लिगल करुन घेतले तर जे दिड लाख कनेक्शन आहेत त्याच्या दुप्पट पैसे मिळतील.

मा.महापौर :इंडस्ट्रीयलला २० टक्के पाणी कमी केले का?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :अगोदर त्यांना चार तास पाणी देत होतो. आता त्यांना तीन तास पाणी देत आहोत. म्हणजे २० टक्के पाणी कमी केले आहे.

श्री.राजु शिंदे :औद्योगिकचे पाणी कमी करणार पण कमर्शिअल कनेक्शन्स् कधी शोधणार आहे? सगळे लिकेज बंद केले तर सुरळित पाणी पुरवठा होईल.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :इल्लिगल कनेक्शनमध्ये टप्या-टप्याने कार्यवाही करावी लागेल. क्रांती चौक टाकीतुन शहागंजची जी मेनलाईन आहे त्याच्यावर जे ३०० ते ४०० कनेक्शन आहे. ते कट करण्यासाठी कार्यवाही केली जाईल.

श्री.राजु शिंदे :पाण्याच्या टाकीवरुन टँकर भरुन जात आहे. याची चौकशी करावी.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :टँकरला जी.पी.एस सिस्टम लावण्यात आले आहे.

श्री.राजु शिंदे :जे टँकर भाड्याने लावलेले आहेत त्यांना महापालिकेच्या नावाचा बोर्ड लावण्यात यावा. आणि असे किती टँकर चालु आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :खाजगी टँकर महापालिकेच्या नावाने चालतात. त्यांच्यावर महापालिकेचे नाव टाकण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :नाव टाकत असतांना त्यांच्यावर नंबर सुध्दा टाकण्यात यावे.

मा.महापौर :सगळे जे भाड्याने चालणारे टँकर आहेत त्यांच्यावर नाव आणि नंबर पेन्ट करण्यात यावे. आणि कमर्शिअल इलिगल कनेक्शन ज्यांच्याकडे आहेत त्याच्यावर गुन्हे दाखल करा आणि रिकव्हरी सहित करा.

श्री.त्र्यंबक तुपे :टँकरवर नाव आणि नंबर टाकावेत. किती भागामध्ये जातात? त्याची नोंद आणि याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :सर्व स.सदस्यांना प्रत्येक सर्वसाधारण सभेमध्ये एक महिन्याभराचा टँकरचा रिपोर्ट विषय पत्रिकेसोबत सर्क्युलेट करावा.

श्री.भगवान घडमोडे :नगरसेवकांनी सांगितले या नावाखाली वार्डात टँकर चालु असतात. पण त्या नगरसेवकाला काहीच माहित नसते की, आपल्या वार्डात आपल्या नावाखाली किती टँकर येतात?

मा.महापौर :विषय पत्रिकेत पुर्ण महिन्याचा टँकरचा अहवाल आणि कोणाच्या नावाने टँकर जातात? त्याचा संपुर्ण रिपोर्ट विषय पत्रिकेसोबत जोडून यावा.

श्री.भगवान घडमोडे :दिपाली हॉटेल पासुन ते चिकलठाणा पर्यंत ज्यांचे लिगल कनेक्शन होते त्यांच्यावर सुध्दा कार्यवाही केली होती आणि मुकूंदवाडी पोलिस स्टेशनच्या बाजुने आता सध्या लाईनवर इल्लिगल वाशिंग सेंटर आहे. ते आधी कट केले पाहिजे. इल्लिगल कनेक्शनचा प्रश्न हा अनेक वर्षापासुन चालु आहे. इल्लिगल कनेक्शनला अभय योजनेमध्ये तीन-चार हजार रुपये लावत असतो. पण सामान्य नागरिकांकडे तीन-चार हजार रुपये नाही आहे. तीन-चार हजार दर लावण्या पेक्षा २००-३०० रुपये लावावे. आणि वर्षाला जे बिल येईल त्याचे खाते उघडुन टाकावे त्यांच्या नावे बीले देण्यात यावेत. रेकॉर्डवर घ्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :जालना रोड सारख्या ज्या मुख्य लाईन आहेत, त्या शहरात किती ठिकाणी आहेत? ज्याने मुख्य लाईनवरून पाणी पुरवठा होतो. त्या किती किलो मीटरच्या लाईन आहेत?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :टाकी भरणारी मेन लाईन साठ किलो मीटर आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :कनेक्शन घेत असतांना नागरिकाने किती व्यासाच्या लाईनमधुन घ्यावा असे काही आपल्याकडे अटी, शर्ती, नियम आहे का? क्रांती चौकची मोठी लाईन आहे तिच्यावर ३००-४०० कनेक्शन आहे. बाकी ठिकाणी ४० किलो मीटरची मुख्य लाईन आहे तिच्यावर सुध्दा अनाधिकृत कनेक्शन आहे. असे एकुण कनेक्शन जर आपण काढले तर त्याची संख्या किती होते?

श्री.राजु शिंदे :नियम आहेत पण ते कायद्याने घेणाऱ्याला आहे. यांनी आधी ५० हजार कनेक्शन शोधावे तरच वार्डामध्ये यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :इतर ४० किलो मीटरमध्ये सुध्दा किमान हजार कनेक्शन कमर्शिअल असु शकतात. आठशे ते हजार कनेक्शनस् ज्या लाईनवरुन आपण देऊ शकत नाही. ज्यांनी हजार कनेक्शनस् घेतलेले आहेत त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही का करत नाही? नागरिकांनी किती व्यासाच्या लाईनवर कनेक्शन घ्यावे याचा पण खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :बेकायदेशिर कनेक्शन्स् कट करायचा जो ॲक्शन प्लॅन तयार करायचा आहे त्यामध्ये आधी कमर्शिअल टार्गेट करा त्याच्या नंतर घरगुती नळ कनेक्शनस्

बाबत कार्यवाही करा. मा.आयुक्त त्यांनी एक सक्षम अधिकारी या कारवाई करिता नियुक्त करुन द्यावे.

श्री.राजु शिंदे :रु.५० हजार कनेक्शनस् दोन महिन्यामध्ये शोधण्यात यावेत आणि त्यांच्यावर दंड लावण्यात यावा. पुढच्या सभे पर्यंत याचा अहवाल यावा.

श्री.सचिन खैरे :गुलमंडी आणि राजाबाजार या भागात सहा दिवसाआड पाणी येत आहे. याबाबत बैठक घेतली होती त्याचे आता पर्यंत काहीच झाले नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :हा अत्यंत गंभीर आणि महत्वाचा विषय आहे. अनाधिकृत कनेक्शन्स् शोधली गेली पाहिजेत.

श्री.गोकुलसिंग मलके :मागिल आठ वर्षापासुन माजी नगरसेवक श्री.मनिष दहिहंडे फ्री मध्ये टँकरने पाणी घेत आहे. तक्रार केल्यावर मागच्या महिन्यात श्री.पद्मे यांनी ते बंद केले आहे आणि माजी नगरसेवकाला टँकर फ्री मध्ये देण्याची सुविधा असेल तर तसे सांगण्यात यावे. अशी काही सुविधा नसेल तर आठ वर्षाचे त्यांच्याकडुन पैसे वसुल करण्यात यावेत.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :पुर्ण शहरामध्ये तीन दिवसाआड पाणी केले तर सगळ्यांना सुरळित पाणी देऊ शकतो. तरी पण प्रयत्न करु की, दोन दिवसाआड पाणी देता येते का?

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरामध्ये याच्या अगोदर जो पाणी पुरवठा चालु होता. त्यामध्ये आज पर्यंत कधी पाणी टंचाई निर्माण झाली नाही. परंतु मागच्या दोन महिन्यापासुन ज्या परिसरामध्ये नियमीतपणे व्यवस्थीत पाणी येत होते. त्या परिसरातील पाण्याला गॅप देऊन सिडको हडकोला पाणी देऊ असे आश्वासित केले होते. पण सिडको हडकोला ते पाणी मिळाले नाही. वार्डानुसार किती अनाधिकृत आणि किती अधिकृत कनेक्शन्स् आहेत?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :वार्डानुसार किती कनेक्शन्स् आहे याची माहिती घेऊन सांगतो.

मा.महापौर :सव्वा लाख अनाधिकृत कनेक्शनची जी यादी आहे ती सभागृहात सादर करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :याच्या आधी ज्या प्रमाणे पाण्याचे शेड्यूल होते त्या प्रमाणे शहराला पाणी पुरवठा झाला पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :पैठणगेट भागातील कोणत्याही वसाहतीला यांनी नळ कनेक्शन देऊन ठेवले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरामध्ये जो पाणी पुरवठा चालु होता तो पाणी पुरवठा बदलण्याच्या बाबतीमध्ये आपण कोणाकडुन परवानगी घेतली का? प्रशासन परस्पर कसे काय ठरवते? शहरामध्ये येणारे पाणी वाढवायचे कसे आणि शहराला जितकी आवश्यकता आहे ते द्यायचे कसे हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने याच्या बाबतीत विचार करायला पाहिजे.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :जी काही वस्तुस्थिती आहे ते मा.सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणुन द्यावी लागेल.

श्री.प्रमोद राठोड :एक्सप्रेस लाईनवरचे कनेक्शन्स् कमी करण्यासाठी मा.सुप्रिम कोर्टात जाण्याची गरज आहे का?

श्री.सय्यद मतीन :श्री.चहल यांनी सांगितले की, पुर्ण शहराला तीन दिवसाआड पाणी देऊ शकतो? याचा विचार केला पाहिजे. रमजानचा महिना चालु होणार आहे.

मस्जिदमध्ये पाण्याची खुप गरज असते. मस्जिदमध्ये तरी पाण्याचे टँकर चालु करण्यात यावे? आणि लाईटची पण व्यवस्था करण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहरामध्ये ज्या पध्दतीने पाणी पुरवठा होत होता. त्या पध्दतीनेच पाणी पुरवठा या ठिकाणी करावा. ज्या प्रभागात पाण्याची कमतरता होत असेल ते पाणी कसे वाढवता येईल? जायकवाडीतुन नक्षत्रवाडी पर्यंत कसे पाणी आणता येईल? हा प्रशासनाचा विषय आहे. प्रशासनाने याच्यावर अभ्यास करुन या ठिकाणी पूर्ण कार्यवाही करण्यात यावी. असे आदेश देण्यात यावेत.

श्रीमती सलिमा बेगम :माझ्या वार्डात हमालवाड्यामध्ये ४० वर्षापुर्वीची जुनी पाण्याची लाईन आहे. तिथे खुप दुषित पाणी येत आहे. आता पर्यंत तिथे काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही? लाईन दुरुस्त करुन द्यावी.

मा.महापौर :आधी ती लाईन त्वरीत दुरुस्त करुन देण्यात यावी.

मा.उपमहापौर :सिडको हडकोच्या संपुर्ण परिसराला दिड महिन्यापासुन पाणी नाही. त्या ठिकाणाचे नागरिक संपुर्ण पाणी पट्टी, घरपट्टी भरत असतात. मागच्या बऱ्याच दिवसापासुन ज्या पध्दतीने पाणी पुरवठा चालु होता आणि मध्येच या ठिकाणी पाच-सहा दिवसाआड पाणी पुरवठा का करण्यात आला? जायकवाडीपासुन पाणी पुरवठा होत होता आणि अचानक किती एमएलडी पाणी कमी झाले? कमी झाल्यामुळे फक्त हडको सिडको परिसरालाच का गॅप देण्यात आला? याचे कारण काय? ज्या प्रमाणे मागच्या २०-२५ वर्षापासुन सुरळित पाणी पुरवठा चालु होता. त्याच परिसराला का वेटीस धरले? मा.महापौर आपल्याला विनंती करायची आहे की, इथुन पुढे सिडको हडको परिसरामध्ये पाच-सहा दिवसाआड पाणी पुरवठा केला जाऊ नये. ज्या पध्दतीने आधी दोन दिवसाआड पाणी पुरवठा चालु होता. त्या पध्दतीनेच झाला पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे :आम्ही आपल्याशी सहमत आहोत. आमचा जो १५-२० वार्डांचा परिसर आहेत त्या ठिकाणाचा सुध्दा हाच मुद्दा आहे तेथेही दोन दिवसआड पाणी पुरवठा झाला पाहिजे. असे पण आदेशित करावे.

मा.उपमहापौर :एजन्सीच्या आधारे अनाधिकृत जे कनेक्शनस् असतील, ज्या वार्डात अनाधिकृत कनेक्शन असेल, कमर्शिअल असेल किंवा रहिवासी असेल ते काढण्यासाठी आदेशित करावे.

श्री.राजु शिंदे :सन २०१७-१८ मध्ये कमर्शिअलला अर्ध्या इंचसाठी रु.२०१५०/- आणि एका इंचसाठी रु.७४०००/- लावले आहे. हे लावले असतील तर पुर्ण शहराला आपण फ्री मध्ये पाणी देऊ शकतो. बाकीचे अनाधिकृत सोडले तरी चालेल पण आधी रु.५० हजार शोधुन द्यावे. मोठे उत्पन्न येऊ शकते.

श्री.मोहन मेघावाले :सलिम अली सरोवराबद्दल जे बोललो त्याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :सलिम अली सरोवरावर जे टँकर चालतात त्याच्या बाबतीत खुलासा करावा. तेथे जे टँकर चालतात ते अधिकृत आहे की अनाधिकृत त्यांना परवानगी दिलेली आहे का?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :पाणी भरण्यासाठी दोन टँकरांना आम्ही परवानगी दिलेली आहे. २ हजार लिटरच्या टँकरला ५० रु. पर ट्रिप आणि पाच हजार लिटरच्या टँकरला १००

रु. पर ट्रिप असे फिक्स करुन आम्ही एका पाण्याचे पैसे वसुल १८ हजार रु. केले आहे. आणि त्यांना बोअरचे पाणी भरण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री.मोहन मेघावाले :पाणी घेणारे नगरसेवक कोण आहेत?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :श्री.सिताराम सुरे यांना परवानगी दिली आहे. कारण त्यांनी पाणी घेण्यासाठी पैसे भरले आहेत.

श्री.मोहन मेघावाले :फक्त त्यांनाच पाणी देत आहात का? दुसरे कोणाला देतात?

कार्यकारी अभियंता(पा.पु) :दुसरे श्री.प्रदिप काळे यांना पाणी देत आहोत.

श्री.मोहन मेघावाले :याची पुर्ण अंमलबजावणी करावी. नंतर तिथले पाणी चालु करावे. माहिती घ्यावी व त्यानंतरच पाणी द्यावे.

मा.महापौर :याचा पुर्ण अहवाल माझ्याकडे आणुन द्यावा. या ठिकाणी तीन तासापासुन अत्यंत महत्वाच्या पाणी प्रश्नावर चर्चा करत असतांना अनेक मुद्दे समोर आले आहे. नियमित पाणी पुरवठ्याच्या सिस्टिममध्ये बदल करत असतांना कोणालाही प्रशासनाने विश्वासात घेतलेले नाहीत ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाने कुठलाही धोरणात्मक निर्णय घेत असतांना पदाधिकाऱ्यांसमोर हा विषय ठेवुन त्याची मान्यता घेऊन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते? परंतु तशा प्रकारची कुठलाही कार्यवाही न करता या ठिकाणी जी सिस्टिम नव्याने पाणी वितरण सुरु केलेली आहे त्या वितरण व्यवस्थे बाबत घेतलेला निर्णय हा मला संशयास्पद वाटतो. मा.आयुक्त यांनी माहिती घ्यावी की, पाणी वाटपाबाबत कोणाच्या अधिकाऱ्यामध्ये ही व्यवस्था बदलली त्याचा खुलासा करावा व त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन मा.महापौरांकडे सादर करावे. या ठिकाणी अनियमित पाणी पुरवठा सिडको-हडको भागात जाऊन बघितले आहे. त्या भागातील टाकीवर अनेकदा संबंधीत नगरसेवक त्या भागातील नागरिकांनी आंदोलने केले आहे. महिन्याभरामध्ये २-३ वेळेस हा प्रकार झालेला आहे. त्या भागातील रिक्वॉयरमेंट ३५ एमएलडी असतांना तेथे ५-६ एमएलडी म्हणजे ३० एमएलडीची तुट सिडको हडको भागामध्ये निर्माण झालेली आहे. हा फक्त सिडको हडकोच प्रश्न नाही तर जवळ-जवळ पुर्ण शहरामध्ये असाच प्रॉब्लेम निर्माण झालेला आहे. मी प्रशासनाला आदेशित करतो की, पुर्वीची जी सिस्टिम चालु होती, ज्या पध्दतीने पुर्वी पाणी वितरण व्यवस्था सुरु होती त्याच पध्दतीने आता सुध्दा पाणी पुरवठा व्यवस्था सुरु ठेवावी अशा प्रकारचे आदेश देण्यात येते. त्यात कुठल्याच प्रकारचा बदल पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतल्या शिवाय करु नये. जे अश्वासन दिले होते की, जायकवाडीतुन पाणी वाढविण्याकरिता पंपाची दुरुस्ती करण्यात येईल. पंपाची दुरुस्ती झाल्यानंतर नक्षत्रवाडीला पाणी वाढेल. त्याच्या नंतर शहरातील बऱ्याच नागरिकांना रिलिफ मिळेल. परंतु त्याचे काय झाले? अजुनही सर्वसाधारण सभेसमोर त्याचा अहवाल दिलेला नाही. त्याचा सुध्दा तात्काळ अहवाल सभेसमोर द्यायचा आहे. तज्ञाच्या माध्यमातुन जी दुरुस्ती करण्यात आली त्याचा संपुर्ण अहवाल पदाधिकाऱ्यासमोर दोन दिवसामध्ये सादर करावा. अनाधिकृत कनेक्शनच्या बाबतीत त्याची यादी आपल्याकडे आयडेंटिफाय आहे. अशा यादीतुन पहिल्या टप्प्यामध्ये कमर्शिअल जे अनाधिकृत कनेक्शनस् आहेत त्या अनाधिकृत

कनेक्शन धारकांवर तात्काळ नळ कनेक्शन कट करण्याची कारवाई करायची आहे. जागेवर जर नियमित करता येत असेल तर नाममात्र दंड लावुन ते नियमित करायचे. मा.आयुक्तांना सुचना देण्यात येतात की, या कामाकरिता एखादी अनुभवी खाजगी एजन्सी ज्याच्या माध्यमातुन आधी अशा प्रकारचा काम केल्याचा अनुभव असेल अशा एजन्सीची तात्काळ नियुक्ती करायची आहे. अशा एजन्सीच्या माध्यमातुन तात्काळ अनाधिकृत कमर्शिअल नळ कनेक्शन्स् शोधुन त्यांच्यावर कारवाई करणे, त्यांना नियमित करण्याकरिता नियमानुसार नियमित जी पाणीपट्टी आहे ती वसुल करणे, आणि त्याची जर इच्छा नसेल तर वेळ प्रसंगी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची कारवाई प्रशासनाने करावी. आठ दहा वर्षापासुन जर पाणी घेत असतील त्याचे सुध्दा विश्लेषण करुन त्यांच्या बाबतीत सुध्दा एक रिकव्हरी सुट दाखल करावे. प्रशासनाने याच्या बाबतीत नागरिकांना वेळीच सुचना देणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे जाऊन त्यांना विश्वासात घेऊन अशा प्रकारची कारवाई करता येत नसेल तर वेळ प्रसंगी पोलिसांची मदत घेण्यात यावी. आणि तात्काळ नळ कनेक्शन तोडणे बाबत त्यांच्यावर कारवाई करणे बाबत खाजगी एजन्सी मार्फत कारवाई करावी. उद्या जर टँकर सुरु नाही झाले तर कारवाई करण्यात येईल. टँकरच्या बाबतीत खाजगी पाण्याचे टँकर त्याच्यावर जी.पी.एस सिस्टम लावणे अत्यंत अवश्यक आहे. पाण्याच्या टँकरवर पिवळा आणि निळ्या रंगामध्ये महानगरपालिकेचा कोड आणि नाव टाकणे आवश्यक आहे. आणि याचा दर महिन्याला टँकरचा अहवाल मा.नगर सचिव यांच्याकडे द्यायचा आहे. टँकरचा विषय सुध्दा पुरवणी विषय पत्रिकेसोबत सर्व स.पालिका सदस्यांना देणे बाबत आदेशित करण्यात येत आहे. टँकरच्या पाण्याचे ऑडिट सुध्दा तात्काळ करुन घ्यायचे आहे. अंदाजपत्रक प्रलंबित असल्याबाबत स.सदस्यांनी या ठिकाणी तक्रार केली आहे. **श्री.चहल यांना मागच्या दोन बैठ**कीमध्ये आदेशित करण्यात आले होते. कुठल्याच प्रकारचे अंदाजपत्रक प्रलंबित राहता कामा नये. वॉशिंग सेंटर्सच्या कनेक्शनस्च्या कारवाईचा सुध्दा प्रमुख मुद्दा असला पाहिजे. श्री.बापु घडमोडे यांनी सांगितले की, घरगुती नळ लिगल करिता आपले दर जास्त आहेत. लिगल करत असतांना घरगुती उद्देशा करता त्याला जास्त दर असल्यामुळे लोक नियमित करण्या करिता पुढे येत नाहीत. घरगुती करिता नाममात्र १०० ते ५०० रु. किमान अशा प्रकारचे दंड लावुन जी काही पाणीपट्टी असेल ती एक वर्षाची आगाऊ घेऊन त्यांना सुध्दा नियमित करुन द्या. दुषित पाण्याच्या बाबतीत अनेक तक्रार या ठिकाणी आहेत. दुषित पाण्याचा तात्काळ शोध घ्यायचा आहे. स.सदस्यांनी दुषित पाण्याबाबत केलेल्या तक्रारींचा २४ तासामध्ये आयडेंटीफाय करुन काम सुरु करावे. मेन लाईन वरचे कनेक्शन एक्सप्रेस लाईन होती तिला पॅसेंजर करुन टाकली. मेन लाईनवर अनेक कनेक्शन्स् आहेत. औद्योगिक वसाहतींचे पाणी कमी करण्याकरिता त्याचा सुध्दा अहवाल अजुन अप्राप्त आहे. त्याच्यावर काय कारवाई केली? मेनलाईन वर कनेक्शन देता येत नाही. जे दिलेत ते तात्काळ बंद करा. आणि कायदेशिर त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगी आणि बांधकाम

पुर्णत्वाचे प्रमाणपत्र हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे. अनाधिकृत कनेक्शनची शोध मोहिम घेत असतांना त्याच्यात मालमत्ता कर केव्हा पासुन लागलेला आहे? बिल्डींग परमिशन किंवा कम्पलिशन या तिघांचे निकष लावुन तारीख जी असेल त्या पध्दतीने त्याच्यावर पाणीपट्टी रिकव्हरीचे डिमांड नोट दिली गेली पाहिजे. सर्व पाणी पुरवठा अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतात की, आपण स.नगरसेवकांचे फोन उचलले पाहिजेत. अशा प्रकारच्या जर तक्रारी वाढत असतील योग्य नाही. टँकरच्या अपघाताच्या विषयाबाबत एन-५ च्या टाकीवरुन निघतांना टँकरचा नियंत्रित वेग असला पाहिजे. अपघाताचे प्रमाण सुध्दा वाढत चाललेले आहेत. त्याच्यावर लक्ष दिले पाहिजे याबाबत सुचना करा. जलवाहिणी दुरुस्ती लाखो लिटर पाणी त्या जलवाहिनीमधुन वाहत आहे. ते ताबडतोब बंद करणे अवश्यक आहे. श्रीमती.सानप ताईंच्या वार्डातले टेंडर आहे. श्री.घडमोडे साहेबांनी सुचना केली की, अशा या आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये मा.आयुक्त जॉईंन झाल्यानंतर एक बैठकीचे आयोजन करणे अवश्यक आहे ती लवकर करावी. ज्या काही विहीरी असतील त्या सफाई करुन त्यांचे वापरण्याकरिता पाणी घेत असतो. पुर्वीच्या रेकॉर्डवरच्या ज्या विहीरीचे असतील त्या विहीरींमध्ये आपण मोटर बसुन त्याचे पाणी घेत होतो अशा विहीरी सुध्दा तात्काळ ते काम हातात घेणे अवश्यक आहे. सातारा देवळाईच्या निर्णयाची प्रत तुम्हाला दिलेली आहे. सातारा देवळाईमध्ये टँकरने पाणी देण्याचे नियोजन करायचे आहे. इनलिगल नळ कनेक्शनची यादी ही संपुर्ण स.सदस्यांना या ठिकाणी देण्यात यावी. पाणी पट्टी वसुली जी थकबाकी आहे त्याच्या करिता सुध्दा मा.आयुक्तांबरोबर चर्चा करुन तात्काळ नियोजन करायचे आहे. मी मा.आयुक्तांना सुचित करतो की, या विभागाकरिता या आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये अजुन अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येऊ शकते का? ताबडतोब त्या पध्दतीने चार्ट बनवुन प्रशासकीय स्थरावर एक कार्यकारी अभियंता आणि उच्च पदीस्थ अधिकारी ताबडतोब या परिस्थितीमध्ये नियुक्त करावा. कमर्शियल टँकर शहरामध्ये जर सुरु असतील आणि काही ठिकाणी पाणी चोरी होत असेल, असे कोणी निदर्शनास आणुन दिले तर त्या एजन्सीवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश सुध्दा या सभागृहामध्ये देण्यात येत आहे. अशा पध्दतीने सगळे नियोजन करत असतांना या पुर्वी सुध्दा अनेकदा वेगवेगळ्या पध्दतीने आदेश देण्यात आले आहेत परंतु त्याची अंमलबजावणी पाणी पुरवठा विभागाकडुन व्यवस्थीत होत नसल्याचा अनुभव या सभागृहामध्ये आलेला आहे. आजचे अतिरिक्त आयुक्त प्रभारी मा.आयुक्त यांना सुचित करतो आजच्या संपुर्ण आदेशांची सुचनांची अंमलबजावणी ही तात्काळ करुन येणाऱ्या आठ दिवसामध्ये शहरवासियांना या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा पाण्याचा त्रास होणार नाही याची प्रशासन आणि पाणी पुरवठा विभागाने दखल घ्यायची आहे आणि चांगले नियोजन करुन पाणी पुरवठा सुरळित नियमित आणि शुध्द पाणी पुरवठा शहर वासियांना कसा देता येईल याची दखल घेऊन या ठिकाणी अशा प्रकारचे निर्देश सभागृह देत आहेत. काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

श्री.त्र्यंबक तुपे :मालमत्ता कराची एकुण थकबाकी किती कर भरण्याबाबत अभय योजना राबविली एक दीड महिन्यात किती वसुली झाली?

कर निर्धा.व संकलक :कर भरणा करणेसाठी १ एप्रिल १८ ते ३१ मे २०१८ पर्यंत अभय योजनेचा कालावधी आहे. पहिले १० दिवस साफ्टवेअर अपडेट करणे साठी वेळ गेला. त्यानंतर २७ ते ३० एप्रील हे चार दिवस सुट्टीचे होते. एप्रील मध्ये १५ दिवस अभय योजना लागू करणेसाठी मिळाले एकूण रु.२२२ कोटी थकबाकी होती. अभययोजनेच्या काळात रु.१२.५० कोटी आले. मागिल वर्षी रु.९ कोटी होते.

श्री.त्र्यंबक तुपे :रु.१२ कोटीच वसुली झाले. अभय योजना राबविली तेवढा प्रतिसाद मिळत नाही. ७५ टक्के सवलत व्याजावर देत असतांना ही वसुली का होत नाही? कारणे शोधली पाहिजे. जास्तीत जास्त पैसा जमा होऊ शकतो का? ते पहावे.

कर निर्धा.व संकलक :जनजागृती करणे आवश्यक होते ते केलेले आहे. मे ३१ पर्यत मुदत आहे. त्यानंतर आहे तीच कार्यवाही करावी.

मा.महापौर :करदाते यांना सुवर्ण संधी म्हणून हे केले होते. शेवटची तारीख ३१ आहे नागरीकांना जाणीव करून द्यावी. आता शिल्लक रु.२१० कोटी किती लोकांकडे आहे. लोक अदालत घ्यावे काही प्रकरणे त्यात निकाली काढावे.

श्री.आत्माराम पवार :अभय योजना लागू केली ७५ % व्याज माफ आहे लोकांना माहितच नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :एमसीएन इतर मिडीयाच्या माध्यमातून लोकांपर्यत अभय योजनेची माहिती द्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे कर्मचारी टॅक्स बील वाटप करतात या योजनेचे पत्रक काढून ते त्यांचेकडे दयावे कर दात्यांना माहिती मिळेल.किती प्रकरण कोर्टात आहे. काही प्रकरणात तडजोड होऊ शकते कार्यवाही होत नाही. जे लोक कोर्टात गेले त्यांना बोलवून चर्चा करावी. टॅक्सचा डाटा प्रभाग वाईज झालेला नाही.किती टॅक्स जमा झाला किती बाकी आहे.

श्री.विकास जैन :व्याजामध्ये ७५ टक्के सुट दिली म्हणून १२ कोटी मिळाले. शासनाने जीआयएस मॅपींग द्वारे किती क्षेत्रफळाचे घर आहे बांधकाम किती सर्व माहिती समोर येईल. जीआयएस मॅपींगची कार्यवाही तात्काळ करावी.

मा.महापौर :ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :अनेक दिवसापासून कचऱ्याची समस्या, कचऱ्याची विल्हेवाट अधिकाऱ्याच्या बेजबाबदारपणामूळे योग्य पध्दतीने लावली जात नाही. मशीनरी खरेदी प्रकरणी निविदा काढणार होतो? आजची परीस्थिती काय आहे?

श्रीमती माधुरी देशमुख :कचऱ्यावर आतापर्यंत किती व कशासाठी खर्च केले?

श्री.विकास जैन :२७ मशीन साठी निविदा काढली होती. सिंगल टेंडर मूळे रिकॉल केले पुढे काय झाले?

कक्ष प्रमुख श्री.कोल्हे :शॉट-टर्म प्लॅनमध्ये ०९ सेडींग ०९ बेलींग ०९ स्क्रेनींग मशीन अशा एकूण २७ मशीन घेणेसाठी कार्यवाही केली होती. त्या नुसार २७ तारखेला टेंडर ओपन करायचे होते. एकच टेंडर आल्यामुळे रि-टेंडर केले. आज शेवटचा दिवस टेंडर भरण्याचा आहे सात तारखेला टेंडर ओपन करणार आहे.

मा.महापौर :कचऱ्याची समस्या अत्यंत बिकट आहे. त्या मशीनरी मा.आयुक्ताच्या विशेष अधिकारात खरेदी करण्याचे राज्य शासनाचे निर्देश होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :६७-३ सी मध्ये काहीचे पेमेंन्ट काढले जाते. कचऱ्याचा प्रश्न गंभीर होता हे का ६७-३ सी मध्ये केले नाही. राज्य शासनाने सुध्दा आदेश दिले होते की यावर तातडीने कार्यवाही करावी. वेळ गेल्यानंतर पुन्हा टेंडर कोणी भरणार नाही पावसाळा येईल. शहरात रोगराई पसरेल नेमके प्रशासनाचे धोरण काय आहे.

मा.महापौर :आम्हाला कामा मध्ये इन्ट्रेस आहे एजन्सीमध्ये नाही. आणीबाणीच्या परीस्थितीत शासनाने सुध्दा निर्देश दिले होते की तात्काळ जे काही करता येईल ते करावे. प्रशासन विशेष अधिकार वापरून हे करू शकले असते.

मा.त्र्यंबक तुपे :शासनाचे निर्देश डायरेक्ट खरेदी करावे. किंवा कसे होते?

श्री.विकास जैन :आता दुसऱ्यांदा एकच टेंडर आले तर काय करणार आहे?

श्री.त्र्यंबक तुपे :महत्वाचा विषय असतांना टेंडर काढणे पुन्हा रिकॉल करणार यात वेळ जातो आहे. पुर्वीच निर्णय घेतला असता तर यंत्र कार्यान्वित झाले असती. शहरात अनेक भागात साचलेला कचरा दिसला नसता.

श्री.राजेंद्र जंजाळ :हे टेंडर स्थानिक, राज्याच्या, की नॅशनल वृत्तपत्रात दिले होते.

कक्ष प्रमुख-घनकचरा :मागच्या वेळेस सर्व वर्तमान पत्रात दिले होते आताही दिले आहे. ई-टेंडरिंग मध्ये प्रसिध्द केले कोणत्या वर्तमान पत्रात दिले पीआरओ कडून माहिती घेता येईल.

मा.महापौर :आज सबमिशनची शेवटची तारीख आहे. निविदा प्रोसेस करून घ्यावी समस्या वाढत आहे पाऊस येऊ शकतो. मशीनरी खरेदीचा निर्णय तातडीने घ्यावा लागेल.

श्री.विकास जैन :आता सिंगल टेंडर आले तर काय करणार आहे. शासनाचा सप्टेंबर २०१७ चा जीआर की तातडीचे काम असेल तर दुस-यांदा आलेले टेंडर एक टेंडर असेल तरी तातडीने काम करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जनतेच्या आरोग्याचा प्रश्न आहे. प्रशासनाचे धोरण कुचकामी आहे.कचरा प्रश्न मार्गी लावणार असे आपण नागरीकांना आश्वासन देतो. लवकरात लवकर कार्यवाहीचे आदेश द्यावे. आतापर्यंत कचरा वर्गीकरण व डिस्पोजल करणेसाठी किती खर्च केला.

श्री.त्र्यंबक तुपे :मुख्य रस्ता असेल, आजही सिंधी कॉलनी भागात आठ दिवसाचा कचरा साठलेला आहे. तेथे कचरा जाळला जातो. १५ दिवसापुर्वी मा.उध्दवजी ठाकरे साहेब आले होते त्यांनी कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या सुचना दिल्या. काही निर्णय तातडीने घ्यावे लागणार आहे. शासनाच्या निर्णयाचा आधार घेऊन कार्यवाही करावी. आता पावसाळा येत आहे. आपली यंत्रणा सज्ज असायला पाहिजे. या कचऱ्यामुळे रोगराई होऊ शकते.

श्री.विकास जैन :शहरात किती कम्पोस्ट पीट निर्माण केली?

अति.आयुक्त :कचरा सेग्रीकेशन करावा लागेल. तरच विल्हेवाट लावणे सोपे जाते. वर्गीकरणाचे प्रमाण ७०-७५ टक्के आहे. ओला कचरा निर्माण होतो त्यासाठी ४७ ठिकाणी ४६३ पीट करण्याचे काम हाती घेतले.

श्री.विकास जैन :याची निविदा काढली होती का?

अति.आयुक्त :६७-३ सी मध्ये हे काम केलेले आहे.

| | |
|---|---|
| श्री.विकास जैन | :पीट बांधण्यासाठी ६७-३ सी वापरतो. जे उपयोगात लगेच येणार आहे त्या मशीन खरेदीसाठी निविदा वापरतो हे योग्य वाटत नाही कम्पोस्ट पीट बांधणेसाठी किती खर्च येत आहे. |
| अति.आयुक्त | :सर्व पीट जवळपास ५ कोटीच्या आसपास आहे. मशीनरी रु.३.१६ कोटीचे आहे. पीट बांधण्याचा खर्च प्रत्येक स्पॉटच्या ठिकाणचा. रु.१०,१५ लक्ष या प्रमाणे आहे. |
| श्री.विकास जैन | :टेक्नीकली पीट बाधंणेसाठी शेड वगैरे बनवतोच त्यांची निविदा काढली नाही डायरेक्ट काम केले. मशीनरी खरेदीची निविदा काढली मशीन घेणे महत्वाचे होते पुर्ण शहरातील कचऱ्याचा प्रश्न सुटणार होता. २७ मशीन मधून किती टन कचरा विल्हेवाट लावणार आहे. |
| अति.आयुक्त | :हे मेकनिकल कम्पोस्ट नाही. बेलींग मशीन असेल ते सुका कच-याचे गठ्ठे करून देणार आहे. एका शीफ्ट मध्ये १०० टन कचराची विल्हेवाट लावणार आहे. |
| श्री.विकास जैन | :मशीन खरेदी करणे महत्वाचे असतांना निविदा काढल्या जातात. सिंगल टेंडर आले तर शासनाचा जीआर आहे त्याचा वापर करणार की नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :पाच कोटीचे शेड बांधण्याचे काम आयुक्तांच्या अधिकारात होते व मशीन खरेदीचे काम निविदा द्वारे का होत आहे. |
| अति.आयुक्त | :शासनाचे आदेश आहे की घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत ज्या मशीनरी खरेदी करावयाच्या त्यासाठी केंद्र शासनाचे एक ई-पोर्टल आहे. त्याचे मार्फतच खरेदी करावे असे आहे. १० दिवस ई-पोर्टलवर मागणी नोंदवली होती. त्या मशीनरी तेथे नाही. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :त्याचा कालावधी ठेवलेला असेल त्या वेळेत मिळाले नाही तर ६७-३ सी मध्ये कार्यवाही का केली नाही निविदा प्रक्रिया राबविण्याची गरज नव्हती. रू.५ कोटीचे पीट डायरक्ट काम करतो. मशीनसाठी निविदा राबवितो हे योग्य वाटत नाही. |
| अति.आयुक्त | :मशीनरी खरेदीच्या संदर्भात नगरविकास विभागाशी चर्चा केली तेंव्हा त्यांनी असे म्हटले की ई-टेंडर करावे एका साईटवर पीटचा खर्च रु.१०-१५ लक्षपर्यत होतो म्हणून प्रत्येक प्रकरण हे वेगळे होते. |
| श्री.विकास जैन | :पीट केले रु.१०-१५ लक्षचे अंदाजपत्रकच तयार केले असेल. तेही टेंडर करता आले असते. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :गंभीर प्रश्न असतांना प्रशासन दखल घेत नाही. नगरविकास विभागाकडे तीन वेळेस बैठका झाल्या काल राज्याचे मुख्य सचिव येऊन गेले. ६७-३ सी मध्ये मशीन खरेदीची परवानगी द्यावी. हा मुद्दा का मांडला नाही? भविष्यात नागरीक आम्हाला कचऱ्याचा प्रश्न विचारणार आहे काय उत्तर दयायचे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :कचरा अजुनही उचलला जात नाही. कर्मचारी देत आहे किती? कर्मचारी लागतात ताळमेळ नाही. किती खर्च होतो? कळायला मार्ग नाही. शहरातला कचरा संपला पाहिजे. आता टेंडर अंतिम झाले नाही तर पावसाळा येईल. कचरा तसाच पडून राहिल असे होता कामा नये. |
| श्री.विकास जैन | :किती दिवसात मशीनरी येतील? |

| | |
|---|---|
| कक्ष प्रमुख-श्री.कोल्हे | :३० दिवसाची पुरवठा करण्याचा कालावधी आहे. ६० दिवसा पुर्ण होण्यास लागतील. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :पावसाळा सुरू होणार, कचरा रस्त्यावर सडणार, रोगराई पसरणार, नागरीक रस्त्यावर फिरू देणार नाही ताबडतोब मशीन खरेदीचा निर्णय घ्यावा. |
| मा.महापौर | :वर्क ऑर्डर दिल्यानंतर किती दिवसात मशीनरी द्यायला पाहिजे. |
| कक्ष प्रमुख-श्री.कोल्हे | :३० दिवसाचा वेळ दिलेला आहे. |
| मा.महापौर | :निविदा अंतिम करतांना ज्यांचेकडे मशीन उपलब्ध असतील. ते त्वरीत घ्यावे. राज्य शासनाचा जो सप्टेंबर २०१७ चा जीआर आहे. सिंगल टेंडर असेल इतर अडचणी असतील त्या दूर करून ताबडतोब निविदा उघडाव्या. आता पावसाळा येणार आहे मशीनरी घेणे शिवाय गत्यंतर नाही. आता वेळ होऊ नये. |
| श्री.राजू शिंदे | :डीपीआर मध्ये अनेक चुका आहे. इतर ठिकाणी व येथील भौगोलिक परीस्थिती वेगळी आहे. काम करू शकत नाही अशा चूका आहे. यांचे सोईने पीट बाधंणार अगोदर मशीनरीची खरेदी करण्याचे कार्यवाही होणे अपेक्षीत होते परंतु चांगल्या कामासाठी अधिकारी मदत करीत नाही. |
| अति.आयुक्त | :डीपीआर दुरूस्त करणेचे आदेश दिलेले आहे. पीट बांधायचेच होते. |
| मा.महापौर | :डीपीआर सदोष आहे. |
| श्री.विकास जैन | :शॉर्ट टर्म प्लॅन सांगितला. डीपीआर मध्ये त्यास इतका उशीर का होता? |
| श्री.राजेंद जंजाळ | :डीपीआरची मान्यता केव्हा घेतली, त्यात चुका करणार. त्यानंतर समोर येणार काय? |
| श्री.राजू शिंदे | :एकही जबाबदारीने अधिकारी काम करीत नाही. किती दिवसात कार्यवाही करणार आहे? |
| श्री.भगवान घडमोडे | :चांगली संधी आलेली आहे. टेंडर काढून उशीर का लावत आहे? |
| कक्ष प्रमुख-घनकचरा | :मशीनरी खरेदी करायच्या त्यात कम्पोस्ट पीट करायचे आहे. तीन महिन्याचा अवधी आहे. |
| मा.महापौर | :तातडीची बैठक झाली. तेव्हा डीपीआरचा प्रस्ताव घेतला होता व तो मंजूर करून दुरूस्तीचे अधिकार मा.आयुक्तांना दिले होते. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :प्रशासनाने आतापर्यत काय कार्यवाही केली.आयुक्तांची काय भुमिका आहे. |
| मा.महापौर | :आज निविदा तात्काळ उघडाव्यात सोमवारी निर्णय घेऊन टाकावा. डीपीआर अंमलबजावणी करीता मा.उच्च न्यायालयामध्ये शेड्युल टाईम दिला आहे. |
| श्री.विकास जैन | :डीपीआर बाबत माहिती द्यावी काय करणार आहे? |
| कक्ष प्रमुख-श्री.कोल्हे | :एजन्सी गव्हर्नमेन्टने नेमली आहे. त्यांचे मार्गदर्शनाखाली पुढची कार्यवाही होत आहे. |
| मा.महापौर | :ज्या सेडींग, बेलीग, स्क्रिनींग मशीनरी खरेदी संदर्भात ज्या २७ मशीनरी कचऱ्यासाठी खरेदी करावयाच्या आहेत ८-१० दिवसापुर्वी सिंगल टेंडर आले एक महिन्यापासून प्रक्रिया सुरू आहे दुस-यांदा टेंडर केले पुन्हा रिकॉल होऊ नये.मशीनरी शिवाय काम होऊ शकत नाही. तत्कालीन आयुक्त यांना सुध्दा सांगितले होते की, आपल्या अधिकारात कार्यवाही करावी. आज मशीनरी खरेदी करून काम सुरू होणे अपेक्षीत होते. जे निकष असतील निर्णय घ्यावा. |
| श्री.विकास जैन | :६७-३ सी मध्ये मशीन खरेदी केली असते तर हा प्रश्न आला नसता. |

श्री.त्र्यंबक तुपे :तातडीने निर्णय व्हावा. बाकीचे पैसे असतील त्यामध्ये रिक्षा व इतर खरेदी असेल ते घ्यावे भाड्याने लावून खर्च करतो आहे. पैसा पडून असतांना यंत्र खरेदी करीत नाही. भाड्याने वाहने घेत आहेत. विनाकारण पैसा जातो आहे. शहर स्वच्छ झाले पाहिजे. आपली सर्वांची भुमिका मशीनरी खरेदी केल्या तर पैसे वाचणार आहे. उर्वरीत जे काही साहित्य खरेदी करायचे आहे. तेही खरेदी करावे.

मा.महापौर :डीपीआरचा पिरीयड होता. तो राज्य शासनाने मा.कोर्टात सब्मीट केला होता. डे-टू-डे प्रोग्राम दिला होता त्यानुसार काम चालू आहे का ?

कक्ष प्रमुख श्री.कोल्हे :कचरा कलेक्शन करणे आहे ते काम चालू आहे. डीपीआर संदर्भात इकोप्रो एजन्सी म्हणून आहे.

श्री.विकास जैन :रिक्षा भाड्याने लावतो डीपीआर मध्ये १३२ रिक्षा खरेदी करायच्या आहे.

मा.महापौर :डीपीआरची अंमलबजावणी व्हावी. राज्य शासनाने पैसा दिला त्याचा तात्काळ उपयोग झाला पाहिजे.डीपीआरची शॉर्ट टिपणी सादर करावी.

श्री.भगवान घडमोडे :शहर कचरा मुक्त व्हावे. यासाठी सर्व प्रयत्न करीत आहे. काम किती झाले? व प्रत्यक्षात खर्च किती होत आहे? भाडयाने वाहने लावत आहोत. रिक्षा लावत आहे कचऱ्यावर फवारण्याचे पावडर किती रक्कमेचे खरेदी केले. सर्व खर्च किती झाला?

श्री.त्र्यंबक तुपे :कर्मचारी जेवढे पाहिजे तेवढे घेत आहे. बचत गटाचेही घेत आहे.

कार्य.अभि.श्री.कोल्हे :ओला सुका-कचरा वाहतुकीसाठी ६५ रिक्षा लावल्या होत्या.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कचरा उचलणे ही अत्यावश्यक सेवा आहे. आता पावसाळा सुरू होणार आहे. काय नियोजन केले आहे?

श्री.भगवान घडमोडे :कचऱ्यावर टाकायची पावडर घेतली त्याचे टेंडर काढले होते का? त्यामूळे किती ठिकाणचा कचरा नष्ट झाला. ती पावडर कुठे टाकली. टेंडर काढले नाही पावडर घेतली. कुणाच्या अधिकारात घेतली?

श्री.प्रमोद राठोड :कोणती पावडर विकत घेतली व किती रक्कमेची घेतली? त्या पावडरचे नाव काय आहे?

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.डी.पी. कुलकर्णी यांचेकडे चार्ज होता, त्यांचेकडून श्री.कोल्हे यांचेकडे दिला. त्यांना माहिती नसेल तर लेखा विभागाकडून माहिती घ्यावी की, किती रक्कमेची पावडर खरेदी केली?

श्री.भगवान घडमोडे :कचऱ्याच्या नावाखाली किती खर्च झाला? होत आहे?

श्रीमती स्मिता घोगरे :माझे वार्डात कम्पोस्ट पीट बांधण्यात आले. त्यांचे भिंती पडायला आलेल्या आहेत. एकदम हलक्या दर्जाचे बांधकाम केले आहे.

(या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.प्रमोद राठोड :पावडर यासाठी टाकतो की, त्यावर प्रक्रिया झाली पाहिजे. आज पावडर टाकली की उद्या कचरा उचलून घेतला जातो. प्रक्रिया होतच नाही. तर पावडर टाकून उपयोग काय?

अति.आयुक्त :पावडर खरेदी ही सुरूवातीच्या काळात दिनांक १६ फेब्रुवारीच्या नंतर एक महिनाभर केली. आता कचऱ्याची प्रक्रिया सेन्ट्रल नाक्यावर केली. प्रत्येक वार्ड

अधिकारी यांना ही पावडर दिली होती. पावडरचा वापर वॉर्ड अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर केला.

श्री.प्रमोद राठोड :कोणती पावडर होती? अधिकाऱ्यांना विचारावे? संचिकेवर बघावे कोणती पावडर आहे? पावडर टाकली म्हणून सांगता, परंतु कुठे टाकली? सर्व लोकांना कचऱ्याचा त्रास होत आहे. पावडर कितीची खरेदी केली होती? कोणती पावडर घेतली.

श्री.भगवान घडमोडे :कितीची पावडर घेतली? टेंडर काढले होते का कुठे टाकली? कोणती घेतली ते ही सांगावे. माझा स्पष्ट आरोप आहे, कचऱ्याच्या नावाखाली नुसते पैसे खाणे चालू आहे. कुठलेही काम चांगले नियोजीत पध्दतीने होत नाही.

श्री.प्रमोद राठोड :पावडर देणारा मला भेटला त्यास विचारणा केली की, या पावडरचे कन्टेन्ट काय आहे? त्यास काहीही माहित नाही. तो घराच्या बाजूला जागा आहे तेथे बनवतो म्हणाला. याचा अर्थ त्यांचे टेक्नीकल कन्टेन्ट काय आहे? त्यास कसे काम दिले? कशावरून ठरविले की ही पावडर टाकली पाहिजे. परीक्षा घेतली होती का? काहीही माहिती अधिकारी यांना नाही. रु.५ कोटीचे पीटसाठी खड्डे केले व रु.६५ लक्षची पावडर घेतली.

श्री.भगवान घडमोडे :रु.६५ लक्षची पावडर विना निविदा खरेदी केली, कुठे टाकली, किती टाकली? माहिती नाही. म्हणजे नक्की यात भ्रष्टाचार झाला. याची चौकशी झाली पाहिजे. कचऱ्याच्या नावाखाली वाटेल तो खर्च करीत आहे व जनतेला दाखवित आहे की, आम्ही काही तरी करतो, हे योग्य नाही.

श्री.प्रमोद राठोड :रु.६५ लक्षची पावडर खरेदी केली. लेखा विभागाकडून सर्व माहिती घ्यावी. लॅबोरेटेरी मध्ये टेस्ट करा व माहिती घ्या की, कुठे टाकली? यास जबाबदार कोण आहे? काहीच बघणार नाही, बीले देणार काय? हे योग्य वाटत नाही.

कार्य.अभियंता :किती पावडर घेतली त्याची माहिती आहे यात रक्कम दिलेली नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :रु.५,०००/- ची किलो पावडर सप्लाय करा. अशी ऑर्डर आहे. त्यावर कुठेच रेट नाही.

श्री.भगवान घडमोडे :कचऱ्याच्या नावाखाली अधिकारी लुटमार करीत आहेत. शहरात कचरा तसाच आहे. जनतेच्या भावनेचा फायदा घेत आहेत.

श्री.राजेंद्र जंजाळ :६७-३ सी मध्ये पावडर खरेदीची ऑर्डर दिली जाते. तर मशीन खरेदीस काय अडचण आहे?

मा.महापौर :सिंगल टेंडर असेल जे काही असेल त्यानुसार आता यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा निर्णय मा.आयुक्तांनी घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :पावडर खरेदी केली. त्यांचे टेक्नीकल कन्टेन्स चेक केले का? त्यांचे लॅबोरेटरीचे सर्टीफिकेट या गोष्टी बघीतल्या होत्या का?

श्री.राजेंद्र जंजाळ :सर्वच वार्ड अधिकारी यांनी एकाच दिवशी सारख्याच पत्रावर सह्या करून ऑर्डर नोंदविली आहे. एकच फॉर्मेटवर नोंद केली आहे.हे शक्य आहे का? एखाद्या वार्डाचा स्व.निरीक्षक पत्र कसे देऊ शकतो की, मला या एजन्सीकडून पावडर घेऊन द्यावे. घनकचरा व्यवस्थापक प्रमुख यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.राजू शिंदे :सर्व माहिती घ्यावी ही पावडर कोणत्या कंपनीचे आहे. चौकशी लावावी.

मा.महापौर :पावडर खरेदी विषयामध्ये एकूण खरेदी केलेली पावडर, तिचा झालेला उपयोग त्यावर झालेला खर्च या बाबतची चौकशी उच्च स्तरीय अधिकारी यांचे मार्फत करून याचा आठ दिवसात अहवाल द्यावा. तसेच कम्पोस्ट पीट संबंधीची संपुर्ण माहिती द्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :कम्पोस्ट पीट व पावडर आणि परत जेवढा खर्च घनकचरा व्यवस्थापनाने केलेला आहे. त्या पावडरचे टेक्नीकल स्पेसीफिकेशन काय आहे. त्याची मान्यता आहे का? त्याची कंपनी कुठे आहे. सर्व माहिती घ्यावी आता मशीन खरेदीची प्रक्रिया किती दिवसात होणार आहे. आणि कचऱ्याचे विघटन शास्त्रोक्त पध्दतीने कधी पासून करणार आहे.

श्री.राजू शिंदे :पावडर बाबत चौकशी लावणार आहे. परंतु आता ते पावडर गोडाऊनला आहे की,नाही ते अगोदर पहावे. स्टॉक किती आहे?

श्री.प्रमोद राठोड :सध्या जे महापालिकेचे जे प्रभारी आयुक्त आहे. श्री.उदय चौधरी यांनी चौकशी करावी. शहरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. अशा पध्दतीने जर लुटण्याचे काम चालू असेल तर योग्य नाही. जे दोषी असेल कार्यवाही करावी.

अति.आयुक्त :पावडर फेब्रुवारी आणि मार्च मध्येच घेतली होती.

श्री.राजू शिंदे :पावडर कुठे टाकली माझे वार्डात पावडर टाकली नाही. सात वार्डाचा कचरा वार्डात येतो. एक किलो पावडर आली नाही.

श्री.प्रमोद राठोड :ज्यांचेकडून पावडर घेतले त्याची कंपनी नाही. घराच्या बाजूला तो पावडर तयार करतो. किती पावडर होती ती संपली सुध्दा.

मा.महापौर

**<u>निर्णय :-</u>** (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७१ तसेच अनुसूची-ड चे प्रकरण-२ मधील नियम १ (प) व सभा कामकाज नियमावलीचे नियम २१,२२,२४,३० आणि ३१ अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये झालेला निर्णय).

सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार निर्णय घेण्यात येतो की,

१. पावडर खरेदीची प्रक्रिया, त्याचे युटीलायजेशन (वापर), ब्रॅण्ड, त्याचे कन्टेन्ट, दर्जा व पावडर खरेदीवर झालेला खर्च, पावडरचा ब्रॅण्ड, पावडर खरेदी प्रकरणाची तातडी/Urgency, पावडरचे दर निश्चित करणे, रिक्वायरमेंट, तांत्रिक बाबी, पावडरचा वापर, त्याचा दर्जा व त्याचे Result हे तपासणे प्रशासनाचे काम आहे. त्यामुळे पावडर खरेदी प्रकरणाची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. त्यामुळे पावडर खरेदी प्रकरणामध्ये संपुर्णपणे चौकशी होणे व संपुर्ण बाबी सभागृहासमोर येणे आवश्यक आहे.

२. तसेच, कम्पोस्ट पीट यांचे काम संबंधीत ठेकेदारास ६७(३) सी अंतर्गत दिले आहे. त्या झालेल्या कामाचा दर्जा, आज त्याची काय परिस्थिती आहे? वापरात किती आहे? व त्यावर झालेला खर्च या दोन्ही प्रकरणाची विद्यमान आयुक्त श्री.उदय चौधरी यांनी चौकशी करावी व अहवाल महापौरांकडे सादर करावा.

श्री.राजू शिंदे :कचरा उचलण्यासाठी किती लेबर घेण्यात आले?

अति.आयुक्त :२१५ लेबर दिलेले आहे.

श्री.राजू शिंदे :लेबर कुठे दिले कोणती एजन्सी होती. मंजूरीसाठी सभेत आले का?

| | |
|---|---|
| अति.आयुक्त | :झोन वाईज वार्ड अधिकारी यांनी डिमांड केली त्यानुसार दिले. रिक्षा वाढविल्या व लेबरही वाढविले आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :लेबरची आवश्यकता होती की नाही? |
| अति.आयुक्त | :कचरा वर्गीकरण करतो आहे लेबर जास्त लागत आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :वर्गीकरण होत नाही कचरा रस्त्यावर दिसतो नुसते लेबर घेतो कुठे काम करतात? वार्ड अधिकारी यांना हाताशी धरून एजन्सी लेबर देत आहे. |
| श्री.राजू शिंदे | :७० टक्के वर्गीकरण झाले ३० टक्के वर्गीकरण करणेसाठी २१५ लेबर पाहिजे होते का? |
| अति.आयुक्त | :प्रत्येक झोनमध्ये लेबर दिले आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :कचऱ्याच्या नावाखाली लूट चालू आहे. |
| मा.महापौर | :लेबरची हजेरी बघावी. वार्ड १,२,३,९ मध्ये लेबर दिले. यादी द्यावी. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :माझे वार्डात ११ लेबर आहे. श्री.साळवी यांचे वार्डात ७ लेबर तर २१५ लेबर कुठे दिले. लेबरची हजेरी कोण पाठविते? वार्ड अधिकारी एजन्सीस मिळालेले आहे, काम करीत नाही. |
| श्री.राजू शिंदे | :मागच्या बैठकीत महाराणा एजन्सीचे काम थांबवायचे आदेश दिले चौकशी लावली, गरज नसतांना शाळेत शिपाई दिले. |
| श्री.भगवान घडमोडे | :आऊट सोर्सिंच्या नावाखाली मनपाची परिस्थिती खराब असतांना लुट लावली आहे. |
| मा.महापौर | :आयुक्त यांनी वार्ड अधिकारी यांना ३ लक्षचे त्यात रिक्षा व लेबर इतर खरेदी यावर खर्च करण्याचे सांगितलेले आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :आयुक्त श्री.नवल किशोर राम यांना पुर्ण शहराचा अभ्यास नव्हता किती लेबर लागेल माहिती नव्हती. जशी मागणी आली तशी त्यांनी मंजूरी दिली चांगले काम होईल असे त्यांना वाटले २१५ कर्मचारी देऊन टाकले. महाराणा एजन्सी बाबत चर्चा केली होती. त्यांचे कामाची माहिती मागीतली होती टेंडर पुन्हा कसे दिले.माहिती आली नाही. कमेटीमध्ये कोण होते. सेक्युरीटी जाधव यांनी अर्ज दिला होता त्या एजन्सीच्या माध्यमातून रक्कम रुपये ३०-३५ लक्षचे मनपाचे नुकसान झाले होते चौकशी झाली होती. त्यात कर्मचारी भरती बाबत ऑडीट झाले होते त्यात अधिकारी कर्मचारी ५० दोषी आहे. तत्कालीन आयुक्त श्री.बकोरीया यांनी या अधिकाऱ्यांना नोटीसा पण दिल्या होत्या. हे सर्व झाले असतांना महाराणा एजन्सीला पुन्हा काम दिले जाते. आवश्यकतेनुसार कितीही कर्मचारी देणार काय? ती एजन्सी २-३ महिने लेबरला पगार देत नाही. उप-आयुक्तांना बोललो तर त्यांनी असे म्हटले की, १८ नंबरचा कॉलम मध्ये दिले की, जेंव्हा मनपा पेमेंन्ट देईल. त्यानंतर २-३ ऱ्या दिवशी पेमेंन्ट द्यावे असे आहे. |
| श्री.राजू शिंदे | :चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्या एजन्सीचे पेमेंन्ट, काम थांबविण्याचे आदेशीत केले होते काय? कार्यवाही केली. |
| श्री.भगवान घडमोडे | :कामगाराना नवीन श्रेणी लागू होणार आहे म्हणून आता त्यांचेकडून पैसे जमा करण्याचे काम सुरू केले. |

| | |
|---|---|
| कामगार अधिकारी | :सर्वसाधारण सभेने आदेश केल्यानुसार त्याप्रमाणे माहिती मा.आयुक्तांकडे सब्मीट केली होती मा.आयुक्तांची बदली झाली. समीतीचे अध्यक्ष आयुक्तच होते. त्यामूळे अहवाल दिला गेला नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :नवीन कर्मचारी कसे घेतले गेले. |
| श्री.राजू शिंदे | :चौकशी होईपर्यत पुढचे काम एजन्सीकडून का करून घेण्यात येते.आयुक्त बदलत असेल व पुन्हा काम चालू होत असेल तर हे योग्य नाही. |
| श्री.भगवान घडमोडे | :आऊट सोर्सिंगचे किती कर्मचारी कामावर आहे. |
| श्री.राजू शिंदे | :सभागृहाने निर्णय दिल्यानंतर किती लोक कामावर घेतले? |
| कामगार अधिकारी | :२१५ साफसफाई कर्मचारी जयबंजरंग संस्थेकडून ९० लोक तांत्रिक अकुशल म्हणून घेतले. |
| श्री.प्रमोद राठोड | :यास मान्यता कोणते आयुक्तांनी दिली त्यांना हे प्रकरण चौकशीत आहे माहित होते का? |
| कामगार अधिकारी | :मा.नवल किशोर राम यांनी मंजूरी दिली. |
| श्री.राजू शिंदे | :चौकशी लावण्यात आले आयुक्तांना सांगितले नाही. जयबंजरंग कडून २१५ लेबर व ९० कर्मचारी महाराणा एजन्सी या दोन्ही एजन्सी एकच आहे.नाव वेगवेगळे आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :मनपाने पेमेन्ट दिल्यानंतर त्यांनी पेमेन्ट द्यावे, अशी अट त्यात आहे का? |
| कामगार अधिकारी | :मनपाने पेमेन्ट एजन्सीला दिल्यानंतर ३ दिवसाने त्या लोकांना दिले पाहिजे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :म्हणजे महाराणा एजन्सी एक रूपया त्या कर्मचा-यांना देणार नाही. मनपा देईल तेंव्हा तो पगार देईल अशी अट त्यात आहे. किती महिन्याचे ॲग्रीमेन्ट आहे? |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :एजन्सीची चौकशी करण्याचे आदेश दिल्यानंतरही त्या एजन्सीला पेमेंन्ट दिले का? |
| मा.महापौर | :चौकशी करण्याचे सांगितले होते. जे विद्यमान आयुक्त असेल त्यांचेसमोर प्रस्ताव ठेवावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :जे लोक घेतले. त्या एजन्सीने त्यांचेकडून महापालिकेच्या नावाने, डिपॉजीट घेतले |
| कामगार अधिकारी | :११ महिन्याचे म्हणजे जुलै महिन्यापर्यत ॲग्रीमेन्ट आहे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :चौकशी होईपर्यत त्या एजन्सीचे पगार थांबविण्यात यावे. |
| श्री.राजू शिंदे | :सभागृहाने चौकशीचे आदेश दिले असतांना पुन्हा त्याच एजन्सीकडून कर्मचारी घेतले. जो अहवाल आयुक्तांना दिला होता त्याची प्रत सभागृहाला दयायला पाहिजे होती. |
| मा.महापौर | :जो चौकशी अहवाल असेल तो तात्काळ द्यावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :त्या संचिकेत लिहायला पाहिजे की, या एजन्सीच्या बाबतीत स्थगीती दिली, चौकशी करण्याचे सांगितले तसे संचिकेत का लिहिले नाही? ही जबाबदारी अधिकारी यांची होती. माहिती लपविणारेच दोषी आहे. चौकशा किती करणार आहे? |
| उपमहापौर | :जोपर्यंत एजन्सीच्या बाबतीत चौकशी अहवाल येत नाही, तोपर्यत त्या एजन्सीला पेमेन्ट व त्यांचेकडून कर्मचारी भरती करू नये असे म्हटले होते. |

महाराणा एजन्सीला ठेका देतांना र.रु.३ कोटीच्या खर्चात ११५ कर्मचारी घ्यायचे असे ठरले होते. त्यात प्रत्येक कर्मचा-यांना किती पगार असेल यांचे विवरण होते. ठराव २४,२५ मध्ये आवश्यकतेनुसार कर्मचारी दिले जाईल असे होते. याचा अर्थ असा नाही की या सभेत विषय आणला जाणार नाही. महाराणा, जयबजरंग, गॅलक्सी एजन्सीला दरमहा मनपा ३ ते ४ कोटी देत आहे. वर्षाला ३५-४० कोटी देत आहे. हा प्रश्न या सभेत का आला नाही. मी पत्रकार परीषद घेतली होती. महाराणा एजन्सी बद्दल मी कामगार आयुक्तास पत्र दिले होते. जर मनपाने एजन्सीला १ तारखेला पेमेंन्ट दिले असेल तर एजन्सीने १५ तारखे पर्यंत पीएफ व इएसआय भरला पाहिजे. भरला नसेल तर पुढचे पेमेन्ट देऊ नये असे आहे. आयुक्त बदलले म्हणजे सर्व बंद होत नाही. चौकशी अहवाल आला नसतांना कर्मचारी दिले जात आहे. सहा महिन्यात महाराणा एजन्सीची चौकशी का होत नाही? ज्यांना ऑर्डर दिली ते लोक कामावर जात नाही पगार घेतात. वसुलीसाठी कर्मचारी दिले असतांना त्यांचेकडून वसुली तेवढी नाही. किती लोक घेतले? पेमेंन्ट किती दिले ? सर्व माहिती द्यावी. एजन्सीला ३१ मार्च पर्यंत पगार दिला. एजन्सीने कर्मचारी यांना तिथपर्यंत पगार दिला नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :सेक्युरीटी भरती संदर्भात चौकशी लावली होती. श्री.जाधव यांनी तक्रार दिली होती. त्याची चौकशीचा यात समावेश आहे का?

श्री.राजेंद्र जंजाळ :ती चौकशी झाली त्याचा अहवाल आलेला आहे. अधिकारी दोषी ठरविले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :त्या एजन्सीला मदत करणारे ५० लोक आहे. श्री.बकोरीया यांनी नोटीस दिली आहे. २५-३० लक्षचे नुकसान मनपाचे झाले. त्याचाही अहवाल द्यावा. २१५ कर्मचारी दिले कुठे आहे? यास कामगार अधिकारी जबाबदार आहे. सेक्युरीटी सांगतो की, माझे बोगस सह्या घेतल्या एजन्सीला पैसे दिले. तर चौकशी का होत नाही?

मा.महापौर :दोन्ही अहवाल विषयपत्रीके सोबत द्यावे.

श्री.प्रमोद राठोड :माहिती लपविणे. हा सुध्दा गुन्हा आहे. यांचे सर्वांवर गुन्हे दाखल करावे.

मा.महापौर :दोन्ही अहवाल आठ दिवसात द्यावा. त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :मनपाने पैसे दिले तर एजन्सी पैसे देणार अशी कशी अट टाकली. ६-६ महिने पगार लोकांना देत नाही. छोटे बचतगट होते ते चांगले काम करायचे, करारनामा योग्य केलेला नाही. एजन्सी बाजूला ठेवून शासनाला विनंती करावी व त्यांचेकडून एजन्सी घेता येते का? मागणी करावी.

श्री.भगवान घडमोडे :कचऱ्यावर किती खर्च झाला? कचऱ्याचे लाद्या तयार करतो, ते काम कुणाला दिले?

श्री.प्रमोद राठोड :खाजगी जागेवर कचरा टाकतो त्यांना काही मोबदला देतो का?

मा.महापौर :अति.आयुक्त यांनी सर्व माहिती एकत्रित करून सर्वांना कळविण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :यात अधिकारी यांचे नातेवाईक आहे ते काम करीत नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :५० टक्के कर्मचारी काम करीत नाही. अधिकारी कर्मचारी यांचे ते कर्मचारी आहे. यादी द्यावी समोर येईल.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :सभागृहात एक स्टेनो कर्मचारी आहे किती दिवसापासून पगार नाही ते विचारावे. |
| कामगार अधिकारी | :नगरसचिव यांनी मा.आयुक्तांच्या परवानगी व्यतिरिक्त त्यांना लावलेले आहे. त्या पदाला तेंव्हा मान्यता नव्हती. आता मान्यता मिळाली. |
| श्री.फेरोज खान | :अनेक लोकांकडून एजन्सीने १ लक्ष ५० हजार रुपये डिपॉजीट ठेवून लावले आहे. एजन्सीवर कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :प्रत्येक कर्मचारी यांना दिले जाणारे पेमेंन्ट किती? त्याची स्लीप घ्यावी. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :करारनामा कोणी तयार केला? |
| उपआयुक्त प्रशासन | :कामगार विभागाने करारनामा केला होता. त्यावर समितीच्या सह्या आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :महाराष्ट्रासह देशामध्ये कुठेही अशा प्रकारचा करारनामा नसेल. माझा व्यवसाय लेबर सप्लायचा होता कंपनी मध्ये लेबर देत होतो. ५ टक्के सर्व्हीस टॅक्स मिळायचा तीन-तीन महिने पगार होत नव्हता. जेंव्हा प्रिन्सीपल एम्प्लॉयर पेमेंन्ट देईल तेंव्हा तो एम्प्लॉयची पेमेन्ट करेल कोणत्याच कायद्यात नाही. त्याची चौकशी सुध्दा करावी. मनपाचे किती कर्मचारी, खाजगी किती घेऊ शकतो. एजन्सीकडून सेक्युरीटी घेतले, त्यांचेकडे गार्डबोर्डचे लायसन्स आहेत का? |
| श्री.राजू शिंदे | :जे भरती केले त्यांचेकडून डिपॉजीट रक्कम घेतली. अधिकारी सभागृहाचा आदर ठेवत नाही. |
| मा.महापौर | :सर्व खुलासा चौकशी अहवालात यावा. |
| श्री.फेरोज खान | :कर्मचाऱ्यांना एजन्सी पगार देत नाही. एजन्सीचा पगार थांबवावा. |
| मा.महापौर | :जानेवारी पासून पगार दिला नाही. किती लेबर आहे? किती लेबरचा पगार बाकी आहे? पुर्ण माहिती द्यावी. एजन्सीचा आता पगार थांबविला तर, त्या लोकांना तो पगार देणार नाही. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :मनपाने पगार देईल न देईल एजन्सीचे त्या लोकांना पगार देणे बंधनकारक असते. |
| श्री.प्रमोद राठोड | :एजन्सीने अगोदर लेबरला पेमेंट द्यावे ते दिलेले पेमेन्ट सबमीट करावे असे आहे परंतु मनपाकडून एजन्सी अगोदर पेमेन्ट घेते नंतर त्या लेबरला पेमेन्ट करते हे योग्य नाही. |
| मा.महापौर | :सर्व लेबरला एजन्सीने पेमेन्ट दिले आहे तसे एजन्सीकडून ॲफिडेव्हीट करून घ्यावे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :मनपाने पेमेन्ट एजन्सीला द्यावे त्यानंतर ती एजन्सी लेबरला २-३ दिवसात पगार करेल ही अट रद्द करावी. या पुढे जे कर्मचारी लागतील त्यासाठी ठराव घ्यावा व  शासनाकडून एजन्सी असेल त्यांचे माध्यमातून घ्यावेत. |
| श्रीमती माधुरी देशमुख | :कच-यावर किती खर्च झाले? महापालिका पेमेन्ट करीत असेल तर एजन्सी कशासाठी पाहिजे? आकृतीबंध शासनाकडे का पाठविला जात नाही? अनेक कर्मचारी अस्थायी सेवा करीत आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :जो पगार दिला जातो तो ॲक्ट नुसार दिला जातो का? त्याचे पीएफ, ईएसआय भरला जातो का? ती सुध्दा माहिती घ्यावी. |

मा.महापौर :करारनामा मध्ये जे आहे की, जर एजन्सीला मनपाने पेमेन्ट दिले तरच तो त्या नोकरास पगार देईल ती अट रद्द करण्यात येते. नियमानुसार विहित मुदतीत पगार त्या एजन्सीने दिले पाहिजे. किती कर्मचारी आहे? त्याची पगारपत्रक सह चौकशी अहवाल येणा-या सभेत ठेवावा. पीएफ, ईएसआय भरला की नाही, सर्व चौकशीमध्ये यावे.

**<u>विषय क्रमांक ४३८:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.गोकुळसिंग मलके :वार्डात शौचालयाचे आजपर्यत भांडे बसविलेले नाही. आजही काही लोक उघडयावर शौचालयास जातात.

काय.अभियंता-ड्रेनेज :शासनाकडून ५ महिन्यापासून अनुदान आलेले नाही. ते आल्यानंतर पैसे दिले जातील. मागिल बैठकीत केलेल्या सुचनेनुसार जर शासनाचे अनुदान येईपर्यंत मनपाच्या माध्यमातून पैसे द्यावे, त्यानुसार लेखा विभागास पत्र दिले की, या वर्षात ३ कोटीची रुपयाची तरतूद ठेवावी. बजेट मंजूर झाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

मा.महापौर :उद्याच माझे पत्र घ्यावे. ते प्रकरण मार्गी लावावे. शौचालयाचे कामे पुर्ण करावी हा विषय मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ४३९:-</u>** **(कार्य.अभि.पाणीपुरवठा)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाचे शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्रं/के/१४०११/१७/२०१३-युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेच्या रक्कम रुपये ३६७.६९ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे.

केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहराच्या पायाभुत सोयी-सुविधांचा विकास कार्यक्रम (uidssmt) या योजने अंतर्गत केंद्र सरकारकडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या ८० टक्के म्हणजेच रुपये २९२.७५ कोटी तसेच राज्य शासनाकडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या १० टक्के म्हणजेच रुपये ३६.७७ कोटी असे एकुण रक्कम रुपये ३२९.१२ कोटी अनुदान स्वरुपात महानगरपालिकेस मिळण्याचे प्रस्तावित होते.तसेच या अंतर्गत उर्वरीत १० टक्के रक्कम रुपये ३६.७७ कोटीची तजविज महानगरपालिकेस करावी लागणार होती.परंतु केंद्र शासनाने माहे जुन २०१५ अंतर्गत अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजना सुरु केलेली आहे. महानगरपालिकेची मंजुर मलनिःसारण योजना ही (Transition Phase) मधिल असल्याने महानगरपालिकेच्या या योजनेचा समावेश अमृत या नविन योजने अंतर्गत केंद्र शासनाने केलेला आहे.

अमृत योजनेच्या वित्तीय आकृतीबंधामुळे महानगरपालिकेस केंद्रशासना कडील ६० टक्के व राज्य शासनाचे २० टक्के असे एकत्रित रुपये २९२.७५ कोटीचे खालील नुसारचे सुधारीत आर्थिक अनुदान प्राप्त झालेले आहे. उर्वरीत २० टक्के रुपये ७३.१३ कोटी महानगरपालिकेस मनपा हिस्सा म्हणुन भरणा करावा लागणार आहे.

| एकुण मंजुर प्रकल्प किमंत | केंद्र शासन हिस्सा प्राप्त अनुदान (एकुण प्रकल्प किमंतीच्या ६० टक्के) | राज्य शासन हिस्सा प्राप्त अनुदान (एकुण प्रकल्प किमंतीच्या २० टक्के) | महानगरपालिकेचा हिस्सा (एकुण प्रकल्प किमंतीच्या २० टक्के. |
|---|---|---|---|
| रु.३६५.६८८९ कोटी. | रु.२१९.४१३३४ कोटी | रु.७३.१३७७८ कोटी | रु.७३.१३७७८ कोटी |

महानगरपालिकेने मनपा हिस्सा रुपये ७३.१३ कोटी अंतर्गत रुपये १८.२८ कोटीचा भरणा प्रकल्प करीता उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्या अंतर्गत केलेला आहे.त्यामुळे महानगरपालिकेस उर्वरीत रुपये ५४.८५७७८ कोटीची आर्थिक तजविज प्रकल्प पुर्णत्वा करीता करावी लागणार आहे.

तसेच सदर प्रकल्प करीता रितसर निविदा सुचना प्रसिध्द करुन कार्यवाही अंती प्रकल्पाचे मक्तेदार म्हणुन मे.खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.आणि घारपुरे इंजिनियरिंग ॲन्ड कंन्स.प्रा.लि (जेव्ही) यांच्या रुपये ४६४.०० कोटीच्या निविदा दरास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३१ दिनांक २९.४.२०१४ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेस निविदा दरा मधील फरक रुपये ९८.३१ कोटीची अतिरिक्त आर्थिक तरतुद करावी लागणार आहे.

महानगरपालिकेस सदरील मलनिःसारण प्रकल्प पुर्ण करणे करीता उक्त रुपये ५४.८५७७८ कोटीच्या रक्कमेचे तसेच निविदा दरा मधील फरका करीता रु.९८.३१ कोटी असे एकत्रित रुपये १५३.१६७७८ कोटीचे आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त तथा संचालक,नगरपरीषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे कडे दिनांक १.९.२०१६ रोजी आयोजीत विशेष बैठकी अंतर्गत कर्ज उभारणी करीता शासन पत्र क्रमांक/संकिर्ण-१००७/कर्ज व्यवस्थापन प.क्रं/३४५/नवि-२६.दिनांक १७ डिसेंबर २००७ नुसार आवश्यक असणारी माहिती /वित्तीय आकृतीबंध शासनास सादर करण्यात आलेला आहे.या अंतर्गत रुपये ५४.८५७७८ कोटीची तजविज औरंगाबाद महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातुन करण्यात येणार असल्याचे तसेच उर्वरीत रुपये ९८.३१ कोटी हुडको या वित्तीय संस्थेकडुन घेण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे प्रशासना मार्फत कळविण्यात आलेले होते.

महानगरपालिकेने राज्य शासनास सादर केलेल्या वित्तीय आकृतीबंधाच्या अनुषंगाने रुपये ९८.३१ कोटी कर्ज स्वरुपात हुडको या वित्तीय संस्थेकडुन घेणे बाबतचा धोरणात्मक प्रशासकीय प्रस्ताव दिनांक १६.११.२०१६ पासुन मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर करणे करीता सादर करण्यात आलेला होता.त्या अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १७० दिनांक १७.१२.२०१७ अन्वये सदरचा धोरणात्मक प्रस्ताव मा.सभेच्या पटलावर विचारार्थ व निर्णयास्तव घेतलेला होता.

मा.प्रधान सचिव (नवि २) यांचे कडील दिनांक ९.११.२०१७ रोजीच्या प्रकल्प विशेष आढावा बैठकीतील सुचने प्रमाणे कार्यवाही होणेच्या अनुषंगाने प्रशासनाने प्रकल्प पुर्णत्वा करीता केलेल्या आर्थिक नियोजना बाबतचा/मलनिःसारण योजने बाबतचा प्रगती अहवाल/प्रकल्प पुर्णत्वा करीता येणा-या अडचणी बाबतचा सविस्तर अहवाल मा.प्रधान सचिव (नवि २) यांचे कडील प्रकल्प आढावा बैठक दिनांक १४.२.२०१८ अंतर्गत सादर करण्यात आलेला होता.

सदरील बैठकी अंतर्गत सह सचिव (नवि ३३) यांनी महानगरपालिकेस पायाभुत प्रकल्प पुर्णत्वा करीता येत असलेल्या आर्थिक अडचणी संदर्भाने महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) या शासन अंगीकृत संस्थेकडुन कर्ज उपलब्ध करुन घेणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केलेली आहे. परंतु औरंगाबाद महानगरपालिका क वर्गात येत असल्याने महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे कडील मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने/महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कंपनी लि.यांचे कडील पत्र क्रं/MuIF/PFF-LOAN-GRANT MIX/ULBS/2017/120 दिनांक २१.९.२०१७ च्या पत्रान्वये औरंगाबाद महानगरपालिकेस पायाभुत प्रकल्प करीता कर्ज/अनुदान देय नसल्याबाबत बैठकीत नमुद करण्यात आलेले होते.परंतु सह सचिव (नवि

३३) यांनी विशेष बाब म्हणुन शहरातील मलनिःसारण प्रकल्प पुर्ण करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस कर्ज उपलब्ध करुन देणार असल्या बाबत कळविलेले आहे.

महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) च्या आर्थिक क्षमतेचा विचार करता प्रत्येक आर्थिक वर्षात रु.२५ ते ३०.०० कोटी या प्रमाणे कर्ज मिळण्याचे प्रस्तावित आहे.तसेच या अंतर्गत किमान रु.५.०० कोटी प्रत्येक आर्थिक वर्षात अनुदान स्वरुपात मिळण्याची शक्यता आहे.महानगरपालिकेच्या कर्ज रक्कमेस वार्षिक ७ टक्के दराने व्याज आकारणी MUIDCL यांचे मार्फत करण्यात येणार असुन सदरील वित्तीय संस्था शासन अंगीकृत असल्याने महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची मालमत्ता हमी म्हणुन तारण ठेवावी लागणार नाही.महानगरपालिकेस देण्यात येणा-या कर्ज रक्कमेची परतफेड/कपात राज्य शासन औरंगाबाद महानगरपालिकेस नियमित स्वरुपात देत असलेल्या जीएसटी च्या अनुदानातुन विहीत हप्त्यानुसार करणार आहे.

प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.फोट्रेस ॲडव्हायजरी सर्व्हिसेस मुंबई यांनी सुधारीत रुपये ४१८.०० कोटी मध्ये प्रकल्पातील विहीत कामे पुर्ण करणे बाबतचे सुधारीत नियोजन महानगरपालिकेस सादर केलेले आहे.तसेच महानगरपालिकेने मनपा हिस्सा रुपये ७३.१३ कोटी अंतर्गत रुपये १८.२८ कोटीचा भरणा प्रकल्प करीता उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्या अंतर्गत केलेला आहे.त्यामुळे महानगरपालिकेस उर्वरीत रुपये ५४.८५७७८ कोटीची आर्थिक तजविज प्रकल्प पुर्णत्वा करीता करावी लागणार आहे.परंतु महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासना कडील प्राप्त अनुदान रक्कमेवर आज पावेतो रुपये २०.४० कोटी इतके व्याज मिळालेले आहे.शासन परीपत्रक क्रमांक/संकीर्ण/३४१६/प्र.क्रं.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ च्या अनुषंगाने ज्या योजनेसाठी विविध टप्प्यांमध्ये अनुदान मंजुर केले जाते व ज्या योजनेमध्ये राज्य शासना सोबतच स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा देखील अंतर्भुत असतो अशा योजनेसाठी मंजुर केलेल्या निधीवर प्राप्त व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पुर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येणार असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेस या योजने अंतर्गत बँकेत जमा रक्कमेवरील व्याज स्वरुपात मिळालेले रक्कम रुपये २०.४० कोटी मनपा हिस्सा अंतर्गत वापरण्यात आल्यास फक्त रुपये ३४.४५ कोटी कर्ज स्वरुपात MUIDCL / HUDCO यांचे मार्फत कर्ज स्वरुपात घ्यावे लागणार आहे.

महानगरपालिकेस सुधारीत रुपये ४१८.०० कोटी प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त बाबी नुसार निविदा दरा मधिल फरका करीता आवश्यक रुपये ९८.३१ कोटी ऐवजी रुपये ५२.७५ कोटी तसेच योजनेतील मनपा हिस्सा रुपये ५४.८५ कोटी ऐवजी रुपये ३४.४५ कोटी असे एकत्रित रुपये ८७.२० कोटीची आवश्यकता आहे.

सह सचिव (नवि ३३) यांचे कडील बैठकीतील सुचनेप्रमाणे उक्त रुपये ८७.२० कोटी रक्कमेचे नियोजन महानगरपालिकेस शासन अंगीकृत महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे मार्फत त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने किंवा हुडको या वित्तीय संस्थेकडुन करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने महानगरपालिकेस प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केलेल्या रुपये ४१८.०० कोटीच्या नियोजना नुसार प्रकल्पातील विहीत उपांगे पुर्णत्वा करीता आवश्यक वित्तीय नियोजन सविस्तर धोरणात्मक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विषय क्रं.३९३ दिनांक १७.३.२०१८ अन्वये विचारार्थ व निर्णयास्तव सादर केलेला होता.मा.सर्वसाधारण सभेच्या पटलावरील विषय संदर्भाने मा.महापौर यांनी लेखा विभाग व मालमत्ता विभाग यांचा अहवाल घेऊन फेर प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केलेली होती. मा.सर्वसाधारण सभेतील सुचनेच्या अनुषंगाने MUIDCL / HUDCO कर्ज घेणे संदर्भाने लेखा विभागाने सविस्तर अहवाल विभागात सादर केलेला आहे.

लेखा विभागाकडील अभिप्राय नुसार भुमिगत गटार योजने करीता आवश्यक रुपये ८७.२० कोटी कर्ज स्वरुपात घेण्यात आल्यास महानगरपालिकेस किमान रुपये १२.०० कोटी प्रतिवर्ष रक्कम मुद्दल व व्याजा पोटी भरावी लागणार आहे.तसेच या करीता सन २०१८-२०१९ च्या अंदाजपत्रकांमध्ये

कर्ज निवारण निधी या लेखाशिर्ष अंतर्गत एकत्रित रुपये ५५.०० कोटीची तरतुद लेखा विभागाने केलेली आहे. लेखा विभागाने केलेल्या कर्ज निवारण निधी अंतर्गत रुपये २८.११ कोटी आय.डी.बी.आय.बँकेचे कर्ज रक्कम व उर्वरीत रक्कम आर्युविमा व खुल्या बाजारातील कर्ज रक्कम अदा करण्याचे समाविष्ट आहे.महानगरपालिकेने जे कर्ज घेतलेले आहे.त्या बाबतचे सविस्तर विवरण लेखा विभागाकडील अभिप्राया नुसार खालील प्रमाणे आहे.

| अ क्रं | संस्थेचे नाव | कर्ज रक्कम | मुद्दल भरणा रक्कम | व्याज भरणा रक्कम | एकुण भरणा रक्कम | मुद्दल शिल्लक रक्कम | व्याज शिल्लक रक्कम | एकुण शिल्लक कर्ज रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आयुर्विमा कर्ज (१९७७-२००२) | २७.४५ | १५.७३ | २०.५७ | ३६.३० | ११.४६ | १०.५८ | **२२.०५** |
| २ | खुल्या बाजारातील कर्ज (१९९०-१९९८) | १८.५६ | ३.५७ | १९.०८ | २२.६६ | १.३७ | १७.६७ | **१९.०४** |
| ३ | आय.डी.बी. आय बँक (२०१२-२०१४) | १९२.२४ | ९९.६६ | ९१.०६ | १९०.७२ | ९३.०३ | ३९.२५ | **१३५.४८** |
| **एकुण** | | **२३८.२५** | **११८.९६** | **१३०.७१** | **२४९.६८** | **१०५.८६** | **६७.५२** | **१७३.३७** |

भुमिगत गटार योजने करीता घेण्यात येणा-या कर्ज रक्कमेची परतफेड नियमित मालमत्ता करातुन (सिवेज कर सह) करण्यात येणार आहे.

तसेच महानगरपालिकेने आयडीबीआय बँकेकडुन घेतलेल्या रक्कमे करीता तारण म्हणुन ठेवलेल्या मालमत्तांची सविस्तर माहिती तसेच भुमिगत गटार योजने अंतर्गत हुडको या वित्तीय संस्थेकडुन प्रस्तावित कर्ज रक्कमे करीता त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीनुसार एकुण कर्ज किंमतीच्या १२५ % मालमत्ता तारण ठेवणे करीता आवश्यक मालमत्तांची सविस्तर माहिती मालमत्ता विभागाने खालील प्रमाणे उपलब्ध करुन दिलेली आहे. मालमत्ता विभागाने कोणत्याही वित्तीय संस्थेकडे तारण न ठेवलेल्या मालमत्ताची यादी विभागात सादर केलेली आहे.सदरील यादीच्या अनुषंगाने त्यांचे मुल्यांकन काढणे करीता नोंदणीकृत मुल्यवर्धक (Valuer) यांचे कडुन मुल्यांकन करुन घेणे आवश्यक राहणार आहे.

| आयडीबीआय बँकेकडे तारण ठेवलेल्या मालमत्ता | कोणत्याही वित्तीय संस्थेकडे तारण न ठेवलेल्या मालमत्ता |
|---|---|
| न.भु.२९३५ खडकेश्वर वाचनालय | न.भु.१२८७७/अ-२ औरंगाबाद लँडमार्क जालना रोड औरंगाबाद. |
| न.भु.१४४७४ क्रांतीचौक व्यापारी संकुल व आरोग्य केंद्र | न.भु.१२८७७/अ-२ मुळे तापडीया इमारत |
| न.भु.२५६४ ज्युबली पार्क मनपा उद्यान | न.भु.१६०३१/४ तापडीया इमारत श्रेयनगर |
| न.भु.२५६८ ज्युबली पार्क मनपा उद्यान | न.भु.१९२५९ दिशा कोटगीरे इमारत |
| गट.न.४१० चिकलठाणा आठवडी बाजार | न.भु.१२८७७ रेमंड शोरुमच्या मजल्यावरील हॉल |
| न.भु.१५३०६/1 रिलायन्स मॉल लगतची इमारत गारखेडा औरंगाबाद | नुपुर अपार्टमेंट लगत मनपा व्यापारी सकुंल व हॉल |
| न.भु.४५८८ पिया मार्के औरंगपुरा औरंगाबाद | गट ३९ कांचनवाडी |
| न.भु.१७८०४ सिटी मार्वल इमारत निराला बाजार ते औरंगपुरा | गट २३२ चिकलठाणा दुग्धनगरी |

| | |
|---|---|
| न.भु.१९३८१/८/१ अ रेल्वेस्टेशन रोड बन्सीलालनगर | गट २१६/१७ हर्सुल |
| गट ७/१ कांचनवाडी एसटीपी प्लँट | न.भु.१८०८८ व १८०८९ खुली जागा |
| गट नं ६ कांचनवाडी औरंगाबाद | गट ४९९ चिकलठाणा एसटीपी प्लँट |
| गट नं ४ कांचनवाडी औरंगाबाद | सलीम अली सरोवर लगत एसटीपी प्लँट |
| गट नं ५ कांचनवाडी औरंगाबाद | सिध्दार्थ उद्यान |
| गट नं ६६ कांचनवाडी औरंगाबाद | नेहरु उद्यान |
| न.भु १२८७७/अे/१ सिटी प्राईड इमारत जालना रोड | एन ८ बॉटनिकल गार्डन सिडको औरंगाबाद |
| | एन ११ मनपा हॉस्पीटल हडको औरंगाबाद. |

उक्त लेखा विभाग तसेच मालमत्ता विभागाकडील अभिप्रायांच्या/बाबींच्या अनुषंगाने तसेच महानगरपालिकेस प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.फोर्ट्रेस अॅडव्हायजरी सर्व्हिसेस,मुंबई यांनी सादर केलेल्या रुपये ४१८.०० कोटीच्या प्रकल्पातील वित्तीय नियोजना नुसार प्रकल्पातील विहीत उपांगे पुर्णत्वा करीता आवश्यक रुपये ८७.२० कोटी महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे कडुन प्रत्येक आर्थिक वर्षात किमान रुपये २५ ते ३० कोटी प्रमाणे कर्ज स्वरुपात घेऊन वित्तीय उभारणी करणे,प्रकल्प पुर्णत्वा करीता आवश्यकता भासल्यास हुडको या वित्तीय संस्थेकडुन त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने कर्ज स्वरुपात रक्कमेची उभारणी करणे, प्रकल्प पुर्णत्वा करीता वेळोवेळी केंद्र व राज्य शासना कडील प्राप्त परीपत्रक/शासन निर्णय/सुचने नुसारची कार्यवाही करणे, MUIDCL / HUDCO कर्ज संदर्भाने आवश्यक करारनामे/हमीपत्र करणे, कर्ज परतफेड संदर्भाने आर्थिक नियोजन करणे,आयडीबीआय बँकेकडे तारण ठेवण्यात आलेल्या मालमत्ता व्यतिरिक्त तारण न ठेवण्यात आलेल्या उक्त मालमत्तांचे नोंदणीकृत मुल्यवर्धक (Valuer) यांचे कडुन मुल्यांकन करुन घेणे तसेच हुडको या वित्तीय संस्थेकडुन घ्यावयाच्या एकुण कर्ज रक्कमेच्या १२५ % मुल्यांकनाच्या मालमत्ता तारण ठेवणे संदर्भाने योग्य ती कार्यवाही करणे इत्यादी करीता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्राधिकृत करणे बाबतचा सविस्तर धोरणात्मक फेर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.विकास एडके :एमआयएमच्या सदस्यांनी पत्र देऊन या विषयावर बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. शासनाकडून या कामासाठी किती निधी आला व प्रत्येक वार्डात किती कामे या योजनेतून झाली सर्वांची संमती होत नाही. तोपर्यत हे कर्ज घेण्याचे टाळावे. ३०० कोटी आले ते कुठे जमा आहे. ही योजना झाली की नाल्यातून पाणी वाहणार नाही असे म्हटले होते. आजही माझे वार्डात नाल्यातून पाणी वाहते.

श्री.फेरोज खान :जो अहवाल देणार होते तो दिला नाही. या विषयाच्या संदर्भात माझ्या पक्षाच्या वतीने ओपन मतदान घ्यावे अशी माझी मागणी आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :कर्ज घेणार असेल तर कर्ज निवारण निधी स्थापन केला का? कोणतेही कर्ज घेत असतांना कोणत्या पध्दतीने कर्जाची परतफेड करणार? काय नियोजन आहे? यासाठी वेगळे अकाऊंट करून कर्ज निवारण निधी स्थापन करायचा असतो. तो कर्ज निवारण निधी स्थापन केलेला नाही. खुल्या बाजारातील कर्ज १८.५६ कोटी रुपये घेतले त्याचे व्याज किती दिले पाहिजे? यात म्हटले की, त्यांचे व्याज १९.०८ कोटी रुपये व्याज भरले गेले, हे योग्य वाटत नाही. ज्या मालमत्ता गहाण ठेवणार त्यात सिध्दार्थ उद्यानाचा समावेश, ज्या १०८ हुतात्म्याने मराठवाडा मुक्ती संग्राममध्ये जिवाची आहुती दिली. त्यांचे स्मारक गहाण ठेवण्याचा विषय आणला. ज्यांचेमुळे सभागृहात आहोत, या राज्याची स्थापना

झाली. अशा हुतात्मा झालेल्या स्मारक गहाण ठेवण्याची वेळ येत असेल तर यासारखे दुर्देव नाही. आजही मालमत्ता कराची थकबाकी २०० कोटी रुपये आहे. १५० कर्मचारी वसुलीसाठी घेतले. यांना कामाला लावून ८० कोटी या रुपये योजनेच्या कामासाठी वसुल करू शकत नाही का? वारंवार प्रस्ताव ठेवून हे कर्ज घेणेसाठी प्रशासनाचा हट्टहास कशासाठी? मागील सहा बैठकीपासून हा विषय येतो. हा विषय रद्द करावा किंवा फेटाळण्यात यावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :यापूर्वी तीन कर्ज घेतले एका कर्जाची परतफेड करीत आहोत. ते कर्ज परतफेड करू शकत नाही, तर नवीन कशासाठी घेत आहोत? याची परतफेड कशी करणार आहे? ही योजना झाली की नाले कोरडे दिसतील पाणी वाहणार नाही, असे सांगण्यात आले. आजही पाणी वाहते. जनतेचा पैसा आहे, योग्य ठिकाणी खर्च व्हावा. चुकीचे काम होऊ नये. ८७ टक्के काम झाले सांगता तर हे कर्ज कशासाठी पाहिजे. ७ वे वेळेस प्रस्ताव कशासाठी येतो. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.राजू शिंदे :किती कि.मीटर रस्ते या कामासाठी खोदण्यात आले? मुकूंदवाडी येथे रस्ता खोदला त्यानंतर मनपाने ७० लक्ष रुपये खर्च करून डांबरीकरण केले.

कार्य.अभियंता -ड्रेनेज :३४ कि.मी रस्ते खोदले. पुर्ण शहरात ३ कि.मीटर सिमेंट रस्ते खोदले गेले. पेव्हर ब्लॉक दीड कि.मी, २९ कि.मीचे रस्ते डब्ल्यु बीएमने केले. १४ कि.मी.चे रस्ते करणे बाकी आहे.

श्री.विकास एडके :वर्कऑर्डर मध्ये किती लाईन करायची होती? किती केली ? एसटीपी किती केले? कमी काम केले असेल तर पैसा शिल्लक असायला पाहिजे. कर्ज घेण्याची गरज नाही.

श्री.राजू शिंदे :६०-७० कि.मी.रस्ते खोदले एकाही रस्त्यावर डांबरीकरण सिमेंट टाकले नाही. ज्या वेळेस खोदले तेव्हाच ते काम का केले नाही? नाल्यातून लाईन टाकणे ऐवजी रस्त्यावर टाकली. रस्ता खोदला तेवढेच पॅचवर्क करून चालणार नाही.

कार्य.अभियंता :काही रस्त्याचे कामाचे एक लेअर टाकायचा आहे. ते दबण्याची शक्यता आहे. रस्ते हे ब्रँच सिवरसाठी खोदले त्याचे मेटलीन केले. त्यानंतर ५० टक्के रस्ते डांबरीकरण केले.

श्री.राजू शिंदे :खोदकाम केले तेथे अपघात झाले. हे कर्ज घेऊन मुख्य लाईन पुर्ण होणार आहे. बाकीचे कामे वार्डातील अंतर्गत लाईन होणार नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :योग्य पध्दतीने लाईन टाकली नाही. ढोबळ पध्दतीने काम केले गेले.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :२६० कि.मी. लाईन टाकण्याची तरतूद होती. त्यापैकी ८५ कि.मीटर होणार आहे. इतर लाईन अमृत मध्ये प्रस्तावित करीत आहे. किमान शहरात ५०० कि.मीटर लाईन असेल.

श्री.राजू शिंदे :१३९० कि.मी लाईन जुन्या शहरात असेल. इतर मिळून २००० कि.मी. लाईन आहेत. ८५ कि.मी.साठी हे कर्ज घेणार असेल तर योग्य नाही. जेवढे काम होईल त्यांचे टेक्नीकल ऑडीट करावे. पीएमसीच्या सांगण्यावरून बिल काढले जाते. त्याच कंपनीची पीएमसी आहे. या संपूर्ण योजनेच्या कामाची उच्च स्तरीय पवई आयआयटी मार्फत चौकशी करावी. टेक्नीकली हे काम बरोबर होत आहे का? ते पहावे त्यानंतर हा विषय घ्यावा तोपर्यंत घेऊ नये. नाल्यात चेंबर

बांधले त्यात कचरा अडकणार आहे. ढापे ओपन होणार आहे लाईन चोकअप होणार आहे. टेक्नीकली हे काम बरोबर आहेत का ?

कार्य.अभियंता :चेंबरची साईज पाईपच्या डायमीटरवर अवलंबून असते. डीपीआर प्रमाणे बरोबर आहे. हे सर्क्युलर चेंबर आहे. त्यामूळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत नाही.

श्री.राजू शिंदे :डीपीआर मध्ये ६ एसटीपी होते ४ का केले? रेल्वेक्रॉसींगच्या ठिकाणी लाईनसाठी डीपीआर मध्ये तरतूद का नव्हती? पाणी अडल्यानंतर साईडने पाणी जाणार पाण्याचा प्रवाह बाजुने जाणार लोकांच्या घरामध्ये पावसाळ्यात पाणी घुसणार आहे व यामूळे जिवीतहानी होणार त्यास जबाबदार कोण असणार आहे?

श्री.प्रमोद राठोड :डीपीआर मध्ये तरतूद का नव्हती? याचा अर्थ डीपीआर चुकीचा होता का?

श्री.राजू शिंदे :स्मशानभुमीची भिंत या योजनेचे कामासाठी तोडली. तिचा खर्च मनपाने केला. डीपीआर मध्ये ते का आले नव्हते? जास्तीत जास्त नाल्यातून लाईन टाकू नये असे होते. परंतु नाल्यात जास्त लाईन टाकल्या जे की, यांना सोपे होते म्हणून काम करून टाकले. जेथे मनपाचे नुकसान होते याकडे अधिकारी यांचे लक्ष नाही. अधिकारी ठेकेदाराची बाजू घेऊन काम केले गेले. १० टक्के हिस्सा मनपास टाकायचा होता. म्हणून त्यावेळीच वाढीव खर्च दाखविला होता तर ते १० टक्के पैसे कुठे खर्च केले. चुका करणार, मनपाला भुर्दंड पडणार आहे. पीएमसीचे काम बरोबर नाही. बील देऊ नये सांगितले होते. कार्यवाही केली नाही. हे सर्व मिलीभगत आहे याची टेक्नीकल पवई आयटीकडून चौकशी करावी जे नुकसान झाले जे दोषी असेल कार्यवाही करावी. दोन वर्ष झाले तरी ३४ कि.मी.रस्ते अजून होत नाही.

श्री.प्रमोद राठोड :हा प्रस्ताव सातव्यांदा आलेला आहे. तत्कालीन आयुक्त श्री.बकोरीया यांनी पहिल्यांदा प्रस्ताव रुपये १०० कोटीचा ठेवला होता. त्यानंतर श्री.मुगळीकर साहेबांनी अभ्यास करून पुन्हा रु.८७ कोटीचा ठेवला. यावर विषयावर अनेकदा चर्चा झाली. या विषयाच्या बाबतीत मा.महापौरांची भुमिका काय आहे. ३-४ सदस्यच सांगतील की, कर्ज घ्यावे. कारण कचरामध्ये सर्व काही महापालिकेला लुटत आहे. मनपाचे अधिकारी कपंनीला मिळालेले आहे. सर्व कंपनीच्या हिशोबाने काम होत आहे. त्यासाठी कर्ज घेतो आहे का? अनेक प्रकरणात घोटाळे चालू आहे. सध्या येथे आयुक्त नाहीत जे आयुक्त येतील त्यांची भुमिका काय आहे ती घ्यावी. विरोध असतांना वारंवार ठराव कशासाठी येतो? इच्छा नसतांना ठेकेदाराला पैसे देणेसाठी सातत्याने ठराव आणला जातो हे योग्य नाही. असा ठराव घेऊन नेमका कुणाला फायदा आहे? ही योजना पुर्ण व्हावी सर्वांची भुमीका आहे. असे असताना वेगवेगळ्या ठिकाणी अवास्तव पैसे खर्च करणार, डीपीआर चुकीचा आहे. अधिकारीच सांगतात. कर्ज लागते अधिकारीच सांगणार हे योग्य नाही. शहराच्या नागरीकांच्या डोक्यावर बोजा टाकू नये. शहराला खुप काही लुटले कशासाठी कर्ज घेतो आहे? अशा विषयाच्या बाबतीत मा.आयुक्ताची भुमिका महत्वाची असते जे अधिकारी आहे ते सर्व मिळालेले आहे ६ एसटीपीचे ४ एसटीपी केले, डीपीआर मध्ये जे नाही ते करायचे, काही गोष्टी

चुकीच्या आहे परंतु अधिकाऱ्याच्या फायद्याचा असेल त्या करणार हे थांबले पाहिजे. शहर आपल्याकडे चांगल्या अपेक्षेने बघते आहे. नागरीकांना न्याय द्यावा. अधिकाऱ्याच्या बोलण्यानुसार प्रस्ताव मंजूर करू नये रद्द करावा. प्रत्येक ठिकाणी संधी मिळाली की, लुटले जाते. रु.६५ लक्षची पावडर घेतले, रु.५ कोटीचे कचऱ्यासाठी खड्डे केले. लुट चालूच आहे. प्रशासनाला धाक लावावा. सातत्याने चुका होतात. या प्रस्तावा वर माहिती घेणेसाठी शासनाकडून कायम स्वरूपी आयुक्त येतील त्यांची भुमिका मांडू द्या अभ्यास करू द्या त्यानंतर हा विषय नागरीकांसमोर प्रेझेन्ट करावा. राजकीय असेल प्रशासकीय अधिकारी असतील का बर संशय येतो आहे. सर्वाबद्दल संशय निर्माण केला जात आहे. मा.महापौराची भुमिका काय ती स्पष्ट करावी. आयुक्त आल्यानंतर हा प्रस्ताव यावा येथे बसलेल्यापैकी २३ पैकी आजही २० लोक यांचे अगेन्स मध्ये असतील. नागरीक आपल्याकडे मोठ्या अपेक्षेने बघत आहे. योग्य तो निर्णय या बाबत होणे अपेक्षीत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :जेव्हा मनपाच्या जनतेच्या हिताचे विषय येतात. त्यांचे आम्ही समर्थन पण करतो, रु.८७ कोटीचा हा विषय यावर अनेक वेळा चर्चा झाली, मनपाच्या हिताचा परिस्थितीचा विचार करावा. आजची परिस्थिती बरोबर नाही. रु.२००-२५० कोटीचे बिले आजही देणे आहे. भुमिगत योजनेतून राहिलेली कामे ही एकाच वेळी महिना दोन महिन्यात करणार आहेत का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज :८५ कि.मीटरच्या अंतर्गत वाहिनी टाकायची आहे. मेन सिवरचे एसटीपीचे काम शिल्लक आहे. या कामास सप्टेंबर पर्यत मुदत दिली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :स्थायी समितीने यासाठी तरतूद ठेवली का? असेल तर कोणत्या कामासाठी ठेवली आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :प्रशासनाने रु.५७ कोटीची तरतूद ठेवली. कॅपीटल वर्कसाठी ठेवली आहे. कारण नंतर तरतुद उपलब्ध राहत नाही, असे सांगीतले जाते.

श्री.त्र्यंबक तुपे :रु.५७ कोटीची तरतुद ठेवली जाते दुसरीकडे रु.८७ कोटी कर्ज काढायचे सांगतात. प्रशासनाची भुमिका काय आहे?

श्री.राजू शिंदे :प्रशासनाने तरतुद ठेवली याचा अर्थ महापालिका तरतूद करू शकते. याचा अर्थ प्रशासनातील अधिकारी यांना महापालिकेवर विश्वास नाही.

कार्य.अभियंता :मागिल वर्षीसुध्दा विभागा अंतर्गत तरतूद ठेवली होती. बजेट मध्ये अपेक्षीत खर्च दाखवावा लागतो.

श्री.त्र्यंबक तुपे :रु.५७ कोटी ठेवले. आता रुपये २०-२५ कोटीचा प्रश्न आहे. रुपये २००-२५० कोटी आज देणे असेल. रेल्वे क्रॉसींगसाठी काम होते, किती ठिकाणी रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी काम झाले?

कार्य.अभियंता :पाच ठिकाणी होते, ४ ठिकाणी झाले, एक ठिकाणी राहिलेले आहे. एकासाठी रुपये ३.५० कोटी लागतील.

श्री.त्र्यंबक तुपे :रु.५७ कोटीची तरतूद केली, ही कामे एकाच वेळी पुर्ण करायची नाही. ४-६ महिने लागू शकतात. पावसाळा आल्यानंतर किती काम चांगले झाले? लक्षात येईल. तारामती भवन जवळ चेंबरच्या बाजूला १ ते दीड फुट जागा पाणी जाणेसाठी आहे. पाऊस आला नाल्याला पाणी आले. तर घरामध्ये पाणी जाणार

आहे. कर्ज काढून अंतर्गत लाईन टाकणार नाही. आजची परिस्थिती पाहता. मनपाला देणे मोठे आहे. एलईडीचे देणे आहे. रु.५७ कोटी बजेट मध्ये आहे रु.३०-३५ कोटीची आणखी तरतूद करावी. मनपाच्या फंडातून काम करावे हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :यासाठी काँग्रेस सरकाने निधी दिला होता. प्रत्येक नाला ड्रेनेजचे पाण्याने वाहतो अनेक लाईन जोडल्या नाही. चेंबर बांधले बाजूला जागा कमी आहे. लोकांच्या घरात पाणी जाणार आहे टेक्नीकल बाबी विचारात घेतल्या नाही. रस्ते खोदले काम केले नाही. सोहम मोटर ते महालक्ष्मी चौक पर्यत लाईन टाकली. त्या रस्त्यावर डांबरीकरण केले नाही. विमानतळाच्या भिंतीच्या बाजूला असलेला रस्त्यात चिखल होतो, तेथे काम केले नाही. जो प्रस्ताव मांडला त्यास आमचा विरोध आहे. मनपाच्या फंडातून जे काम आवश्यक आहे ते काम करावे.

श्री.भगवान घडमोडे :कम्पोस्ट पीट करणेमध्ये शंका येते, पावडर खरेदी हिशोब लागत नाही, रिक्षा किती घेतल्या? आऊट सोर्सींगचे कर्मचारी किती? बीले किती काढली? पाण्याच्या टँकरचा विषय प्रशासनाला माहित नाही. फायरच्या गाडयाचा विषय मंजूरीला आला बाहेर अशी चर्चा की, हीच वाहने ५० टक्के रक्कमेपर्यत मिळू शकतील तर ३ कोटीचा प्रस्ताव का आणला? मा.महापौरांना बदनाम करण्याचा प्रशासनाचा इरादा आहे का? या प्रस्तावानुसार डीपीआर प्रमाणे काम केले नाही. बदल केला कुणी सांगितले, सभागृहाची मान्यता घेतली होती का? शहरात किती लाईन टाकणे बाकी आहे? कर्ज काढून शहरातील प्रश्न सुटणार आहे का? अंदाजपत्रकानुसार ऑदरवाईज काय काम करणार आहे? ते सांगावे. त्यानंतर यावर विचार करावा. जे आयुक्त म्हणून बसले त्यांचा खुलासा घ्यावा. ऐनवेळीच्या प्रस्तावावर आयुक्त म्हणून अति.आयुक्त यांचे सह्या चालतात तर या विषयाबाबत ते खुलासा का करू शकत नाही?

अति.आयुक्त :आयुक्त म्हणून मला प्राधिकृत केले या विषयाची मला माहिती नाही.

श्री.भगवान घडमोडे :अंदाजपत्रकानुसार किती कि.मी.काम झाले? बदल कसे झाले? कर्ज काढून पुर्ण काम होणार नसेल तर कर्ज कशासाठी घेता? कचरा,पाणी,रस्ता,लाईटचा प्रश्न आहे, असे असतांना पुन्हा १०० कोटी कर्ज काढणार, हे योग्य नाही. कंपनीशी अधिकारी यांची मिलीभगत आहे. सभागृहाला वेठीस धरत आहे. डीपीआर प्रमाणे काम झाले का?

श्री.राजू शिंदे :आयुक्त म्हणून अति.आयुक्त बसलेले आहेत की नाही? कर्ज घेण्याची वेळ पडली तर आयुक्त जबाबदार असणार की नाही. ठराव आला मंजूर झाला मला माहिती नाही असे प्रशासनाला म्हणता येणार नाही. प्रशासन म्हणून कोण खुलासा करणार आह?

श्री.प्रमोद राठोड :मागच्या वेळेस असे ठरले होते की, आयुक्त यावर त्यांची भुमिका स्पष्ट करतील. त्यानंतर चर्चा करू प्रस्ताव आला याचा अर्थ आयुक्त म्हणून आपण या ठिकाणी आहेत. प्रशासन म्हणून जे बसले त्याची जबाबदारी आहे.

श्री.राजू शिंदे :हा प्रसताव मंजूर झाला. चुकीचा झाला तर, विखंडीत साठी जे आयुक्त बसले ते पाठविणार की नाही, त्यांनी सांगावे.

श्री.प्रमोद राठोड :आम्ही सांगतो त्याप्रमाणे झाले नाही. हे मंजूर झाले आमचा विरोध असेल तर शासनाकडे विखंडीत साठी पाठवावा लागेल. ही जबाबदारी जे आयुक्त म्हणून बसलेले आहे. त्याची जबाबदारी राहिल. प्रशासन भुमिका मांडायला अपयशी आहे. आम्हाला उत्तर पाहिजे. प्रशासनाचे प्रमुख अति.आयुक्त ही जबाबदारी घ्यायला तयार आहे की नाही? ते इतिवृत्तांत यावे.

श्री.भगवान घडमोडे :या प्रकरणी अनेक वेळा चर्चा झाली. चौकशी आदेश दिले. श्री.बारवाल साहेब यांनी आदेश दिले चौकशी केली नाही. जनतेला वेठीस धरू नये प्रस्ताव रद्द करावा मनपा फंडातून काम करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :सुरूवातीला १०० कोटीचा प्रस्ताव त्यानंतर कमी रक्कमेचा आला आता ८७ कोटीचा दिला. ५४ कोटीत काम होणार असे यापूर्वी अधिकारी यांनी म्हटले होते. असे असतांना ८७ कोटीचा प्रस्ताव का दिला. यापूर्वी स्थायी समितीत यावर सविस्तर चर्चा झाली होती. प्रशासन किती दोषी आहे? किती चुका या प्रोजेक्ट राबवितांना झाल्या? ऑडीट मध्ये आले होते. बदल करायचे असेल तर शासनाची मान्यता पाहिजे. डीपीआर नुसार अनेक बदल केले शासनाची मंजूरी नाही. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन पवई आयआयटी कडून मार्फत चौकशी करण्याचे आदेशीत केले होते. फायनॅनशीयल ऑडीट नागपूरच्या विभागाकडून करावे. आदेशीत केले, कार्यवाही का केली नाही? जे सभेने आदेश दिले ते कार्यवाही केली नाही. पीएमसीचे काम चांगले होत नाही हे का सांगण्यात आले नाही? काही जागा घेतल्या, मागील रेडीरेकनर नुसार घेतल्या पैसे देणार. आजच्या रेडीरेकनरनुसार काही जागेच्या बाबतीत सभेसमोर ठराव आला नाही हे योग्य वाटत नाही. जे प्रश्न केले त्याचे उत्तर मिळावे.

कार्य.अभियंता :दिनांक ३०-११-२०१६ च्या बैठकीत प्रस्ताव आले होते.

श्री.राजू शिंदे :दिनांक ३०-११-१६ च्या सभेत ठराव आला की, मनपाची आर्थीक परीस्थीती बरोबर नसल्याने महापालिकेने विनंती केल्यानुसार त्या विकासकाने ती जागा खरेदी केली व तीन महिण्यामध्येच पुन्हा प्रस्ताव आला की रेडीरेकनरप्रमाणे पैसे द्यावे लागणार तीन महिन्यात परीस्थिती सुधारली होती का, बजेट मध्ये रु.५७ कोटीची तरतूद करता व परीस्थिती खराब आहे म्हणून कर्ज घेण्याचे सांगता हे योग्य नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :एका जागेची परवानगी घेतली होती उर्वरीत जागेची परवानगी घेतली नाही त्यावेळी जागा घेतली आजच्या रेडीरेकनरनुसार पैसे देणार का? डीपीआर बरोबर केला नाही. रेल्वे क्रॉसींगचे काम केले. रु.७ कोटी खर्च केले. शहराच्या नागरीकांवर रु.८७ कोटीचा बोजा टाकतो हे योग्य नाही. नागरीक आपल्याकडे आशेने बघत आहे. मा.महापौर यांची भुमिका काय आहे? ठराव पास करायचा असेल तर ती शिवसेनेची भुमिका आहे का? प्रस्ताव रद्द करावा. रद्द करणार नसेल तर शासनाकडे आम्ही दाद मागू.

श्री.विकास जैन :दिनांक ३०-११-२०१६ रोजी जो ठराव झाला तो काय होता?

श्री.राजगौरव वानखेडे :जागेचा विषय, मॅन्टेनन्ससाठी द्यायचे, एसटीपी चेंज केले, डीपीआर चेंज केला हे सर्व दिनांक ३०.११.२०१६ रोजी झाले असे सांगता, या सभेत किती विषय

मंजूर झाले? डीपीआर चेंज करायचा असेल तर शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

कार्य.अभियंता :जेवढे चेंजेस झाले. त्याची माहिती त्या सभेच्या प्रस्तावात दिली आहे. क्वाँटिटी वाईज चेंज झाले होते. शासनाकडे गेलो होतो. चर्चा केली त्यांनी म्हटले की कॉस्ट वाढत नाही म्हणून सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने प्रोजेक्ट पुढे नेऊ शकता.

श्री.राजगौरव वानखेडे :कॉस्ट वाढत नाही याचा अर्थ परवानगी घेण्याची गरज नव्हती का?

श्री.विकास जैन :अनेक वेळा हा विषय आलेला आहे. जो काही निर्णय घ्यायचा तो घ्यावा. ही योजना करायला पैसे लागत असेल तर मंजूर करायला हरकत नाही.

(या अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात व ही शिवसेनेची भुमिका आहे का असे विचारणा होते.)

श्री.राजेंद्र जंजाळ :योजना पुर्ण व्हावी ही भुमिका आहे. कर्ज घ्यावे ही आमची भुमिका नाही. प्रत्येक सदस्याला त्याचे वैयक्तिक मत मांडायचा अधिकार आहे. कुणी मत मांडत असेल तर ते पक्षाचे मत आहे असे ग्रहीत धरता कामा नये. योजना व्हावी परंतु कर्ज काढून नये कोणतीही मालमत्ता गहाण ठेवू नये.

श्री.प्रमोद राठोड :कुणाच्या वैयक्तिक मतामूळे शहरातील जनतेच्या डोक्यावर बोजा टाकू नये. कुणाचा दबाव असेल तर तसे सांगावे.

मा.महापौर :सहाव्यांदा हा प्रस्ताव आला, सदस्यांनी आपली भुमिका स्पष्ट केली, हा प्रकल्प पुर्ण व्हावा. सर्वाची भावना आहे. जागा तारण ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला. परंतु कोणतीच मालमत्ता तारण ठेवू नये?

श्री.प्रमोद राठोड :आमचे म्हणणे आहे कर्ज घेऊ नये.

श्री.भगवान घडमोडे :या योजनेला कर्ज घेण्याची गरज नाही.

(या वेळी सदस्य मोठमोठ्याने बोलत असतात.)

मा.महापौर :जो निर्णय देणार तो ऐकूण घ्यावा, सर्वांचे म्हणणे नोंद करून घेतले आहे. श्री.घडमोडे आपण सुध्दा महापौर राहिलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे :पावडर खरेदी, कम्पोस्ट पीट ६७-३ सी मध्ये केले, रिक्षा घेतल्या. अधिकारी यांना शिस्त लावावी.

मा.महापौर :शासनाची एक वित्तीय संस्था उन्फुरा आहे, या माध्यमातून कुठलीही योजना करणेसाठी शासनाकडून या माध्यमातून अनुदानीत पैसे मिळतात. ते सुध्दा तपासून घ्यायचे आहे दोन टप्प्यात शासनाकडून पैसे घ्यायचे आहे एक या वर्षात व पुढील वर्षात, दोन वर्ष योजना चालली तरी हरकत नाही. परंतु योजना पुर्ण झाली पाहिजे. उरलेले पैसे जे आहे ते मनपा फंडातून तरतूद करायची अंतर्गत वाहिन्या झालेल्या नाहीत. त्या पुर्ण करायच्या आहे अशा सुचना विचारात घेऊन कुठल्याही मालमत्ता तारण न ठेवता दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करावी उन्फुराकडून ते घ्यायचे ५ टक्के अनुदानित आहे. ७ टक्के उंफुराचे जे आहे ते शासनाचे आहे. राज्य शासनाची ही वित्तीय संस्था आहे.

श्री.राजू शिंदे :राज्य शासनाकडून घेतले काय व खाजगी मधून घेतले काय एकच आहे.

मा.महापौर :त्यात पाच कोटी अनुदान आहे. वर्षातून एकदाच रु.२५-३० कोटी मिळतात.

श्री.राजू शिंदे :शहरातील अंतर्गत लाईनसाठी व सातारा देवळाई साठी पण असा निधी घ्यावा.

मा.महापौर :तसा डीपीआर रु.१८३ कोटीचा राज्य शासनास पाठविला आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात सदस्यांनी मांडलेल्या सुचना विचारात घेता, भुमिगत गटार योजनेच्या प्रकल्पातील विहित उपांगे पुर्णत्वाकरीता कर्ज घेण्याच्या या प्रस्तावामध्ये शासनाची वित्तीय संस्था उन्फुरा माध्यमातून कुठलीही योजना करणेसाठी शासनाकडून अनुदानीत पैसे मिळतात. ते सुध्दा तपासून घ्यायचे आहे राज्य शासनाची ही वित्तीय संस्था आहे. दोन टप्प्यात शासनाकडून पैसे घेऊन योजना पुर्ण करण्यासाठी आणि उरलेले पैसे मनपा फंडातून तरतूद करण्यास तसेच कुठल्याही मालमत्ता तारण न ठेवता दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२२ अंतर्गत सिटीचौक पोलीस स्टेशनच्या पाठीमागील व्हाईट हाऊस इमारत समोरील चौकास स्वर्गीय अमिर-ए-शरीयत अब्दुल वहीद खान नक्षबंदी (वहीदकाका) यांचे नाव देण्यात यावे.

वहीद काका हे शहरातील अमिर-ए-शरीयत होते. त्यांनी कोणत्याही मुद्यावर एकतर्फी निर्णय घेतलेला नाही व त्यामध्ये कधीही राजकारणास थारा दिलेला नाही. शहरातील अनेक सामाजिक कामे केलेली असल्याने सर्व समाजातील लोकांच्या मनात त्यांच्या विषयी आदर होता.

शहरात कोणत्याही प्रकारचे धार्मिक प्रश्न निर्माण झाल्यास त्यांनी कधी ही एकतर्फी निर्णय घेतलेला नव्हता. त्यामुळे शहरातील शासकीय, राजकीय, सामाजिक व सामान्य लोकांच्या मनपा वहीद काकाचा मान-सन्मान होता.

करीता, वॉर्ड क्र.२२ अंतर्गत सिटीचौक पोलीस स्टेशनच्या पाठीमागील व्हाईट हाऊस इमारत समोरील चौकास स्वर्गीय अमिर-ए-शरीयत अब्दुल वहीद खान नक्षबंदी (वहीद काका) यांचे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ
**अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन,श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.विकास रतनलाल जैन
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२२ अंतर्गत सिटीचौक पोलीस स्टेशनच्या पाठीमागील व्हाईट हाऊस इमारत समोरील चौकास स्वर्गीय अमिर-ए-शरीयत अब्दुल वहीद खान नक्षबंदी (वहीद काका) यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारेगाव वॉर्ड क्रमांक-३५ अंतर्गत असलेले हनुमान (मारोती) मंदीर हे ४०-५० वर्षापेक्षा जास्त जुने असून येथील चौकास हनुमान चौक नाव देण्यात यावे. अशी येथील गावकऱ्यांनी मागणी आहे. म्हणुन हनुमान चौक नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मलके गोकुळसिंग संपतसिंग **अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगाव वॉर्ड क्रमांक-३५ अंतर्गत असलेले हनुमान (मारोती) मंदीर येथील चौकास हनुमान चौक नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भीमनगर, भावसिंगपुरा या परिसरात विविध वसाहती अस्तीत्वात आल्या असून लहान मुले व नागरीक अशी पन्नास हजारापेक्षा अधिक लोकसंख्या आहे. येण्या-जाण्यास एकमेव नंदनवन कॉलनीचा रस्ता आहे. यांना दुसरा कुठलाही पर्यायी रस्ता नाही.

सध्या नागरीक वापरत असलेला रस्ता हा नंदनवन कॉलनीच्या अंतर्गत रस्ता असून हा रस्ता अरुंद आहे.

डी.पी.प्लॅन प्रमाणे आरक्षीत असलेला रस्ता तयार करण्यासाठी नंदनवन कॉलनीतील प्लॉट क्रमांक-०१ चे भुसंपादन केल्यास परिसरातील पन्नास ते साठ हजार नागरीकांना येण्या-जाण्यास योग्य रस्ता उपलब्ध होईल व त्या ठिकाणी सतत होणारे अपघातास आळा बसेल.

तरी नंदनवन कॉलनीतील प्लॉट क्र.०१ चे भुसंपादन करून संबंधीत रस्ता तयार करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे **अनुमोदक:-**श्री.रुपचंद वाघमारे, श्रीमती विजया संजय बनकर

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. नियमाने कार्यवाही व्हावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भीमनगर, भावसिंगपुरा या परिसरात डी.पी.प्लॅन प्रमाणे आरक्षीत असलेला रस्ता तयार करण्यासाठी नंदनवन कॉलनीतील प्लॉट क्र.०१ चे भुसंपादन नियामनुसार करून संबंधीत रस्ता तयार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती काथार अपेक्षा दत्तात्रय या सहशिक्षीका या पदावर प्रा.शा. शहापूर केंद्रीय प्रा.शा. गाजगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद येथे कार्यरत असून त्यांच्या आजारी वयोवृध्द सासु-सासरे यांचे समवेत औरंगाबाद येथे वास्तव्यास आहेत. त्यांची देखभाल तसेच कौटूंबिक जबाबदारी असल्याने त्यांना बाहेरगावी कर्तव्यावर दररोज १०० कि.मी. येण्या-जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. त्यांनी शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद औरंगाबाद येथून महानगरपालिका औरंगाबाद येथे येण्यासाठी आवश्यक सर्व अटी व शर्तीची पुर्तता करून प्रस्ताव दाखल केलेला आहे.

श्रीमती अपेक्षा दत्तात्रय काथार यांच्यावर असलेल्या कौटूंबिक जबाबदारी संदर्भात सहानुभुती पुर्वक विचार होऊन त्यांना जि.प.औरंगाबाद येथून औरंगाबाद महागरपालिका शाळेत एकतर्फी सामावून घेण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेची मान्यता होऊन नाहरकत देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे,श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे

श्री.भगवान घडमोडे :असे ठराव करत असतांना किती शिक्षक अतिरिक्त आहे पायंडा चुकीचा पडत आहे. शोध घ्यावा. शिक्षक मर्ज करतांना काय निकष असतात? ते पाळले जात नाही. एक व्यक्ती खाजगी कंपनीत नोकरीवर आहे त्याचे पत्नीला मनपा सेवेत घेतले हे योग्य वाटत नाही. नियमानुसार कार्यवाही व्हावी.असे किती शिक्षक घेतले.

मा.महापौर :विषय मंजूर सुचना विचारात घ्यावी कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती अपेक्षा दत्तात्रय काथार, सहशिक्षीका, प्रा.शा. शहापूर केंद्रीय प्रा.शा.गाजगाव,ता.गंगापूर,जि.औरंगाबाद यांना औरंगाबाद महागरपालिका शाळेत एकतर्फी सामावून घेण्यास व त्याबाबतीत नाहरकत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई हा परिसर महानगरपालिकेच्या अखत्यारित येऊन तीन वर्ष झाली आहेत. तरी त्यांना आपण आतापर्यंत दैनंदिन जीवनावश्यक गरजांची पुर्तता केलेली नाही. सातारा-देवळाई परिसरात पोलवर लाईट नसल्यामुळे रात्रीच्या वेळेस परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेस नागरीकांना प्रचंड असुविधेचा सामना करावा लागतो. अंधारामुळे रात्रीच्या वेळेस महिलांना रोडने येणे-जाणे अवघड झाले आहे. तसेच परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळेस मुलींना ट्युशनला येणे जाणे सुध्दा त्रासदायक ठरत आहे.

करीता महानगरपालिकेने पोलसहित एल.ई.डी.लाईट फिटींगचे काम दिलेले आहेत त्याची सुरूवात सातारा-देवळाई परिसरातून करण्यात यावी व मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत एक हजार जास्तीचे पोल सहित पथदिवे लावण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

श्री.राजू शिंदे :४० हजार लाईट लावणार आहे. १ हजार पोल लावावे व एलईडी लाइ्ट लावावे. काम चालू करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :लाईट साठी स्मार्ट सिटीतून किती तरतूद आहे? मोठी रक्कम येत असेल तर एलईडीचे ४० हजार लाईट लावणार आहे प्रकाश कमी येतो. स्मार्ट सिटीचा मोठा पैसा असेल तर रु.१०० कोटी येणार असेल तर सर्व शहरात लाईट लावले जातील. एलईडीचे ४० हजार लाईट या कंपनीकडून लावणे. बंधनकारक आहे का? ४० पैकी १० हजार लावले तर रु.२ कोटीचे एलईडी एजन्सीला महापालिकेला जे देणे आहे ते द्यावे लागणार नाही.

श्री.राजू शिंदे :पोल खरेदी करायचे कसे करता येतील?

कार्य.अभियंता :एलईडी प्रोजेक्ट हा संपूर्ण सिटीसाठी आहे.

मा.महापौर :सातारा देवळाई साठी एलईडी एजन्सीकडून फिंटींग घ्याव्यात. एक हजार पोलचे टेंडर लगेच तयार करावे. स्मार्ट सिटी हा मनपाचा प्रोजेक्ट आहे. स्मार्ट सिटीतून तरतूद झाली. तर एलईडीचे जे काम आहे ते कमी करून किती रक्कम कमी करता येईल? त्याची माहिती सह ठेवावे व निर्णय घ्यावा.

कार्य.अभियंता-श्री.अली :एलइडीचा प्रोजेक्ट हा अगोदर मंजूर झालेला आहे. हा विषय बोर्ड समिती समोर ठेवून कार्यवाही करता येईल. नवीन प्रोजेक्ट करू शकतो.

मा.महापौर :स्मार्ट सिटीतून किती पैसे मिळतील. ते पहावे. हा विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेने पोलसहित एल.ई.डी.लाईट फिटींगचे काम दिलेले आहे, त्याच्या मधून १००० फिटींग सातारा-देवळाई परिसराकरीता व्यवस्था करण्यात यावी व मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत एक हजार जास्तीचे पोल सहित पथदिवे लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ४४५:-** **(कार्य.अभि. ४ ते ७ व ९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७७ अंतर्गत हेडगेवार रुग्णालय ते बँक ऑफ इंडिया या १८ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१५-२०१६ नुसार र.रु.८४,८१,४५०/- चे तयार करण्यात आले होते. सदर अंदाजपत्रक तयार करतेवेळी रस्त्याच्या काँक्रीटची जाडी ही १५० मी.मी.प्रस्तावित होती. सदर रस्ता हा जड व अतिवाहतुकीचा असल्याने रस्त्याची रुंदी व वाहतुकीची वर्दळ पाहता या रस्त्यासाठी काँक्रीटची जाडी १८० मी.मी. घेणे आवश्यक असल्याने काँक्रेट परिमाणामध्ये वाढ झालेली आहे. तसेच संपुर्ण रस्त्यालगत दोन्ही बाजुने पेव्हर ब्लॉक बसविणे व मुख्य रस्ता असल्याने रोड फर्निचरची कामे (Cat Eyes, Thermoplastic Lane Marking etc.) इ.करणे बाबत स.नगरसेविका यांची मागणी आहे. त्यानुसार सदर अंदाजपत्रक सुधारित केले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| मुळ मंजुर अंदाजपत्रक | र.रु.८४,८१,४५०/- |
| वाढीव कामा करीता अपेक्षीत खर्च | र.रु.१४,८४,८७०/- |
| | ----------------- |
| एकुण सुधारित अंदाजपत्रक | र.रु.९९,६६,३२०/- |

उक्त वाढ तांत्रिक कारणामुळे होत असून कामाच्या काही बाबी मध्ये सुध्दा वाढ होत आहे. सदर वाढीव काम संबंधीत कंत्राटदार मे.के.बी.पाथ्रीकर यांच्या मार्फत मंजुर निविदा दर (०.९९ टक्के कमी दराने) करणे व वाढीव खर्च र.रु.१४,८४,७८०/- सह सुधारित अंदाजपत्रक र.रु.९९,६६,३२०/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.भगवान घडमोडे :हा तातडीचा ठराव होता का? ऐनवेळी आणला, आयुक्तांनी अति.आयुक्तांना अधिकार दिले का दिले? असेल तर त्यांनी सर्व संचिकेवर सह्या कराव्यात. अति.आयुक्त यांना आयुक्तांनी ठराव घेणे करीता प्राधिकृत केले का?

मा.महापौर :आयुक्त २-३ दिवस येथे नाही. जे काही काम असेल ते अति.आयुक्त बघतील. असे म्हटले आहे. रूटींगचे जे काम आहे आयुक्त म्हणून हे काम करतील.

अति.आयुक्त :हा प्रस्ताव शहर अभियंता यांनी दिला होता. तो सभेसमोर ठेवायचा म्हणून कार्यवाही केली.

श्री.भगवान घडमोडे :तातडीचे आमचे प्रस्ताव असतील तर ते सही करतील का? ऐनवेळच्या प्रस्तावावर अति.आयुक्त यांच्या सहया आहे त्यामूळे असे एकही ठराव घेऊ नये. यास मंजूर करण्यास विरोध आहे. हे इलिगल प्रस्ताव आहे असे माझे म्हणणे आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :अनेक अंदाजपत्रक थांबलेले आहे त्यावर अति.आयुक्त यांनी सही घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :ऐनवेळचे प्रस्ताव ठेवले या बाबत आयुक्ताची संमती घेतली होती का? ऐनवेळी जे प्रस्ताव आले ते तातडीचे किंवा आणीबाणीचे नाही. रेग्युलर आयुक्त आल्यानंतर रेग्युलर विषयपत्रीकेवर ते घ्यावे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७७ अंतर्गत हेडगेवार रुग्णालय ते बँक ऑफ इंडिया या १८ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे या कामामध्ये काँक्रीट परिमाणा मध्ये वाढ

झाल्यामुळे आणि रस्त्यालगत दोन्ही बाजुने पेव्हर ब्लॉक बसविणे व रोड फर्निचरची कामे (Cat Eyes, Thermoplastic Lane Marking etc.) इ.बाबींची वाढ तांत्रिक कारणामुळे होत असल्याने र.रु.१४,८४,८७०/-च्या वाढीव कामाच्या खर्चास मान्यता देण्यात येऊन एकूण र.रु.९९,६६,३२०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच सदरचे काम संबंधीत कंत्राटदार मे.के.बी.पाथ्रीकर यांच्या मार्फत मंजुर निविदा दर (०.९९ टक्के कमी दराने) करून घेण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४६:-**

अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन दलामध्ये सद्यस्थितीत फक्त ०६ फायर टेंडर्स कार्यरत असून, पैकी ०३ फायर टेंडर्स जवळपास २५ वर्षे जुने आहेत. शहराची वाढती व्याप्ती व अग्निशमन वाहनांची कमतरता लक्षात घेता, नविन 05 नग X-Type Fire Water Tenders खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने ०५ नग फायर वॉटर टेंडर्स खरेदी करण्यासाठी प्रशासनाने सादर केलेल्या रक्कम रुपये २,६६,८५,०००/- खर्चाच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ९८१ दिनांक २०.०४.२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर फायर वॉटर टेंडर्स खरेदी करण्यासाठी ई-टेंडरद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या. निविदेच्या तिसऱ्या वेळी ०३ निविदा प्राप्त झाल्या असुन, निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर करण्यात आलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे. | रुपये ३,२८,२२,५५०/- |
| २ | मे.हायटेक इंजिनिअर्स, मुंबई | रुपये ३,५०,९०,७७५/- |
| ३ | मे.वाडीया बॉडी बिल्डर्स, अहमदाबाद | रुपये ३,५९,४४,६९५/- |

निविदा प्रक्रीये दरम्यान जीएसटी कर प्रणाली लागु झाल्यामुळे १३.५ टक्के व्हॅट ऐवजी २८ टक्के जीएसटी निविदाधारकांना भरावा लागणार आहे. तसेच वाहनांच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने ईलेक्ट्रॉनीक कंट्रोल पॅनल, एलईडी लेव्हल इंडिकेटर, लॅडर बीन गॅंट्री इत्यादी जास्तीच्या मशिनरीची निविदेमध्ये मागणी करण्यात आल्यामुळे सर्वच निविदाधारकांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचे दर सादर केले आहेत.

प्राप्त निविदांपैकी न्युनतम दराने निविदाधारक मे. हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांना निविदा दरात वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता, त्यांनी रुपये ५,००,०००/- दर कमी करण्याचे मान्य केले आहे. वाटाघाटी अंती कमी करण्यात आलेले मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांचे दर रक्कम रुपये ३,२३,२२,५५०/- वाजवी असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

करीता, मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांची 05 नग X-Type Fire Water Tenders खरेदीसाठी वाटाघाटी अंती कमी करण्यात आलेली रक्कम रुपये ३,२३,२२,५५०/- खर्चाची निविदा स्वीकृत करणेबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.भगवान घडमोडे :गाड्या खरेदी करणेचा ठराव कधी आला होता. कधी मंजूर झाला होता? आज का समोर आला?

मा.महापौर :या विषयासह विषय क्रमांक ४४६ ते ४५१ मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहराची वाढती व्याप्ती व अग्निशमन वाहनांची कमतरता लक्षात घेता नविन 05 नग X-Type Fire Water Tenders खरेदी करणेसाठी ई-टेंडरद्वारे प्राप्त झालेल्या निविदांपैकी न्युनतम दराचे निविदाधारक मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती

ठरल्याप्रमाणे मे.हायटेक सर्व्हीसेस, पुणे यांची 05 नग X-Type Fire Water Tenders खरेदीसाठी वाटाघाटी अंती कमी करण्यात आलेली रक्कम रुपये ३,२३,२२,५५०/- खर्चाची निविदा स्वीकृत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती रंजना प्रल्हाद देसाई, रा.मुकूंदवाडी गाव या चिकलठाणा पासून मुकूंदवाडीला येत असतांना जालना रोड वर जलवाहिनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या नालीमुळे त्यांचा गंभीर स्वरुपाचा अपघात झाला. या अपघातामुळे त्या अपंग झालेल्या आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची असून त्यांना महानगरपालिकेतर्फे मदत म्हणुन रु.०२ लक्ष देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप **अनुमोदक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती रंजना प्रल्हाद देसाई, रा.मुकूंदवाडी गाव या चिकलठाणा पासून मुकूंदवाडीला येत असतांना जालना रोड वर जलवाहिनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या नालीमुळे त्यांचा झालेल्या अपघातामुळे त्या अपंग झालेल्या असल्याने त्यांना महानगरपालिकेतर्फे मदत म्हणुन रु.०२ लक्ष देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मध्यवर्ती जकात नाका बायजीपुरा येथील निवासस्थानात वॉर्ड कार्यालय-६ मध्ये मजुरीन म्हणुन कार्यरत श्रीमती निर्मलाबाई काकाराव पगारे ह्या राहत होत्या. त्यांच्या निवासस्थानाच्या छताचे प्लास्टर कोसळल्याने त्यांचे पती नामे श्री.काकाराव जयराम पगारे (वय ४५) यांचा उपचारा दरम्यान दिनांक ०३.०२.२०१८ रोजी घाटी हॉस्पीटल मध्ये मृत्यु झालेला आहे.

करीता, मनपा मध्यवर्ती जकात नाका येथील निवासस्थानाचे छताचे प्लास्टर कोसळल्याने मयत झालेले काकाराव जयराम पगारे यांच्या कुटूंबीयांना मनपातर्फे सहानुभूतीपुर्वक विचार करून र.रु.०५ लाखाची आर्थिक मदत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा मध्यवर्ती जकात नाका येथील निवासस्थानाच्या छताचे प्लास्टर कोसळल्याने मयत झालेले काकाराव जयराम पगारे यांच्या कुटूंबीयांना मनपातर्फे र.रु.०५ लाखाची आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील जसवंतपुरा रहिमनगर भागातील रहिवासी युवक नामे श्री.रईस खान शब्बीर खान व श्री.नईम खान शब्बीर खान यांनी आंतरराष्ट्रीय ओपन तायक्वांदो चॅम्पियनशीप-२०१८ करीता भारतीय संघात निवड झाली होती. सदरील स्पर्धा मलेशिया व थायलंड मध्ये आयोजीत करण्यात आलेली होती. त्यामध्ये या दोन्ही बंधुनी मलेशिया येथे गोल्ड मेडल व थायलंड मध्ये सिल्व्हर मेडल भारतासाठी जिंकलेले आहे.

तसेच त्यांचा यापुर्वी सन-२०१३ मध्ये तायक्वांदो प्रकारात त्यांच्या नावे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डाची नोंद झालेली आहे व सदरील रेकॉर्ड आजपर्यंत कायम आहे आणि सन-२०१६ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे दोन्ही बंधुच्या नावाची पद्य पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

करीता सदरील दोन्ही बंधुची आर्थिक परिस्थिती बेताची असतांना उसणे पैसे घेऊन सदरील खेळात सहभाग घेऊन भारतासाठी गोल्ड व सिल्व्हर मेडल जिंकलेले आहे. संबंधीतांना विमानाने येणे-जाणे व राहणे, भोजन व परत भारतात येण्यासाठी अंदाजे र.रु.०५ लक्षपेक्षा जास्त खर्च आलेला आहे. संबंधीतांना औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे भारतासाठी खेळलेले खेळाडू श्री.रईस खान शब्बीर खान व श्री.नईम खान शब्बीर यांना र.रु.०५.०० लक्षाची आर्थीक मदत करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन **अनुमोदक:-**श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन,श्री.अजीम अहेमद रफिक
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील जसवंतपुरा रहिमनगर भागातील रहिवासी युवक नामे श्री.रईस खान शब्बीर खान व श्री.नईम खान शब्बीर खान यांची आंतरराष्ट्रीय ओपन तायक्वांदो चॅम्पियनशीप-२०१८ करीता भारतीय संघात निवड झाली असून ही स्पर्धा मलेशिया व थायलंड मध्ये संपन्न झालेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे भारतासाठी खेळलेले खेळाडू श्री.रईस खान शब्बीर खान व श्री.नईम खान शब्बीर यांना र.रु.०५.०० लक्षची आर्थीक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.९४, गजाननगर येथील अत्यावश्यक खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Zone 06 P.No.23 | ०२ | प्रभाग क्र.९४ मनपा शाळा दुरूस्ती करणे. (रु.१० लक्ष) | १. वॉर्ड क्र.९४ हनुमानगनर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. (रु.५ लक्ष)<br>२. श्री स्वामी समर्थनगर ड्रेनेज दुरुस्ती करणे. (रु.५ लक्ष) |

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४, गजाननगर येथे खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Zone 06 P.No.23 | ०२ | प्रभाग क्र.९४ मनपा शाळा दुरूस्ती करणे. (रु.१० लक्ष) | १. वॉर्ड क्र.९४ हनुमानगनर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. (रु.५ लक्ष)<br>२. श्री स्वामी समर्थनगर ड्रेनेज दुरुस्ती करणे.(रु.५ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११२ शिवाजीनगर येथील सेक्टर ई-भारतनगर, साईनगर, रेणुकानगर येथे मोठ्या प्रमाणात दलित बांधव राहत असून सदरील ठिकाणी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील कामांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | शिवाजीनगर, भारतनगर, रेणुकानगर, साईनगर येथे विविध ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकणे. | २५ लक्ष |
| २. | शिवाजीनगर, भारतनगर, येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ३. | शिवाजीनगर, भारतनगर, रेणुकानगर, साईनगर येथे विविध ठिकाणी रस्ते व्हाईट टॉपींग करणे | ९० लक्ष |
| | **एकुण** | **१३० लक्ष** |

**सुचक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११२ शिवाजीनगर येथील सेक्टर ई-भारतनगर, साईनगर, रेणुकानगर येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील कामांसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | शिवाजीनगर, भारतनगर, रेणुकानगर, साईनगर येथे विविध ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकणे. | २५ लक्ष |
| २. | शिवाजीनगर, भारतनगर, येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १५ लक्ष |
| ३. | शिवाजीनगर, भारतनगर, रेणुकानगर, साईनगर येथे विविध ठिकाणी रस्ते व्हाईट टॉपींग करणे | ९० लक्ष |
| | **एकुण** | **१३० लक्ष** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१७-१८ वॉर्ड क्र.५० अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरिकांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| अ.क्र.पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| Adm.new Work P.No.1 Sr.No.05 | बारापुल्ला, मकईगेट पुल तयार करणे. तरतुद र.रु.१.०० कोटी. | वॉर्ड क्र.५० अंतर्गत बारापुल्ला गेट ते मिलकॉर्नर चौकापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे | १.०० कोटी |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यारखान **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

**संवाद:-**

श्री.सचिन खैरे :दोन्ही पुलांसाठी रु.०१ कोटी आहे. रु.५०.०० लक्ष मकईगेटच्या दुरुस्तीसाठी ठेवावे.

मा.महापौर :दुरुस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० अंतर्गत खालील कामांचे लेखाशिर्ष परिसरातील नागरिकांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र.पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| Adm.new Work P.No.1 Sr.No.05 | बारापुल्ला, मकईगेट पुल तयार करणे. तरतुद र.रु.१.०० कोटी. | वॉर्ड क्र.५० अंतर्गत बारापुल्ला गेट ते मिलकॉर्नर चौकापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे | ५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती चौधरी सुनिता संभाजी स.शि.कें.प्रा.शाळा, बिल्डा ता.फुलंब्री जि.औरंगाबाद यांना आंतरजिल्हा बदलीने महानगरपालिका औरंगाबाद मध्ये रिक्त असलेल्या सहशिक्षीका पदावर सामावून घेणे करीता मु.का.अ.जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यांना महानगरपालिकेच्या शाळेत रिक्त पदावर घेण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात **अनुमोदक:-**श्रीमती राखी प्रशांत देसरडा

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती चौधरी सुनिता संभाजी, सहशिक्षिका, कें.प्रा.शाळा, बिल्डा, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी महानगरपालिकेच्या शाळेत रिक्त पदावर घेण्यास संमती दिलेली आहे. त्यास अनुसरुन श्रीमती सुनिता चौधरी, सहशिक्षिका यांना महानगरपालिका औरंगाबाद मध्ये रिक्त पदावर सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा मधील नागरीकांच्या मागणीनुसार खालीलप्रमाणे जुने लेखाशिर्ष बदलून देण्यात यावे.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१२,पहाडसिंगपुरा,बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी रस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे. जीबीआर-वार्ड-०१-पेज नं.-१ | निपट निरंजन सोसायटी मध्ये सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. |
| २. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा अंतर्गत माळीवाडा येथे रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. जीबीआर-वार्ड-०१ पेज नं.२ | बेगमपुरा येथील विविध गल्लीमध्ये सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. |
| ३. | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा पारसी स्मशानभुमी येथे बेगमपुरा पथदिवे व हायमास्ट बसविणे. गव्हर्नमेंट ग्रॅंट पेज नं.३ | बेगमपुरा येथील केंद्रीय मनपा शाळेजवळ हायमास्ट बसविण्यात यावे. |

प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा येथे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१२,पहाडसिंगपुरा,बेगमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी रस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे. जीबीआर-वार्ड-०१-पेज नं.-१ | निपट निरंजन सोसायटी मध्ये सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. |
| २. | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, बेगमपुरा अंतर्गत माळीवाडा येथे रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. जीबीआर-वार्ड-०१ पेज नं.२ | बेगमपुरा येथील विविध गल्लीमध्ये सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. |
| ३. | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा पारसी स्मशानभुमी येथे बेगमपुरा पथदिवे व हायमास्ट बसविणे. गव्हर्नमेंट ग्रँट पेज नं.३ | बेगमपुरा येथील केंद्रीय मनपा शाळेजवळ हायमास्ट बसविण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई दोन्ही वॉर्डात महानगरपालिकेत समाविष्ट होऊन ३ वर्षे होत आहेत. अद्यापपर्यंत येथे मुलभूत सुविधांची पुर्तता केली गेली नाही. सातारा-देवळाई परिसरामध्ये ७० टक्के पोलवर लाईट नसल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळेस नागरीकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. रात्रीच्या वेळेस अंधाराचा फायदा घेऊन मुलींच्या छेडछाडीचे प्रकार समोर येत आहे. तसेच अंधारामुळे महिलांना येणे-जाणे त्रासदायक ठरत आहे.

करीता महानगरपालिकेकडून सातारा-देवळाई परिसरामध्ये पोलसहित एलईडी फिटींग लावण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**कु.सायली भागवत जमादार **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाई परिसरामध्ये महानगरपालिकेकडून पोलसहित एलईडी फिटींग लावण्यात मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१०, ग्रामीण मुख्यालय परिसरातील यांच्या बाजुला एन-९, एच, श्रीकृष्णनगर समोरील भारतमाता क्रिडा मैदानावर सन-१९८८ पासून भारतमाता क्रिडा मंडळाच्या वतीने सिडको-हडको परिसरातील खेळाडुंसाठी, नागरीकांसाठी सातत्याने व नियमीत विविध क्रिडा स्पर्धेचे आयोजन, क्रिडा प्रशिक्षण, योग प्राणायाम वर्ग, वृक्षारोपण संगोपन, व्हॉलीबॉल, कब्बडी सराव, व्यायामाचे साहित्य, सामाजिक कार्य, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय कार्य या मैदानावर मंडळाच्या वतीने राबविण्यात येतात. सिडको-हडकोतील खेळाडूंना व नागरीकांना अधिक सुविधा देऊन परिसर स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी सदरील भारतमाता क्रिडा मैदान हे भारतमाता क्रिडा मंडळाला नाममात्र भाडेतत्वावर मागितले असून मनपा प्रशासनाचा जो काही नियमाने देय भाडे असेल ती संघटना भरण्यास तयार आहे. तरी त्यांना भारतमाता मैदान भाडेतत्वावर देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन,श्री.सिताराम इसराम सुरे, श्रीमती सिमा गणपत खरात.

**अनुमोदक:-**श्री.खान जहाँगीर मुलानी,श्री.नितीन रमण चित्ते,श्री.बन्सी ग्यानु जाधव,श्रीमती स्वाती किशोर नागरे.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१०, ग्रामीण मुख्यालय परिसरातील, एन-९,एन-९,एच, श्रीकृष्णनगर समोरील भारतमाता क्रिडा मैदान सिडको-हडकोतील खेळाडूंना व नागरीकांना अधिक सुविधा देऊन परिसर स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी सदरील भारतमाता क्रिडा मैदान हे भारतमाता क्रिडा मंडळाने नाममात्र भाडेतत्वावर मागितले असून मनपा प्रशासनाचे जे काही नियमाने भाडे देय असेल ते संघटना भरण्यास तयार असल्याने भारतमाता मैदान हे भारतमाता क्रिडा मंडळाला भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता एकुण र.रु.५,४५,४९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीनुसार वॉर्डनिहाय विविध एजन्सीकडून कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्तीचे कामे करण्यात येत आहे.

सदरील कामाचा खर्च मुदतवाढीनंतर र.रु.५० लक्षच्या पुढे जात आहे. वाढीव खर्च विद्युत देखभाल दुरुस्ती (शहर व उद्याने) या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. पथदिवे देखभाल दुरूस्तीची कामे अत्यावश्यक सेवेतील असल्याने दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत मुदतवाढीसह रु.२९२.६३ लक्षच्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता तसेच कार्यात्तर मंजुरीस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम कॉम्प्रेन्सिव्ह पध्दतीने खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार वॉर्डनिहाय विविध एजन्सीकडून करून घेण्यात येत असून सदर कामाची मुदत दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत होती.

| अ.क्र | कामाचे नाव | अ.प.र.रु.लाखात (दि.३१.१२.२०१७ पर्यंत वाढीव मंजुरीसह) | गुत्तेदाराचे नाव | कार्यादेश दिनांक | वाढीव र.रु. लाखात | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग-अ, भाग-१, वॉर्ड १,४,५,११,२२, २३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९०+५०.१० | मे.स्टर्लींग इलेक्ट्रिकल्स् वर्क्स औरंगाबाद | २५७/२०१५/ १२.१०.२०१५ | १७.०० | ९२.०० |
| २. | प्रभाग-अ, भाग-१, वॉर्ड १३,१४,१५,१६,१७,१८ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+३५.२० | मे.न्यु.इरा इलेक्ट्रिकल्स् औरंगाबाद | २६५/२०१५/ १२.१०.२०१५ | १२.०० | ७२.०० |
| ३. | प्रभाग-अ, भाग-३, वॉर्ड १२,१९,२०,२१,४९,५०,५२ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+५०.२० | मे.स्टर्लींग इलेक्ट्रिकल्स् वर्क्स औरंगाबाद | २६४/२०१५/ १२.१०.२०१५ | १७.२१ | ९२.२१ |
| ४. | प्रभाग-ब, भाग-१, वॉर्ड २,७,८,३२,३३,३४,३५ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९८+४९.०२ | मे.न्यु.इरा इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६६/२०१५/ १२.१०.२०१५ | १६.८० | ९०.८० |
| ५. | प्रभाग-ब, भाग-२, वॉर्ड | २४.४५+५०.५५ | मे.श्री.इलेक्ट्रिक | २६२/२०१५/ | १७.३३ | ९२.३३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३६,३९,४०,६२,६३,६४ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | | ल्स् ॲण्ड रेफ्रिजरेशन औरंगाबाद | १२.१०.२०१५ | | |
| ६. | प्रभाग-ब, भाग-३, वॉर्ड ६,९,१०,२८,२९,३०,३१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.६५+४९.३५ | मे.आकाश इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६१/२०१५/ १२.१०.२०१५ | १६.९२ | ९०.९२ |
| ७. | प्रभाग-ब, भाग-४, वॉर्ड ३८ एमआयडीसी मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९३+२८.०७ | मे.स्टर्लीग इलेक्ट्रिकल्स्, वर्क्स औरंगाबाद | २५२/२०१५/ १२.१०.२०१५ | ९.६२ | ६२.६२ |
| ८. | प्रभाग-क, भाग-१, वॉर्ड २४,२५,२६,२७,४१,४२ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.५०+४०.५० | मे.न्यु.इरा इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६९/२०१५/ १२.१०.२०१५ | १३.८८ | ७८.८८ |
| ९. | प्रभाग-क, भाग-२, वॉर्ड ४३,४४,५८,५९,६०,६१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+३७.२० | मे.इगल इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २७२/२०१५/ १४.१०.२०१५ | १२.७५ | ७४.७५ |
| १०. | प्रभाग-क, भाग-३, वॉर्ड ४५,४६,५५,५६,५७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.४८+२०.५२ | मे.इगल इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २७३/२०१५/ १४.१०.२०१५ | ७.०३ | ५२.०३ |
| ११. | प्रभाग-ड, भाग-१, वॉर्ड ४७,४८,५१,५३,५४,६६,६७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९०+४७.१० | मे.तिरुपती इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड सर्व्हिसेस औरंगाबाद | १७/२०१५/ १८.११.२०१५ | १६.१४ | ८८.१४ |
| १२. | प्रभाग-ड, भाग-२, वॉर्ड ६८,६९,७०,७१,७२,७३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+४९.२० | मे.स्टर्लीग इलेक्ट्रिकल्स्, वर्क्स औरंगाबाद | २६०/२०१५/ १२.१०.२०१५ | १६.८६ | ९०.८६ |
| १३. | प्रभाग-ड, भाग-३, वॉर्ड १०३,१०४ मेनरोडवर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+३६.२० | मे.असंसो लाईटस् औरंगाबाद | २५३/२०१५ १२.१०.२०१५ | १२.४१ | ७३.४१ |
| १४. | प्रभाग-ई, भाग-१, वॉर्ड ३७,८६,८७,८८,८९,९० मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.७०+२५.३० | मे.साकळगावकर इलेक्ट्रिकल्स्, वर्क्स औरंगाबाद | २७१/२०१५ १३.१०.२०१५ | ८.६७ | ५८.६७ |
| १५. | प्रभाग-ई, भाग-२, वॉर्ड ८१,८२,८३,८४,८५,९१ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+४५.२० | मे.बानेश्वर इलेक्ट्रिकल्स्, ॲण्ड औ.सह.संस्था | २५५/२०१५ १२.१०.२०१५ | १५.४९ | ८५.४९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लि. औरंगाबाद | | | |
| १६. | प्रभाग-ई, भाग-३, वॉर्ड ७८,७९,८०,९२,९३,९४,९५ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९०+५०.१० | मे.पुजा इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २५८/२०१५ १२.१०.२०१५ | १७.१७ | ९२.१७ |
| १७. | प्रभाग-फ, भाग-१, वॉर्ड ७४, ७५, ७६, ७७, ९६, ९७ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.७०+३०.३० | मे.असंसो लाईटस् औरंगाबाद | २५९/२०१५ १२.१०.२०१५ | १०.३८ | ६५.३८ |
| १८. | प्रभाग-फ, भाग-२, वॉर्ड १०१, १०२, १०५, १०६, १०७, १०८ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९०+४३.१० | मे.न्यु.इरा इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६३/२०१५ १२.१०.२०१५ | १४.७७ | ८२.७७ |
| १९. | प्रभाग-फ, भाग-३, वॉर्ड ९८, ९९, १००, १०९, ११०, १११, ११३ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.८०+५५.२० | मे.मातोश्री इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २५६/२०१५ १२.१०.२०१५ | १८.९२ | ९८.९२ |
| २०. | प्रभाग-फ, भाग-४, वॉर्ड ६५,११२ व मुख्य रस्त्यांमधील पथदिव्यांची कॉम्प्रेन्सीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | २४.९०+५२.१० | मे.असंसो लाईटस् औरंगाबाद | २५४/२०१५ १२.१०.२०१५ | १७.८६ | ९४.८६ |
| २१. | देवळाई-सातारा येथील पथदिवे देखभाल दुरुस्ती, नवीन पथदिवे लावणे | २५.००+१०.०० | मे.मातोश्री इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६८/२०१५ १२.१०.२०१५ | ०३.४२ | ३८.४२ |
| २२. | देवळाई-सातारा येथील पथदिवे देखभाल दुरुस्ती, नवीन पथदिवे लावणे | ६०.०० | मे.मातोश्री इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | २६७/२०१५ १२.१०.२०१५ | --- | --- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **१३७५.००** | | | **२९२.६३** | **१६६७.६३** |

दरम्यानच्या काळात शहरात एलईडी पथदिवे लावण्याचे काम सुरू झालेले आहे. सद्यस्थितीत मुख्य रस्त्यावरील एलईडी लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे. देखभाल दुरुस्तीच्या कामास दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंतच्या खर्चास व मुदतवाढीस मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त आहे.

सद्यस्थितीत राष्ट्रीय सन व विविध सांस्कृतिक महोत्सव व धार्मिक सन चालू आहे. पथदिवे देखभाल दुरुस्ती अत्यावश्यक सेवा असल्याने संबंधीत एजन्सीला व कामास दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत मुदतवाढ तसेच तक्त्यात नमुद केल्यानुसार वाढीव खर्चास मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता देण्यासाठी प्रशासनातर्फे शिफारस करण्यात येत आहे. सदरील कामाचा वाढीव खर्च अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षातील विद्युत देखभाल दुरुस्ती (शहर व उद्याने) या लेखाशिर्षकातून करण्यात येईल. वॉर्डनिहाय दर्शविलेल्या पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक ३०.०६.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील वॉर्डनिहाय पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने शहरातील वॉर्डनिहाय पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे कामास संबंधीत एजन्सीला दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.१ ते २२ मध्ये दर्शविलेल्या तपशीलानुसार या कामाकरीता लागणाऱ्या र.रु.२९२.६३ लक्षच्या वाढीव खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध उद्याने, खुल्या जागा येथे ओपन जिम साहित्य बसविणे बाबत मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये ५ कोटीची तरतुद करण्यात आलेली होती या अनुषंगाने सदरील कामासाठी बी-२ पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या. या कामी दिनांक १८/०४/२०१८ रोजी चार निविदा प्राप्त झाल्या असुन त्या पैकी तीन निविदाधारक तांत्रिक छानणीत प्राप्त ठरले आहेत. या नूसार पात्र निविदाधारक मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस ईक्विपमेंट यांची निविदा रक्कम रुपये ४,७१,८०,१३२/- इतकी प्राप्त आहे. त्यानूसार खालील तक्त्यात सविस्तर माहिती तयार करण्यात आली आहे.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2018_AMCA_295844_1

| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता-२ |
|---|---|---|
| २. | कामाचे स्वरुप | औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध उद्याने, खुल्या जागा येथे ओपन जिम साहित्य बसविणे |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | सदरील प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले. | बी-२ पध्दतीच्या निविदेने चार निविदा प्राप्त आहेत पैकी एक टेंडर तांत्रिक दृष्टया अपात्र ठरल्याने चार पैकी तीन निविदाधारकाची ऑफर प्राप्त |
| ४. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा सुचना पत्र दिनांक ०७.१२.२०१७<br>ई-निविदा प्रसिध्दी प्रथम सुचना दिनांक २६.१२.२०१७.<br>ई-निविदा प्रसिध्दी व्दितीय सुचना दिनांक ०१.०१.२०१८.<br>ई-निविदा प्रसिध्दी तृतीय सुचना दिनांक ०९.०४.२०१८. |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | १६.४.२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १८.४.२०१८ |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली ? | ४ (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १) | में.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस ईक्विपमेंट | रु.४,९९,९९,२६०/- | बी-२ पध्दतीच्या निविदेने रुपये ४,९९,९९,२६०/- ऑफर प्राप्त |

| | | |
|---|---|---|
| २ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमूद करावीत. | लागू नाही |
| ३. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे | मनपा अर्थसंकल्पातील तरतुदीतुन |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | लेखा विभागाने या कामी संचिकेत तरतुद उपलब्ध करुन दिली आहे |
| ४. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे काय ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| ५. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | लागू नाही |

करिता उपरोक्त सविस्तर तक्त्यानूसार सर्वात कमी दराचे निविदाधारक में.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस ईक्विपमेंट यांची निविदा रक्कम रुपये ४,७१,८०,१३२/- ची मा.सर्वसाधारण सभेसमोर ऐनवेळीचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध उद्याने, खुल्या जागा येथे ओपन जिम साहित्य बसविण्याच्या कामासाठी बी-२ पध्दतीच्या प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक में.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस ईक्विपमेंट यांची र.रु.४,७१,८०,१३२/- ची निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी,
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद